म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ५२५

REFBK-0005032

# संत तुकाराम.

( चरित्रात्मक निबंध. )

लेखक—

## केशव हरी पौडवाल.

( 'स्मरणशक्तीचें महत्व,' 'गणपत्युत्सव मिमांसा,' 'ज्ञानार्जन,' 'राष्ट्रीय शिक्षण,' 'मराठी वाङ्मयाची दिशा,' 'एकनाथमहाराज व अवलोकन' इ० पुस्तकांचे कर्ते. )

REFBK-0005032

प्रकाशक.

पांडुरंग नारायण जव्हेरी.

विनय प्रेस २६७ गिरगांवरोड, मुंबई नं. ४

१९३४

किंमत १२ आणे.

# अनुक्रमणिका.


| | पृष्ठ. |
|---|---|
| प्रस्तावना ... ... ... ... | १ |
| पूर्ववृत्त ... ... ... ... | १ |
| जन्मकाळ ... ... ... ... | ६ |
| संसार ... ... ... ... | १९ |
| प्रथमावस्था ... ... ... ... | ३६ |
| सगुणोपासना ... ... ... ... | ४१ |
| अध्ययन ... ... ... ... | ५९ |
| कीर्तन ... ... ... ... | ६८ |
| पुढची स्थिति ... ... ... ... | ८० |
| समाज स्थिति ... ... ... ... | ८९ |
| गुरूपदेश ... ... ... ... | १०५ |
| शेवटची स्थिति ... ... ... ... | ११९ |
| प्रयाण ... ... ... ... | १२९ |

# प्रस्तावना.

गिरयो गुरवस्तेभ्यो प्युर्वी गुर्वी ततोपि जगदंडम्।
तस्मादप्यति गुरवः प्रलयेऽप्यचला महात्मानः[1] ॥

जगन्नाथराय.

आज सात आठशें वर्षांत महाराष्ट्रांत जे महान साधुसंत जगदुद्धाराचें कार्य करून गेले, त्यांची थोरवी वर्णावी तितकी थोडीच होणार आहे. त्यांनीं महाराष्ट्रीयांत स्वकर्तव्याविषयीं जी जागृति केली, ती अपूर्व होती. त्यांनीं लोकांस उपदेशामृत पाजून शुद्ध आर्य धर्माचें रक्षण केलें व देशकार्यहि साधलें. " धर्म ही वस्तु ऐहिक अभ्युदय व पारलौकिक निःश्रेयस देण्याला समर्थ आहे " असें श्रीमच्छंकराचार्यांनीं भगवद्गीतेवर भाष्य लिहितांना आरंभींच म्हटलें आहे. धर्माची उत्पत्ति ऐहिक व पारलौकिक सुखाकरितांच असल्यामुळें त्याच्या रक्षणासाठीं व प्रसारासाठीं संतांनीं अभिनंदनीय परिश्रम केले. धर्मरक्षणानेंच समाजाची धार्मिक, सामाजिक, बौद्धिक वगैरे बाबतींत उन्नति होऊन तो आंतून व बाहेरून चांगला जोमदार होतो. पण हिंदु समाजाच्या दुर्दैवानें संतांनीं स्वीकारलेलें हें धोरण कर्मठ शास्त्री पंडितांच्या मनांत न उतरल्यामुळें त्यांनीं त्यांच्या शिकवणीचा पुरस्कार तर केला नाहींच, पण तुकोबानंतर त्यांच्या संप्रदायाकडूनहि त्याला गचांडी मिळाल्यामुळें खऱ्या धर्माचा ऱ्हास होत गेला. आज भागवत धर्माचें आपण जें स्वरूप पाहात आहों तें त्याचें शुद्ध स्वरूप नाहीं. त्यांत अनेक गोष्टींची भेसळ झाली आहे. धर्माचें अधिष्ठान नसल्यामुळें आज हिंदूंच्या कोणत्याहि चळवळींत जोम उत्पन्न होत नाहीं, इतकेंच नव्हे तर शारीरिक, बौद्धिक, आर्थिक इ० बाबतींत उलट समाजाचें दौर्बल्य अधिक वाढत आहे; म्हणून हिंदु समाजानें खऱ्या आर्यधर्माला धरूनच सर्व चळवळी चालविल्या पाहिजेत.

---

१ पर्वत मोठे आहेत; त्यांहीपेक्षां पृथ्वी मोठी आहे; तिच्यापेक्षांहि ब्रम्हांड मोठें आहे; पण प्रलयकालीं देखील ज्यांचें धैर्य ढळत नाहीं असे जे महात्मे ते सर्वांपेक्षां मोठे आहेत.

धर्माच्या मूलतत्वास धरूनच हिंदुसमाजाची संघटना करण्याचा ..ला. त्यांनीं अज्ञानांधःकारांत वावरत असलेल्या लोकांस बाहेर काढून ... धर्माच्या उज्ज्वल प्रकाशांत आणिलें व आर्यधर्मांत रूढ होत चाललेल्या कित्येक दुष्ट चालींस जोराचा धक्का देऊन त्यांस एक प्रकारचें नवीन वळण लावलें. सृष्टींत जिवांच्या उपयोगासाठीं परमेश्वरानें ज्या कित्येक अद्भूत शक्ती सांठविल्या आहेत, त्यांची लोकांस जाणीव करून देऊन त्यांच्यांत अभिनव कर्तव्योन्मुखता निर्माण केली. त्यावेळीं देशावर संकटपरंपरा कोसळली असतांहि त्यांतून वचावून व आपली संस्कृति कायम ठेवून लोकांनीं स्वराज्य स्थापनेचें जें कार्य केलें, तें या संतांच्या कामगिरीचेंच फळ होय. अशा संत मंडळींतील मुकुटमणि तुकोबाराय हे होत. त्यांची योग्यता किती मोठी होती, हें त्यांच्या संबंधीं या चरित्रात्मक निबंधांत केलेल्या विवरणावरून कळून येणार आहे.

तुकोबांचें चरित्र अनेकांनीं लिहिलें आहे. पण त्यांत दंतकथांवरच अधिक भिस्त ठेवण्यांत आली आहे. त्यांचा जन्म शक कोणता ? ते प्रयाणकाळीं वृद्ध होते अथवा तरुण होते? ते सदेह वैकुंठास गेले किंवा इंद्रायणींतच समाधिस्थ झाले ? इ० संबंधीं पुष्कळ वाद आहे. पण त्यांत विशेष महत्वाचा मुद्दा म्हटला म्हणजे ते प्रवृत्तिमार्गी होते अथवा निवृत्तिमार्गी होते ? या संबंधीं अद्यापिहि पुष्कळांची चर्चा चालू आहे. कोणी त्यांस प्रवृत्तिमार्गी ठरवित आहेत तर कोणी त्यांस निवृत्तिमार्गी ठरविण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण या वादात्मक प्रश्नाचा निर्णय तुकोबांच्या आचार विचारावरूनच केला पाहिजे. पूर्वग्रह दूषित न होतां निरपेक्षपणें त्यांच्या चारित्र्याचा विचार केला तर तुकोबा हे प्रवृत्तिमार्गीच होते असें ह्मणावें लागतें. उन्मार्गगामी लोकांना नित्युपदेशानें ताळ्यावर आणून सन्मार्गास लावण्याचें काम त्यांनीं आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत केलें होतें. ज्ञानानें भक्ति दृढ झाल्यावरहि आत्म्याचें ठिकाणीं संतुष्ट राहून संन्यस्तवृत्ति न स्वीकारतां समबुद्धि होत्साते काया, वाचा मनेंकरून सर्व भूतांच्या हितांत गढून जाऊन त्यांनीं आडवाटेनें जाणाऱ्या लोकांना शहाणें करून इष्ट वळण लावण्याचें जें व्रत स्विकारलें, तें कर्मयोगाला परिपोषक नव्हतें, असें कोणीहि ह्मणणार नाहीं. ध्येयाच्या उच्च वातावरणांत विहार करीत असतां त्यांनीं व्यवहाराला सोडचिठी दिली नव्हती व स्वतांच्या संसा-

रावर तुळशीपत्रहि ठेवलें नव्हतें. संसारांत आलेला अनुभव, अडचणी इत्यादींचा उल्लेख त्यांनीं आपल्या अभंगांत जागोजाग केला आहे, त्यावरून हें ध्यानांत येणार आहे.

तुकोबांच्या अभंगांत कांही निवृत्तिपर वचनेंहि आहेत. पण त्यांचा आशय संसारांत मनुष्यानें आसक्ति ठेवूं नये इतकाच आहे. संसार सोडून वन स्वीकारावें व तेथें ध्यानमग्न होऊन स्वस्थ बसावें असा नाहीं.

सुखी संसारी असावें । चित्त परब्रम्हीं ठेवावें ॥
पद्दा न्याय कमळणीचा । शोष न करी जीवनाचा ॥
ताकामध्यें लोणी राहे । त्याची मेळणी कदां नोहे ॥
तुका म्हणे त्याच परी । सुखी असावें संसारीं ॥

संसार सारभूत असून तो करूनच जीवानें तरून कसें जावें, हेंच तुकोबांच्या एकंदर शिकवणुकींत सांगितल्याचें प्रत्ययास येतें.

वर्षावावीण सागर । जैसा जळें निर्भर ॥ —ज्ञानदेव.

समुद्राकडे सहस्त्रावधि नद्या सतत येत असतात. पण तेणेंकरून तो अमर्याद होत नाहीं अथवा त्या न आल्या तरी तो रोडावत नाहीं. तद्वत श्रेष्ठ पदास पोंचलेलें साधु पुरुष आपल्या कर्तव्यापासून च्यूत होत नाहींत किंवा त्यांची समाधान वृत्ति संसारांतील भोग भोगण्यानें चलित होत नाहीं. भोगाविषयीं आसक्ति ठेवल्यानेंच समाधान वृत्ति ढळते.

तुकोबा कर्मठ नव्हते. त्यानीं दांभिक आचार कधींहि पाळला नाहीं. त्यांनीं निष्काम कर्माचाच उपदेश करून निव्वळ कवाईतीचें स्तोम कमी केलें व कट्टर कर्मठांच्या शाब्याला वठणीवर आणिलें. त्यांनीं पाखांड उत्पन्न करणाऱ्या लोकांचीं तोंडें आपल्या भक्तीच्या जोरावर ठेंचून टाकिलीं. तसेंच त्यांनीं जातिभेदाचें महात्म्य कमी केलें व नैराश्य वादाचें धुकें धुडकावून लाविलें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तुकोबांनीं भागवत धर्माचा प्रसार करण्यांतच आपलें आयुष्य खर्ची घातलें व त्यांच्या उपदेशाचा परिणाम तत्कालिन जनतेच्या मनावर बराच झाला. तुकोबांचे विचार तेजस्वी व जोरकस असून त्यांची प्रतिभा जातिवंत होती. त्यांच्या अभंगांत मानव जातीच्या उन्नतीला पोषक अशींच उच्च

व उदात्त तत्वें इतस्तत: विखुरलेलीं दिसून येतात. ज्ञानेश्वरांनीं ज्याचा पाया घातला तें कार्य तुकोबांनीं मोठया धैर्यानें कळसास पोंचविलें. अशा योग्यतेच्या साधुश्रेष्ठाचें गुणवर्णन करावें तितकें थोडेंच आहे. त्यांचें चरित्र सर्वांगसुंदर असून त्यांच्या संबंधीं असलेले गैरसमज दूर व्हावेत याच उद्देशानें हा अल्पसा प्रयत्न केला आहे. तो सफल होवो अशी जगनियंत्या परमेश्वरापाशीं प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करीतों.

टाईप अस्पष्ट उठल्यामुळें बऱ्याच ठिकाणीं काना, मात्रा, अनुस्वार इ० संबंधीं राहिलेलीं अशुद्धें सर्वच शुद्धिपत्रांत देतां आलीं नाहींत; तरी त्यांकडे वाचक दुर्लक्ष करतील अशी आशा आहे.

दादर, राधा निवास.
१-१-३४.

केशव हरी पौडवाल.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | ७ | जगदुद्धराचें. | जगदुद्धाराचें. |
| ,, | १३ | केल. | केले. |
| ४ | ९ | रथानें. | स्थानें. |
| १२ | १२ | कलांत | कुलांत. |
| १४ | ७ | लोकांव्या. | लोकांच्या. |
| ,, | १९ | प्रम. | प्रेम. |
| ,, | २३ | चेव | चैव. |
| १८ | १ | बाले. | बोले. |
| ,, | १६ | सटण्याकरितां | सुटण्याकरितां. |
| २० | ९ | व्ययसाय. | व्यवसाय. |
| २४ | १८ | पज. | पण. |
| २५ | ११ | कृताला. | कृतीला. |
| ३० | ११ | प्रपच. | प्रपंच. |
| ३२ | १ | कावयाचा. | करावयाचा. |
| ,, | २१ | अयवस्था | अव्यवस्था |
| ३३ | ,, | झाला. | झालो |
| ३९ | १८ | प्रपंवांतील. | प्रपंचांतील. |
| ४० | ४ | घली. | घाली. |
| ४४ | १० | सत्यांतहि अव्यक्त व गुणांतून. | व त्यांतहि अव्यक्त सगुणांतून. |
| ४६ | ५ | प्रयन. | प्रयत्न. |
| ,, | १६ | सद्गुण. | सद्गुण. |
| ,, | १७ | अधिकाअधिक. | अधिकाधिक. |
| ५१ | १ | तसेंस. | तसेंच. |
| ५३ | २२ | विठाबाची. | विठोबाची. |
| ५५ | १३ | सुखसाठीं. | सुखासाठीं. |
| ५७ | १ | तुझे. | तुझी. |
| ६३ | ३ | खाण्याचा. | खाण्याच्या. |
| ६८ | ८ | स्थिती. | स्थिति. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६८ | १२ | हाते. | होते. |
| ७२ | १९ | श्रेत्यांची. | श्रोत्यांची. |
| ७५ | १४ | तुकावांनीं. | तुकोबांनीं. |
| ,, | २० | दाघांनाहि. | दोघांनाहिं. |
| ८१ | ५ | पसादयाजपाशीं. | प्रसादयाजपाशी |
| ,, | १९ | भूमिभर. | भूमिभार. |
| ८२ | १९,२० | माणसापशीं. | माणसापाशीं. |
| ८३ | १८ | अवलंवन. | अवलंबून. |
| ८७ | ५ | भगवंत्ताचे. | भगवंताचें. |
| ८९ | ७ | काथ्याकट. | काथ्याकूट. |
| ,, | ११ | जनततून. | जनतेंतून. |
| ९९ | १० | ता | तो |
| ९६ | १२ | एक्य | ऐक्य. |
| १०० | १६ | घण्याचा | घेण्याचा |
| १०४ | १८ | संतांचा | संतांची |
| ,, | २२ | पर्वींचा | पूर्वींचा |
| १०९ | ६ | लाकांत | लोकांत |
| ११० | १२ | अंधश्रद्धचीच | अंधश्रद्धेचीच |
| ११३ | १९ | आवधा | अविद्या |
| ११४ | १२ | निवृतिनाथ | निवृत्तिनाथ |
| ,, | २२ | जाण तेनें | जाणतेनें |
| १२० | १० | उत्साहनें | उत्साहानें |
| ,, | १३ | तुकावांना | तुकोबांना |
| ,, | २० | तानें | कानें |
| १२१ | २१ | का म्हणे | तुका म्हणे |
| १२२ | २३ | अससे | असें |
| १२३ | २० | साकरेचा | साखरेचा |
| १२६ | २३ | विचिन्ननाप | विचिन्वन्नाप |
| १३१ | १८ | तुकोवांचें | तुकोबांचें |

१०३२
मराठी ग्रंथ संग्रहालय नोंद क्र. ८०७९
मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत सं. नि. नं. ८२७ ता. ....... ठाणें.

# संत तुकाराम

(चरित्रात्मक निबंध)

## पूर्ववृत्त.

स्वात्मानुभव पहातां तुकया केवळ पिताच जनकाचा ॥
वैराग्यें डोलविला माथा जेणें मुनिंद्र सनकाचा ॥ १ ॥—मोरोपंत.

आर्यावर्तांत व विशेषतः महाराष्ट्रांत १२ व्या शतकानंतर जे साधु-संत जगदुद्धाराचें कार्य करून गेले, त्यांची थोरवी वर्णावी तितकी थोडीच आहे. आमच्या देशावर अनेक संकटें आलीं, पण त्यांतून बचावून आपलें अस्तित्व या देशानें कायम राखिलें, त्याचें श्रेय त्यांनाच आहे. महाराष्ट्रांत पहिल्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत जो धुमाकूळ माजला, ज्या राजकीय उलाढाली झाल्या व नास्तिक आचारविचारांचें प्राबल्य होऊन जनता कर्तव्यमूढ बनली, तिला स्वकर्तव्याची स्पष्ट जाणीव करून देण्याकरितां संतांनीच प्रयत्न केले. "धर्म" ही वस्तु ऐहिक अभ्युदय करण्याला व पारलौकिक निःश्रेयस देण्याला समर्थ आहे. मनुष्य प्राणी हा ईश्वराचा अंश असून तो प्रकृतीचा व परिस्थितीचा स्वामी होण्याला समर्थ आहे; इतकेंच नव्हे तर तो "नारायण" होण्यालाहि समर्थ आहे, अशी सनातन धर्माची शिकवणूक असून त्याची जिवंत ओळख जनतेला संतांनी करून दिली.

आर्य धर्माची तत्वें महाराष्ट्राच्या मायभाषेंत त्यांनींच प्रथम प्रसिद्ध केलीं व स्वतांच्या आचरणानें व उपदेशानें अज्ञानपंकांत रुतलेल्या जनतेला मुक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेंच लोकांत स्वकर्तव्याची जाणीव होऊं

लागली. भक्तीचा उदय झाला व नैराश्य वादाला तिलांजली मिळाली. मराठी वाङ्मयांतून संतांचें वाङ्मय काढून घेतलें तर बाकी काय राहणार आहे? शिवाजीच्या वेळीं महाराष्ट्रांतील लोकांत स्वकर्तव्याविषयीं जिवंत जाणीव उत्पन्न होऊन स्वराज्य स्थापनेचे त्यांजकडून जे दीर्घ प्रयत्न झाले व त्यांनी जो राष्ट्राभिमान दाखविला, त्याचें बहुतेक श्रेय या संतांकडेच आहे. त्यांनीच लोकांस खऱ्या धर्म तत्वांची ओळख करून देऊन त्यांचा सर्वत्र प्रसार केला व या देशाची संस्कृति कायम ठेविली. वैदिक धर्मरहस्याची हानि होऊं नये म्हणून त्यांनी केलेली कामगिरी अपूर्वच म्हटली पाहिजे.

ज्ञानदेव, एकनाथानंतर जे संत झाले, त्यांत तुकोबारायाची योग्यता अत्यंत श्रेष्ठ दर्जाची होती, असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं.

जो भक्तिज्ञान वैराग्य पुतळा। ज्याचे अंगी अनंत कळा॥ अशी महिपतीनें त्यांची महति वर्णन केली आहे. ज्ञानदेवांनी ज्याचा पाया रचिला, त्या भागवत धर्ममंदिराचा कळस चढविणारे उच्च कोटीचे भगवद्भक्त तुकोबाराय होत.

संत कृपा झाली। इमारत फळा आली॥ १॥
ज्ञान देवें रचिला पाया। उभारिलें देवालया॥ २॥
नामा तयाचा किंकर। तेणें केला हा विस्तार॥ ३॥
जनार्दन एकनाथ। ध्वज उभारिलां भागवत॥ ४॥
भजन करा सावकाश। तुका झालासें कळस॥ ५॥—बहिणाबाई.

याप्रमाणें भागवत धर्ममंदिराची सांगता म्हणजे पूर्णता तुकोबारायांनी केली. त्यांच्या अभंगांचा पगडा महाराष्ट्रीयांच्या मनावर अद्यापि आहे व पुढें तो तसाच राहील यांत संशय नाहीं. त्यांनी आपल्या अभंगवाणीनें महाराष्ट्रावर अखंड भक्तिदीप तेवत ठेवला आहे. त्यांचे अभंग म्हणजे महाराष्ट्र

सरस्वतीच्या कंठांतील एक अमोल अलंकारच आहे. त्यांचा अधिकार सामान्य नव्हता. ते नीतिमार्गीतील वीर असून भागवत धर्माचे त्राते होते. मनोनिग्रहानें लोभ मोहादिकांस बळी न पडतां भगवद्भक्तीच्या जोरावर त्यांनी संसारांतील अनेक दुःखें शांतपणें सोसली. भगवद्भक्तीचा जिव्हाळा त्यांच्या हृदयी वास करीत असल्यामुळें भागवत धर्माच्या दैवी तेजानें ते अधिष्ठित झाले होते. आणि म्हणूनच सर्व प्रकारच्या लोकांकडून त्यांच्या अलोट भक्ति-ज्ञान वैराग्याचा गौरव करण्यांत येत आहे.

मथळ्यावर दिलेल्या आर्येत मोरोपंतांनी तुकोबासंबंधी केलेल्या वर्णनावरून तुकोबांची योग्यता किती मोठी होती, हें सहज ध्यानांत येणार आहे. त्यांनी या महाराष्ट्राला आपल्या भक्तीबळानें कायमचे भूषित केलें आहे. त्यांचें नांव मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व अबालवृद्धांच्या मुखी आहे. त्यांचा कीर्तिदुंदुभी सर्व लोक "ज्ञानेश्वर माउली तुकाराम" म्हणून आज दोन अडीचशें वर्षें मोठ्या प्रमाणानें वाजवीत आहेत. अशा भक्त शिरोमणीच्या चरित्राचें आपण जितकें मनन करूं तितके आपले विचार उन्नतच होणार आहेत. तुकोबा सारखे सत्पुरुष ज्यांच्या पोटी जन्मास आले, ते हरिभक्ति परायणच असणार. ते वारकरी पंथाचे होते. त्यांचे वास्तव्य देहू गांवी होते. देहू गांव पुण्याच्या वायव्येस सुमारें आठ कोसांवर इंद्रायणी नदीच्या कांठीं आहे. जी. आय्. पी. रेल्वेच्या शेलारवाडी नामक स्टेशना नजिकच उत्तरेच्या बाजूला तीन मैलांवर हा गांव आहे. हा लहानसाच गांव असुन त्याच्या सभोंवार थोड्या अंतरावर लहान मोठे अनेक डोंगर आहेत. याच गांवांत साधु श्रेष्ठ तुकारामाचा जन्म झाला.

महाराष्ट्रांत अनेक क्षेत्रें आहेत. पण त्यांतील श्रेष्ठ क्षेत्र पंढरपूर हें होय. "मूर्तिमंत देव नांदतो पंढरी। येर ते दिगांतरी प्रतिमा रूप॥" या

ठिकाणी साक्षात् परमेश्वर भक्तासाठीं वचनबद्ध होऊन राहिला असल्यामुळें भगवद्भक्तांच्या प्रेमाचें व आदराचें तें स्थान होऊन राहिलें आहे. तुकोबा म्हणतात:— सकळ तीर्थांहुनी । पंढरी हे मुगुटमणी ॥ सकळतीर्थें तयाठाया । येतीं पुनीत व्हावया ॥ हें क्षेत्र अर्ध योजन विस्तीर्ण असून त्याची अत्यंत महति वर्णिली आहे.

अर्ध योजन विस्तीर्णं तदर्धायामसंमितं ।
तत्क्षेत्रं सर्व फलदं विष्णोर्मम च वल्लभं ॥

या ठिकाणी सर्व देव वास करीत असून " यत्र त्रयं काशिका च गया विष्णु प्रयागकं " काशी गया व प्रयाग हीं तिन्ही स्थानें आहेत. इतकेंच नव्हेतर

पुष्करात्त्रिगुणं प्रोक्तं केदारात्षड्गुणं भुवि ।
वाराणस्या दशगुणं क्षेत्रं तत्पौंडरीककं ॥

पुष्कर क्षेत्रापेक्षां त्रिगुणित, केदाराहून षड्गुणित आणि काशीपेक्षां दशगुणित असें पुण्यकारक हें क्षेत्र आहे. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे शंकर, देवर्षि नारदाला सांगतात की—

बहुनोक्तेन देवर्षे पाताळे चांतरे भुवि ।
नास्ति नास्ति समं क्षेत्रम तस्तत्र वसाम्यहं ॥

पृथ्वीवर, आकाशांत व पातालांत या क्षेत्राच्या बरोबरीचें एकहि क्षेत्र नाहीं. नामदेव म्हणे ज्योतीची निज जोती । ते हे उभी मूर्ति विटेवरी ॥ १ ॥ शून्य निरसूनि राहिलें निर्मळ । तें दिसे केवळ विटेवरी ॥ २ ॥ नाथांनी सुद्धां एके ठिकाणी म्हटलें आहे की—पावन पांडुरंग क्षिति । जे कां दक्षिण द्वारावती । जेथ विराजे विठ्ठलमूर्ती । नामे गर्जती पंढरी ॥ १ ॥ आषाढी व कार्तिकी एकादशीच्या दिवशी विठोबाच्या दर्शनसुखाचा लाभ घेण्या-

नोंद नं. ७०५
स्थळ प्रत
नं. ८९७

करितां या पुण्यक्षेत्री हजारों नव्हे लाखों भगवद्भक्त थंडी, वारा, पाऊस पाणी इत्यादींस न जुमानतां येत असतात व श्रीपांडुरंगाच्या नामसंकीर्तनानें सर्व क्षेत्र निनादित करून टाकतात.

खऱ्या सनातन धर्माचा प्रसार करून देवाचें द्वार भेदभाव न ठेवितां सर्वांस मोकळे ठेवण्याकरितांच संतांचा उदय झाला व त्यामुळेंच पंढरी क्षेत्राचें महात्म्य अत्यंत वाढलें. तसेंच संतांचा जन्म ज्या ज्या स्थानीं होतो, त्या त्या स्थानांनाहि त्यांच्या पुण्याईमुळें महत्व प्राप्त होत असतें.

पवित्र तें कुळ पावन तो देश । जेथें हरिचे दास जन्म घेती ॥

—तुकाराम.

भागवत धर्ममंदिराचा पाया घालणारे श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्या पुण्याईनेंच १३ व्या शतकांत आळंदीचें महात्म्य वाढलें. सोळाव्या शतकांत पैठण क्षेत्र उदयास आलें. या ठिकाणीं महात्मा श्रीएकनाथ यांचा अवतार झाल्यामुळें या क्षेत्राची सर्वत्र ख्याति झाली. तद्वतच सतराव्या शतकांत साधुश्रेष्ठ तुकाराम महाराज हे देहूस अवतीर्ण झाल्यामुळें देहूची क्षेत्रांत गणना होऊन तें अधिक लोकप्रिय झालें.

धन्य देहू गांव पुण्यभूमी ठाव ।
तेथें नांदे देव पांडुरंग ॥ १ ॥

असें तुकोबानीं म्हटलें आहे. देहू येथें विठ्ठल-रखुमाईचें देऊळ आहे. तें विश्वंभर बोवांनीं बांधलें. या संबंधीं अशी आख्याइका आहे कीं, या देवालयांतील विठोबा-रखुमाईची मूर्ति विश्वंभर बोवास विठोबानीं स्वप्नांत येऊन सांगितल्याप्रमाणें देहू गांवापासून एका मैलाचे अंतरावर ओहोळा नजीक एका आम्रवृक्षाखालीं जमिनींत सांपडली, म्हणून त्या आंब्याच्या झाडाला

" विठ्ठल आंबा " असें म्हणत असत. हल्लीं तो वृक्ष तेथें नाहीं; पण तें ठिकाण तेथील लोक दाखवितात.

तुकारामाचे पूर्वज सातवे पुरुष विश्वंभर बोवा ते हेच होत. हे मोठे धर्मनिष्ठ असून साधुसंतांविषयीं यांस आदर वाटत असे. विठ्ठलाचे निःसीम भक्त असल्यामुळें एकादशीला पंढरीची वारी ते मोठ्या आस्थेनें करीत असत. विश्वंभर बोवाला दोन मुलगे होते. हरि व मुकुंद. हे दोघेंहि क्षत्रिय वृत्तीचे निघाले. हरीचा मुलगा विठोबा, विठोबाचा पदाजी, पदाजीचा शंकर, शंकराचा कान्हया व कान्हयाचा बोल्होबा. बोल्होबा हेच तुकारामाचे वडील होत.

---

## जन्मकाळ.

बोल्होबा, विश्वंभर बोवाप्रमाणेंच विठोबाचे भक्त असून आपला व्यवहार उत्तम रितीनें चालवित असत. संसार धंदा करीत असतांना ते विठोबास विसरत नसत.

क्षुधार्तासि घालीत अन्न । तृषाक्रांतासि देत जीवन ॥
साधुसंत वैष्णव जन । त्यांचें पूजन करावें ॥ महिपती.

असा त्यांचा नित्यक्रम असे. ते भाविकपणें प्रत्येक एकादशीस पंढरीची वारी करीत असत. त्यांनीं २४ वर्षें पंढरीची वारी केली. त्यांची स्त्री कनकाई महासाध्वी असून तीहि पतीबरोबर वारी करीत असे. बोल्होबा पूर्वजांचाच किराणा विक्रीचा धंदा करीत. त्यांना बरींच वर्षें संतति नव्हती; पण पुढें वयाच्या चाळीशी नंतर त्यांना तीन पुत्र व एक कन्या, अशीं चार आपत्यें झालीं. या सर्वांचे जन्म कोणकोणत्या काळीं झाले, त्याचा नक्की शोध अद्यापि लागला नाहीं. खुद्द तुकोबांचा जन्मकाळसुद्धां योग्य इतिहासाच्या अभावीं आज निश्चितपणें ठरवितां येणें अशक्य झालें आहे. त्यांच्या जन्म काळासंबंधीं आतांपर्यंत बरीच भिन्न मतें प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत,

नवनीताच्या प्रथम आवृत्तीत कै. परशुरामपंत तात्या गोडबोले यांनीं तुकोबांचा जन्मशक १५१० माघ शु० ५ गुरुवार असा दिला आहे. व तोच शक कवि चरित्रकार कै० जनार्दन रामचंद्र यांनीं घेतला आहे. "हिंदुस्थान कथारस" या ग्रंथाचे कर्ते कै० विनायक कोंडदेव ओक यांनीं सुद्धां तुकोबांचा जन्म शक १५१० दिला आहे.

प्रसिद्ध इतिहासकार कै० विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांना, वांई प्रांतीं सांपडलेल्या एका वंशावळींत 'तुकोबांचा जन्म शके १४९० त झाला,' असें म्हटलें आहे व तोच तुकोबांचा खरा जन्म शक असावा, असें त्यांचें म्हणणें होतें.

खुद्द तुकोबांची जी वंशावळ आहे, त्यांत त्यांचा जन्म शके १५२० माघ शु० ५ गुरुवार रोजीं झाला, असें म्हटलें आहे. पण ह्या शकांत माघ शु० पंचमीला गुरुवार येत नाहीं.

महाराष्ट्र सारस्वतकर्ते कै० वि. ल. भावे यांचें म्हणणें तुकोबांचा जन्म शके १४९९ त झाला असला पाहिजे असें होतें. त्यांना १५२९ हा शकहि मान्य होता. पण त्यांचा विशेष कल १४९९ हाच शक मानण्याकडे होता.

संतलीलामृतांत महिपतीनीं तुकोबांचा जन्म कोणत्या शकांत झाला, हें स्पष्टपणे कोठेंच म्हटलेलें नाहीं. पण त्यांनीं वर्णिलेल्या इतर गोष्टींचा कसा-तरी मेळ घालून रा. ल. रा. पांगारकर यांनीं शके १५३० जन्मशक मान्य केला आहे. व तो इतर कांहीं चरित्रकारांनीहि मान्य केला आहे. पण या शकांत माघ शुद्ध पंचमीला गुरुवार येत नाहीं, ही अडचण उद्भवतेच.

ह्याप्रमाणें तुकोबांचा जन्म शक प्रत्येकानें अनुमानानें निरनिराळा ठरविला आहे. त्याला निश्चित असें कांहींच प्रमाण नाहीं. कालगणनेचा विचार

इतिहास दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. अनुमानानें काल निश्चित ठरविल्यानें कधीं कधीं मिथ्या संबंध जोडले जातात, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. आमच्या येथें चरित्र ग्रंथ फार थोडे आहेत. त्यांत संतांच्या चरित्र ग्रंथांची फारच उणीव आहे. याचें कारण पूर्वींच्या लोकांना इतिहास दृष्टीचें महत्व विशेष वाटलें नाहीं, असें दिसतें. अर्थात् ते उदासीन राहिले व तेणेंकरून संतांविषयींची यथास्थित माहिती मिळविण्याचें काम अत्यंत कठीण झालें. आतांपर्यंत संतांचीं जीं कांहीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांत दंतकथांवरच ज्यास्त भिस्त ठेवण्यांत आली आहे. विश्वसनीय माहितीच्या अभावीं असें होणें साहजिक आहे असें म्हणतां येईल. पण ही सबब ठीक नाहीं. या कामीं ज्या दिशेनें प्रयत्न व्हावयास पाहिजेत त्या दिशेनें ते न झाल्यामुळें प्रसिद्ध झालेल्या चरित्रग्रंथांत पुष्कळ गोष्टी अविश्वसनीय अशा राहिल्या आहेत. तुकोबांच्या चरित्राची तीच गोष्ट होय. तुकोबा प्रयाणकाळीं वृद्ध होते किंवा तरुण होते, या साध्या गोष्टीचा जेथें निर्णय करितां येत नाहीं, तेथें त्यांच्या इतर गूढ गोष्टीविषयीं नमूद केलेली माहिती विश्वसनीय आहे, असें कसें मानतां येईल ?

आतां वर दिलेल्या सर्व जन्म शकांचा साधक बाधक रीतीनें विचार केला तर नवनीतांत कै० परशुरामपंत तात्यानीं दिलेला जन्म शके १५१० हाच सर्वतोपरी जुळण्यासारखा असल्यामुळें ग्राह्य वाटतो. या शकाब्दीं मासतिथिवारहि जुळतात. १४९० किंवा १५३० या दोन्ही शकांत माघ शुद्ध पंचमीला गुरुवार येत नाहीं. शक चुकला तरी मास तिथिवार चुकणें कधींहि शक्य नाहीं. म्हणून १५१० हाच शक सयुक्तिक असून तो मान्य केला म्हणजे तुकोबांचें अंतःकाळचें वय ६१ येतें. आणि हें आयुर्मान घेतलें तरच तुकोबांचें सर्व चरित्र त्या अवधींत चांगलें बसतें.

जरा कर्णमूळीं सांगो आली गोष्टी । मृत्यूचिये भेटी जवळी आली ॥ १ ॥
आतां माझ्या मना होई सावधान । हे पुण्याची जाण कार्य सिद्धि ॥ २ ॥
शेवटील घडी बुडतां न लगे वेळ । साधावा तो काळ जवळी आला ॥३॥
तुका म्हणे चिंती कुळीची देवता । वाराचा भोंवता मिथ्या शब्द ॥ ४ ॥

या अभंगावरून सुद्धां मृत्यूची भेट जवळ आली असें कानांत सांगणारी जरा ह्मणजे म्हातारपणाची स्थिति तुकोबांस प्राप्त झाली होती असें स्पष्ट होतें. काळ संनिध येत आहे ' शेवटील घडी बुडतां न लागे वेळ ' असें तुकोबांना वाटलें तें वयाच्या ४० वर्षांपूर्वी वाटणें मुळींच शक्य नाहीं. ह्मातारपणी गात्रे शिथिल झाल्यामुळें

काय तें सामर्थ्य नचले या काळे । काय झाली बळे शक्ति हीन ॥
मागें बहुत झाले खेळ । आतां बळ बोसरलें ॥

तरुणपणांत ज्या गोष्टी घडल्या त्या आतां बळ ओसरल्यामुळें होणें शक्य नाहींत.

आम्हां लागलेंसें पाठी । बालत्व तारुण्य काठी ॥

या ठिकाणीं वार्धक्य म्हणजे म्हातारपण असें न म्हणतां केवळ यमक जुळविण्यासाठीं " काठी " म्हातारपणाची खूण दर्शविणारा शब्द योजण्यांत आला आहे.

छत्रपती शिवाजी राजे यांनीं तुकोबांस बोलवणें पाठविलें, त्यावेळीं तुकोबांनीं त्यांस पाठविलेल्या पत्रांत एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, आम्हांस तुमचेजवळ कांहीं मागावयाचें नाहीं, मग उगाच भेटीची यातायात कशाकरितां करावयाची ? आमचा आतां वृद्धापकाळ झाला आहे.

घेऊनिया भेटी कोण हा संतोष ? । आयुष्याचे दोस गेले गेले ॥

या उद्गारावरून सुद्धां तुकोबांना म्हातारपणाची स्थिति प्राप्त झाली होती, या गोष्टीला पुष्टीच मिळते.

आतां मरण समयीं ते वृद्ध होते, असें मानलें तर त्यावेळीं त्यांची स्त्री ५ महिन्यांची गरोदर होती; अर्थात् अशावेळीं तुकोबा प्रजोत्पादन-समर्थ असणें शक्य आहे काय ? पण ही शंकाच अस्थानीं आहे. अशा वयांत पुत्रोत्पत्ति झाल्याची जगात अनेक उदाहरणें आहेत. श्रीज्ञानेश्वर महाराजांचे आजोबा गोविंदपंत यांना ५५ व्या वर्षीं निराबाईचे पोटीं पुत्र संतान झालें. त्याचे नांव विठ्ठलपंत हें सर्वश्रुत आहे. तसेंच राहुरी तालुक्यांत असलेले ताराबाद येथील दादोपंत कुळकर्णी, हे महिपतीचे वडील होत. दादोपंतास मुली होत्या, पण पुत्रसंतान नव्हतें. तें त्यांना त्यांच्या ६० व्या वर्षीं झालें. यावरून ६० वर्षें वयाचा मनुष्य प्रजोत्पादनसमर्थ नसतो, असें कोणीहि व्यवहारज्ञ मनुष्य ह्मणणार नाहीं.

तुकोबांना पहिल्या बायकोपासून झालेला मुलगा दुष्काळांत मरण पावला. त्यावेळीं त्याचें वय ८-१० वर्षांचें होतें, असें मानण्यांत येतें; अर्थात् प्रसूतीच्या काळीं त्याच्या आईचें वय कमीत कमी १४ वर्षांचें तरी असले पाहिजे. दुष्काळाचे वेळीं तुकोबांचें वय २२ वर्षांचे धरलें तर त्यांच्या पहिल्या बायकोचें वय दोन वर्षांनीं अधिकच ठरतें. शिवाय तुकोबांचें त्या वेळचें वय ध्यानांत घेतां त्या वयांत त्यास पुत्रलाभ होण्याची शक्यता दिसत नाहीं. अर्थात् याहि दृष्टानें १५३० हा जन्म शक मानतां येत नाहीं.

तुकोबांना गुरूपदेश झाला होता, असें गृहीत धरून चाललें तरी त्यांना ज्यांनीं स्वप्नांत उपदेश केला, त्या बाबाजी चैतन्यांचा काळ शके १४९२ त झाला, असें म्हटले आहे. व पुढें तीस वर्षांनंतर त्यांनी तुकोबावर अनुग्रह केला.

बाबाजी चैतन्य योगीराज धन्य । तुकया लागून प्रकटले ॥ १ ॥
शालिवाहन शकें चौदाशें ब्याण्णव । प्रजापति नाम संवत्सरीं ॥ २ ॥
वैशाख वद्य द्वादशीचे दीनीं । समाधि स्वामीनीं घेतलीसे ॥ ३ ॥

नोंद नं.
ठाणे
स्थळ प्रत
सं. नं.
ता.

तेथुनि तीस वर्षां भेटी तुकयासी । देऊनी त्यासी पूर्णपणें ॥ ४ ॥
महीपति म्हणे जाले समाधिस्थ । तुकया क्रीडत ब्रह्मानंदे ॥ ५ ॥

यावरून तुकोबांना बाबाजी चैतन्यांनी केलेल्या उपदेशाच्या कालाचा जम बसत नाहीं. "तीस वर्षां" याचा अर्थ तीस पसतीस असा केला, तरी अनुग्रहाचा शक १५२८ होईल; पण तुकोबांचा जन्म शक १५३० मानला तर जन्मापूर्वींच त्यांना उपदेश झाला होता, असें ह्मणावें लागेल. अर्थात् या विसंगततेमुळें तुकोबांचा हा जन्म शक मानतां येणें मुळींच शक्य नाहीं.

शिवाय १५३० हा जन्मशक मानला तर तुकोबांचें अवघें वय ४१–४२ वर्षांचें होतें असें मानावें लागतें. तुकोबा स्वता शास्त्रग्रंथ वाचून व ज्ञान संपादन करून ईश्वर भक्तींत तल्लीन झाले होते, इतकेंच नव्हे तर त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें सामाजिक, धार्मिक, नैतिक, अध्यात्मिक वगैरे विषयांवर अवाढव्य ग्रंथरचनाहि केली होती. त्यावरून त्यांचें ज्ञान व निरीक्षण विस्तृत असल्याचें दिसून येतें. पण ह्या गोष्टी त्यांस इतक्या अल्पावधींत म्हणजे पूर्वींचीं वयाची २१ वर्षें सोडलीं तर पुढच्या अवघ्या वीस वर्षांत साध्य झाल्या असें मानणें अशक्य कोटींतील होय. तुकोबांच्या वाणीतून जवळ जवळ ६ कोटी अभंग निघाले आहेत. समर्थांना एक दासबोध ग्रंथ पूर्ण करण्याला १५ वर्षे लागलीं. त्या मानानें तुकोबांच्या अभंगांची संख्या किती तरी मोठी आहे. इतके अभंग एकाच वेळीं एकाच अधिकार भूमीवर आरूढ असतांना त्यांच्या वाणीतून निघालेले नाहींत. तर ते बद्ध, मुमुक्षु, साधक, व सिद्ध अशा निरनिराळ्या भुमिकांवर येत असतां त्या त्या प्रसंगाला अनुरूप असे हे अभंग निघालेले आहेत व त्यांत त्यांनीं स्वतःचें हृद्गत ओतलें आहे.

त्यांच्या अभंगांत कालानुक्रम कळण्याचें कांहीं साधन नसल्यामुळें

त्यांत परस्पर विरुद्ध अशीं वचनें असल्याचें दिसतें. पण तीं एकाच व्यक्तीचीं असल्यामुळें त्यांची नीट संगति लावली म्हणजे तीं विरुद्धशीं भासणार नाहीत. संतांच्या उपदेशांत असा विरोध वारंवार दिसतो. निरनिराळ्या परिस्थितीत निरनिराळ्या माणसांशीं संबंध आल्यामुळें त्यांचीं वचनें विरुद्धशीं वाटतात. पण तीं जेथली तेथें समजावून घेतली म्हणजे हा विरोध राहात नाहीं. रोगग्रस्त झालेल्या मनुष्यास वैद्य त्याची स्थिति पाहून भेषज देतो, तद्वत संतांचा उपदेश असतो. त्याचा व्यवस्थितपणें विचार केला म्हणजे गैरसमज दूर होतो.

श्रीसमर्थ रामदास व तुकाराम यांचो या दृष्टीनें तुलना केली तर तुकोबांच्या ठायीं या अल्पशा अवधींत इतकी योग्यता येणें अशक्य आहे असेंच वाटतें. ते अशक्त प्रकृतीचे होते किंवा रोगग्रस्त होते, म्हणून त्यांना इतक्या लवकर मरण आलें, असाहि त्यांच्यासंबंधीं उल्लेख केलेला कोठें आढळत नाहीं. तुकोबा हीन जातींत जन्मलेले तर समर्थ उच्च कुलांत जन्मलेले. तुकोबाकडे कुल परंपरागत पांडुरंगाची उपासना करण्याचा वारसा आलेला होता, तर रामदासामध्यें रामोपासनेचे अनुवंशिक संस्कार होते. रामदासांनीं लहानपणींच घर सोडलें होतें. तुकोबा संसारांत राहूनच देवाकडे वळले. रामदासांनीं टाकळीस येऊन १२ वर्षे पुरश्चरण केलें व १२ वर्षे तीर्थयात्रा केली, तेव्हांच त्यांना पुढें आपल्या भक्तिवैराग्याची महाराष्ट्रावर छाप पाडतां आली. त्यांना ७३ वर्षांचें आयुर्मान लाभलें होतें. अर्थात् घर सोडल्यापासून जें ध्येय साधण्याला रामदासांना २५–३० वर्षें लागलीं, तें साध्या शुद्र कुळांत जन्मलेल्या तुकोबांना ८–१० वर्षांत साध्य झालें, असें म्हणणें धाडसाचें होणार आहे. म्हणून या बाबतींत अधिक संशोधन व्हावयाला पाहिजे. तुकोबा अवतारी पुरुष होते म्हणून त्यांना ही स्थिति सहज प्राप्त करून घेतां आली, असें म्हणावयाचें असेल, तर रामदास सुद्धां त्याच दृष्टीनें अवतारी पुरुष होते, असेंच मानण्यांत येतें.

उत्तम गुणीं शृंगारिला । ज्ञान वैराग्यें शोभला ।
तोचि एक जाणावा भला । भूमंडळीं ॥ १ ॥ श्रीसमर्थ.

तुकोबा अवतारी पुरुष होते, अर्थात् त्यांच्या ठिकाणीं भक्ति, ज्ञान, वैराग्य इ० गुण जन्मसिद्ध होते, असें मानलें तर मग त्यांच्या ठायीं कार्य-कारण संबंध जोडण्याची मुळींच जरूरी राहात नाहीं. तसेंच त्यांना साधनातीत होतां आलें म्हणून त्यांचे गुणानुवाद गाण्याचेंहि प्रयोजन नाहीं. पण अलिकडे साधुसंतांच्या मागें जन्मसिद्धपणा जुळविण्याचा हा प्रघात बराच पसरलेला दिसत आहे. तो अयोग्य असून मनुष्याच्या मनावर त्याचा दुष्परिणाम झाल्यावांचून राहत नाहीं.

तुकोबा हे नामदेवाचे अवतार होत, इतकेंच नव्हे तर अम्बरीषराजापासून ते अवतार घेत आले आहेत, असेंहि कांहीं चरित्रकारांनी त्यांच्यासंबंधी वर्णन केलें आहे. "अंबरीष प्रल्हाद अंगद । उद्धव नामया नामाचा बोध ॥" अंबरीषराजानंतर नृसिंह अवतार झाला, त्यावेळीं तुकोबा प्रल्हाद होते. श्रीराम अवतारांत हे अंगद होते. कृष्णावतारीं ते उद्धव झाले. पंढरीस विठोबा आले तेव्हां प्रथम ते नामदेव व नंतर तुकोबा झाले ह्याप्रमाणें तुकोबांच्या पूर्वावतारांविषयीं म्हटलें आहे.

साधुसंतांनी केलेल्या थोर कामगिरी संबंधानें वर्णन करितांना त्यांच्या ठिकाणीं अवतारित्व चिकटविल्यानें त्यांच्या गुणांचे अनुकरण करतां येणें प्राकृत मनुष्याच्या शक्तीबाहेरचें ठरतें व अशा असंबद्ध सिद्धांतानें मानवी कोटींतील प्राण्यास संत होतां येणें शक्य नाहीं, असें वाटून त्यांच्या ठिकाणीं मनुष्य प्रयत्नाविषयीं निराशेचे विचार उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहींत.

संत अवतारी पुरुष होते म्हणून त्यांना तेजस्वी महत्कार्यें करतां आलीं व त्यांचीं चरित्रें उज्ज्वल झालीं. सामान्य मनुष्यांकडून तसें होणें शक्य नसल्यामुळें त्यांना त्यांच्या चरित्रांपासून कांहींच बोध घेतां येणार नाहीं. मग संतांचीं चरित्रें लिहून प्रसिद्ध करण्यांत फायदा तरी कोणता ? सामान्य माणसाच्या हातून मोठमोठीं कार्यें होणें अशक्य आहे, ही विचार-सरणीच दुर्बल असून राष्ट्राचा घात करणारी आहे. अशा भ्रामक समजुतीनें उद्योग तत्परतेविषयीं लोकांच्या ठायीं अनास्था उत्पन्न होऊन कार्याचा विघात व्हावा, यांत नवल नाहीं.

प्रत्येक जीव हा ईश्वराचा अंश असल्यामुळें तो परमात्म्याचा अवतारच आहे " ममैवांशो जीव लोके जीव भूत: सनातन: " " कर्मभूमींत जीव हा माझाच सनातन अंश आहे. मीच एका अंशानें सर्व विश्व व्यापून राहिलों आहे, " असें भगवंतांनीं गीतेंत अर्जुनाला सांगितलें आहे. या सामान्य नियमाप्रमाणें प्रत्येक जीव हा ईश्वर स्वरूपच आहे. त्याच्या ठिकाणीं स्वत: ईश्वर होण्याचें सामर्थ्य आहे, म्हणजे त्याचे ठायीं जन्मत: ईश्वरत्वाचा विकास झालेला असतो, असें नाहीं. तर दीर्घोद्योगानें त्याला इश्वरकोटीस पोंचतां येतें, इतकेंच. अविद्येच्या योग मनुष्य आपल्या मूळच्या स्वरूपास विसरून देहादिकांच्या ठिकाणीं आपलेपणा मानूं लागला म्हणून संसारांत त्याला अनेक सुखदु:खें भोगावीं लागत आहेत. तो जर अविद्येला दूर करून स्वार्थत्याग, सत्यनिष्ठा, ईश्वरी प्रम, सात्विक वृत्ति, निर्मत्सरता इ० गुणांच्या योगे दैवी संपत्तीचीं सर्व लक्षणें आपणांत आणण्याचा प्रयत्न करील तर " महात्मा " या पदाला पोंचेल, यांत संशय नाहीं.

इक्षौ गुडस्तिले तैलं काष्ठे वन्हिर्दृषद्यय: ।
धेना वाज्यं वपुष्यात्मा लभ्यते चैव यत्नत: ॥ १ ॥ योगवासिष्ठ.

मोठ्या प्रयासानें गूळ ज्याप्रमाणें उसांतुन काढतां येतो, तेल तिळांतून काढतां येतें, काष्ठांत असलेला अग्नि मंथनानें निर्माण करतां येतो, पाषाणाचें लोखंड करतां येतें व गाईच्या दुधापासून तूप तयार करतां येतें, त्याप्रमाणें मनुष्याच्या देहांत स्वतःसिद्ध असणारा आत्मा महा प्रयासानेंच प्राप्त होतो.

शोधपूर्वक प्रशांत चित्तानें विचार केला तर असें दिसून येईल की, आजवर जगांत जे महान साधु किंवा जगदुद्धारक महात्मे झाले, त्यांनीं "महात्मा पद" ईश्वरी नियमांचा अवलंब करून स्वताच्या प्रयत्नानें मिळविलें आहे. ते जन्मसिद्ध महात्मे नव्हते. त्यांनीं देवाला ओळखिलें म्हणून ते महात्मे ठरले, बाकीचें क्षुद्रात्मे राहिले. ज्ञानदेव, एकनाथ, रामदास इ० जे संत झाले, ते याच यादींत येतात. प्रयत्नानें काय साध्य होत नाहीं ? मनुष्य जसजसा प्रयत्न करीत जातो तसतशी त्याच्या ठायीं योग्यता प्राप्त होत जाते. भावी उन्नतीच्या सदाशेला आपल्या हृदयांत आश्रय देऊन प्रयत्नपूर्वक स्वसामर्थ्याची शिकस्त करतो, तोच जीवनमार्गांत उन्नत पदाला जाऊन पोंहचतो. तुकोबा याच कोटींतील होते. ते जन्मसिद्ध "महात्मा" नव्हते. तर मनोभूमि भक्ति ज्ञान वैराग्यानें शुद्ध करून नंतर ते "महात्मा" या पदाला पोंचले. बरवें झालें आलों जन्मासी । जोड जोडिलें मनुष्य देहा ऐसी ॥ हे तुकोबांचेच उद्‍गार आहेत. मनुष्यदेह प्राप्त झाला म्हणून त्यांनीं आनंद व्यक्त केला आहे. त्यांचें चरित्र यत्नप्रधान आहे.

अंबरीष राजा धर्मनिष्ठ असून मोठा वैष्णवभक्त होता. त्यानें गर्भवासांतून मुक्त होण्याकरितां एकादशी व्रताचें मोठ्या निष्ठेनें आचरण केलें. पण दुर्वासऋषीच्या शापानें त्याचें व्रत निष्फळ होऊन, एकच नव्हे तर दहा

गर्भवास सोसण्याचें त्याच्या कपाळीं आलें. म्हणून त्याला अत्यंत दुःख झालें. तेव्हां विष्णू प्रसन्न होऊन त्यांनीं स्वतः गर्भवास सोसण्याचें कबूल करून अंबरीष राजाला त्यांतुन मुक्त केलें. तुकोबा म्हणतात—

भक्तांच्या कैवारें कष्टलीस विठ्ठले ।
अंबऋषी कारणें जन्म दहा घेतले ॥

वस्तुस्थिति अशी असतां अंबरीष पुनः जन्मास आले, असें म्हणणें अयुक्त होय.

तुकोबा प्रल्हादाचा अवतार म्हणावें तर त्यांनीं—

प्रल्हादा कारणें स्तंभीं अवतार केला ।
विदारूनि दैत्य प्रेम पान्हा पाजिला ॥

असे उद्गार काढले आहेत. प्रल्हादाला त्याच्या बापानें अनेक प्रकारें त्रास दिला. त्याला तापलेल्या तेलाच्या कढईंत टाकलें, अग्नींत टाकलें, उंच डोंगराच्या कड्यावरून लोटून दिलें, तरी प्रल्हादाला मुळींच दुःख झालें नाहीं. पण लोहगांवीं तुकोबांवर एका बाईनें कढत पाणी टाकतांच त्यांच्या अंगाला फोड आले व त्यांना त्यापासून दुःसह वेदना झाल्या. मंबाजीनें काठानें झोडपलें त्यावेळीं सुद्धां त्यांना अत्यंत दुःख झालें. तुकोबा प्रल्हादाचा अवतार असते तर ते 'प्रल्हादा कारणें स्तंभीं अवतार । माझा कां विसर पांडुरंगा ॥ १ ॥' असें उद्गार काढते ना. तसेंच ते नामदेवाचेहि अवतार नव्हते असें त्यांच्या पुढील अभंगावरून सिद्ध होतें. ते नामदेवाचे अवतार असते, तर नामदेवांनीं प्रत्यक्ष स्वप्नांत येऊन त्यांना जागें केलें नसत.

स्थळ प्रत
सं. मु. नं. ८९

नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ॥ १ ॥
सांगितलें काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नको ॥ २ ॥
माप टाकी सळ धरिली विठ्ठलें । थापटोनि केलें सावधान ॥ ३ ॥
प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी । उरलें तें सेवटीं लावी तुका ॥ ४ ॥

असें तुकोबांनींच स्वतां म्हटलें आहे. पांडुरंगासवें नामदेवांनीं स्वप्नांत येऊन तुकोबांस कवित्व करण्यास सांगितलें. व ही आज्ञा मान्य करून नामदेवाचा शतकोटी अभंग करण्याचा संकल्प पूर्ण केल्याबद्दल " नामयाची बाकी फेडियली " असे उद्‌गार तुकोबांनीं शेवटीं काढले आहेत. या एकाच गोष्टीवरून तुकोबा नामदेवाचे अवतार नव्हते, असेंच सिद्ध होतें. ह्याशिवाय त्यांच्या अभंगांतून पुष्कळ पुरावा पुढें करतां येण्यासारखा आहे.

जन्म मृत्यु फार झाले माझ्या जीवा । ऐक माझा धांवा पांडुरंगा ॥
सिणलों बहुता करितां येरझारा । रखुमाइच्या वरा पाव वेगीं ॥
तुका म्हणे तूं गा पतित पावन । घेई माझा सीण जन्मांतर ॥

× × × ×

पूर्वीं भक्त झाले सर्व आपंगिले । नाहीं उपेक्षिले कोणी एक ॥
माझिया वेळेसि कां गा लपलासी । विश्व पोसितोसी पांडुरंगा ॥
माझे हातीं देईं आतां मनबुद्धि । विठो दयानिधी माय बापा ॥
तुका म्हणे तूंचि सर्व सूत्रधारी । इतराची हरी नाहीं सत्ता ॥

\+ + + +

पूर्वीं बहुतांचे केले प्रतिपाळ । ते मज सकळ श्रुत आहे ॥
तयांचिये वेळे होसी कृपावंत । माझाचि कां अंत पाहातोसी ॥
तुका म्हणे कां गा झालासी कठीण । माझा भाग सीण कोण जाणें ॥

एके वेळीं तुकोबा वारीबरोबर पंढरीस गेले असतां त्यांना मागील संतांच्या आठवणी होऊन ते म्हणतात—

बोले बोले त्रो विठ्ठले । आम्ही तुझें काय केलें ॥
एकनाथ काय काका । त्याचें पाणी वाहसी फुका ॥
नामदेव काय माउसा । त्याचे संगे जेविसी कैसा ॥
तुका म्हणे घेतली आळ । सलगीनें बोले बाळ ॥

तसेंच दुसरे एका प्रसंगीं ते म्हणतात—

उद्धव अक्रूर व्यास अंबऋषि । भाई नारदासी गौरवीन ॥
निवृत्ती ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ॥

वरील अभंगांवरून तुकोबा अंबरीषादिकांचे अवतार होत, असें मुळींच म्हणतां येत नाहीं.

अवतारित्वाचा सिद्धांत याप्रमाणें समूळ नष्ट झाल्यावर तुकोबांनीं स्वता महाप्रयास करून आपल्या आयुष्यांत सिद्धि मिळविली असेंच त्यांच्या चरित्रावरून स्पष्ट होतें. तसें नसतें तर

बहुता जन्मींचा झालों भारवाही ॥ सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥ १ ॥

इ० मोठया दुःखाचे उद्गार त्यांनीं केव्हांहि काढले नसते. संसाराच्या तापानें तापून तुकोबा साधन मार्गाकडे वळले. त्रिगुणात्मक प्रकृतीच्या पसाऱ्यांतून सुटण्याकरितां त्यांना अत्यंत परिश्रम करावे लागले. भूक तहान इ० देहधर्म मरेपर्यंत सुटत नाहींत, असें जाणून चित्त शुद्धि-करितां त्यांनीं इंद्रियनिग्रह करण्याचा प्रयत्न केला व अभ्यासानें शनैः शनैः हें सामर्थ्य वाढवून चित्त स्थिर केलें. व अशा क्रमानें एकेक पाऊल पुढें टाकीत टाकीत शेवटीं त्यांनीं आत्मनिष्ठ स्थिति प्राप्त करून घेतली. "नर करनी करे तो नरका नारायण होय" ही म्हण तुकोबांनीं आपल्या आयुष्यांत सार्थ केली. त्यांना पांडुरंगाची प्रत्यक्ष भेट होतांच अनंतजन्मींचा शीण नाहींसा झाला असें त्यांनीं म्हटलें आहे.

अनंत जन्मींचा शीण उतरला । सद्गुरु भेटला सदानंद ॥ १ ॥
सदानंद माझा पांडुरंग पूर्ण । मायादि कारण विश्वबीज ॥ २ ॥

यावरून शुद्र कुळांत जन्मलेले तुकोबा जन्मसिद्ध महात्मे नसून दीर्घोद्योगानेंच ते परमावधीच्या जीवन्मुक्त स्थितीला पोंचून महात्मा झाले.

संतजन परी कोण ओळखावें । कैसे ते जाणावे साधू जन ॥
सारिखाचि दीसे जनाचिये परी । परी तो अंतरी वेगळाची ॥
वेगळाचि ज्ञानें पूर्ण समाधानें । स्वस्वरूपीं मनें वस्ती केली ॥
वस्ती केली मनें निर्गुणीं सर्वदा । मीपणें आपदा तया नाहीं ॥
तया नाहीं काम तया नाहीं क्रोध । तया नाहीं खेद स्वार्थ बुद्धि ॥
बुद्धि निश्चयाची स्वरूपी तयाची । कल्पना ठायींची निर्विकल्प ॥
निर्विकल्प मदमत्सर सारीला । आणि संहारिला लोभ दंभ ॥
दंभ हा लौकिक विवेके सांडीला । दुरी ओसंडीला अहंकार ॥
अहंकार नाहीं दुराशा अंतरी । ममताही दोरी मोकळली ॥
मोकळली भ्रांति शरीर संपत्ति । वैभव संगति लोलंगता ॥
लोलंगता नसे ज्ञानें धाले पणें । ऐसीं हीं लक्षणें सज्जनाचीं ॥—श्री समर्थ.

---

## संसार.

संसारा आलिया एक सुख आहे । आठवावे पाये विठोबाचे ॥
येणें होय सर्व संसार सुखाचा । नलगे दुःखाचा लेश कांहीं ॥
घेतील तयांसी सोपें आहे सुख । बोलियलें मुखें नारायण ॥
सांगितली सोय करुणा सागरें । तुम्हां कांहो बरें न वाटे तें ॥
तुका म्हणे तेणें उपकार केला । भोळ्या भाविकांला तारावया ॥

तुकोबांच्या जातकुळीसंबंधीं पुष्कळांचा गैरसमज असलेला दिसून येतो. वामन पंडितांनीं तुकोबाला वाणी म्हटलें आहे.

जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी । कसें हो म्हणावें तयालागी वाणी ॥

संत देवदास सुद्धां त्यांना वाणीच समजत होते.

जातीचा वाणी तुकाराम । तुझ्या भजनीं अत्यंत प्रेमा ।
त्या पावलासी पुरुषोत्तमा । उदकीं कागद तारिले ॥

पण हा समज किती चुकीचा आहे, हें तुकोबांच्या पुढील अभंगावरूनच स्पष्ट होतें. तुकोबांचे पूर्वज कित्येक पिढया वाण्याचा धंदा करीत आले व तोच धंदा तुकोबांनीहि केला, म्हणून लोक त्यांना "वाणी" म्हणून संबोधित असावेत असें वाटतें.

याति शूद्र वैश्य केला व्यवसाय । आदि तो हा देव कुळ पूज्य ॥

खुद्द तुकोबांच्याच ह्या म्हणण्यावरून ते जातीनें शूद्र[1] होते, असेंच म्हणावें लागतें. "शूद्र याति माजि निश्चित । जन्मला तुकाराम वैष्णव भक्त" असें महिपतीनींहि म्हटलें आहे. नीच जातींत जरी जन्म झाला, तरी तुकोबा स्वतांच्या कर्तबगारीनें जगांत श्रेष्ठ ठरले. त्यांचे वाडवडील भगवद्भक्तिपरायण निपजल्यामुळें तुकोबांचाहि पिंड अनुवंशिक संस्कारानें भक्तिरसमय द्रव्याचाच बनला होता. मनुष्य जन्मास येतो, तेव्हां त्याच्या ज्ञानतंतूंची घटना त्याचे आईबाप व त्यांचे पूर्वज यांच्या अनुवंशिक संस्काराप्रमाणें असते.

---

१ टीप:—तुकोबा जातीनें मराठे ( क्षत्रीय ) होते. ते स्वतां "शुद्रवंशीं जन्मलो" म्हणून म्हणत, याचें कारण त्यावेळी ब्राम्हणेतर सर्वच वर्ण शुद्र ठरविण्यांत आले होते. " कलावाद्यंत संस्थिति " कलींत फक्त ब्राम्हण व शुद्र असे दोनच वर्ण आहेत. अशा समजुतीनेंच तुकोबांनीं स्वतांला शुद्र म्हटलें असावे; पण त्यांच्या वंशांतील लोकांचा शरीर संबंध मराठे लोकांशीं होत आहे. ते स्व ला ' मोरे ' म्हणवितात. विश्वंभरबोवाचे दोन पुत्र हरि व मुकुंद हे क्षत्रिय वृत्तीचे निघून लढाईवर गेल्याचें प्रसिद्धच आहे. प्रो० राजाराम रामकृष्ण भागवत यांनीं सुद्धां आपल्या एका निबंधांत ' तुकोबा क्षत्रिय जातीचे होते, ' असें म्हटलें आहे.

४०३२

तुकोबांचें बाळपणचें आयुष्य मातापित्यांच्या शांतिदायक छायेखाली मोठया सुखांत गेलें. हिशेबादि जमाखर्च ठेवण्यापुरतें शिक्षण त्यांच्या वडिलांनीं बाळपणांतच त्यांस दिलें होतें. तसेंच त्यांना भक्तीचें बाळकडूहि बाळपणांतच मिळालें होतें. सर्व मुलांत तुकोबा मोठे बुद्धिमान असल्यामुळें आईबापांचें त्यांजवर विशेष प्रेम असे. तुकोबांचीहि मातृपितृ भक्ति दांडगी होती. त्यांचें मातापित्यावर अत्यंत प्रेम होतें.

मायबापें केवळ काशी । तेणें नवजावें तीर्थासी ॥ १ ॥
पुंडलिकें काय केलें । परब्रह्म उभें ठेलें ॥ २ ॥
तैसा होई सावधान । हृदयीं धरी नारायण ॥ ३ ॥
तुका म्हणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ॥ ४ ॥

बोल्होबांनीं मुलें मोठीं झाल्यावर सर्वांचीं लग्नें केलीं. व व्यवहारांत सर्व अनुकूलता असल्यामुळें त्यांचा संसार मोठया सुखाचा झाला. अशा प्रकारें सुखाचे दिवस कंठीत असतां बोल्होबांस सृष्टिक्रमाप्रमाणें वार्धक्य स्थिति प्राप्त झाली. महिपती म्हणतात—

ऐशारीती सारतां काळ । वार्धक्य दशा आली केवळ ॥
मग सावजी पुत्र ते वेळ । आपणा जवळ बोलाविला ॥ १ ॥
म्हणे आतां आमचें वार्धकपण । तूं वडील पुत्र सुजाण ॥
तरी संसारांत घालोनि मन । देणें मागणें सांभाळीं ॥ २ ॥

याप्रमाणें बोल्होबांनीं वडील मुलगा सावजी यास जवळ बोलावून संसार चालविण्यास सांगितलें. पण सावजीचें मन प्रपंच्यांत नसल्यामुळें त्यानें वडिलांचें म्हणणें मान्य केलें नाहीं—

मी प्रपंची न गुंते सर्वथा । तीर्थाटनासि जावें आतां ॥
वैराग्य चित्ता । येतसें ॥ १ ॥

असें सावजीचें निराशेचें भाषण ऐकून बोल्होबांस वाईट वाटलें. तेव्हां त्यांनीं तुकोबांस बोलावून त्यांस वरील प्रमाणेंच संसार चालविण्याविषयीं आज्ञा केली.

देणें घेणें उदीम हातवटी । तोटया नफ्यांत असावी दृष्टि ।
जेणें स्वहित होईल शेवटीं । तैसी गोष्टी करावी ॥ १ ॥ महिपती.

तुकोबांनीं ही वडिलांची आज्ञा मोठ्या आनंदानें मान्य केली. तेव्हां बोल्होबांस मोठा संतोष वाटला. " जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच " तुकोबांनी संसाराचा भार आपल्या शिरावर घेतला तेव्हां ते चांगले वयांत आले असले पाहिजेत. त्या वेळीं त्यांना सर्व गोष्टी चांगल्या अनुकूल होत्या.

माता पिता बंधु सज्जन । घरीं उदंड धन धान्य ॥
शरीरीं आरोग्य लोकांत मान्य । एकही उणें असेना ॥ १ ॥ महिपती.

अशी सर्व बाजूंनीं चांगली स्थिति असल्यामुळें तुकोबांचा संसारांत जम चांगला बसला. त्यांचा व्यवहार सचोटीचा असून नम्रता व परोपकारबुद्धि हे गुण त्यांच्यांत विशेष होते. त्यामुळें त्यांचा धंदाहि चांगला चालूं लागला. व्यापारांत जें धन मिळे त्याचा ते सत्कार्यीं व्यय करीत. याप्रमाणें संसार नीट चालला होता. पण भवितव्यता मोठी प्रबळ असल्यामुळें, ही गृहस्थिति फार वेळ टिकली नाहीं. तुकोबांच्या पहिल्या बायकोस दम्याची व्यथा असल्यामुळें बोल्होबांनीं त्यांचें पुण्यांतील गुळवे नांवाच्या एका सावकाराच्या

मुलीबरोबर दुसरें लग्न केलें होतें. तिचें नांव जिजाबाई असें होतें. तिला आवळी असेंहि म्हणत असत. पण हें लग्न झाल्यानंतर लवकरच त्यांच्या मातापित्यांचा काळ झाला. तेव्हां तुकोबांस अत्यंत दुःख झालें. पुढें सावजीचेंहि कुटुंब निवर्तलें व तो घर सोडून तीर्थयात्रेस निघून गेला. त्या वेळीं संसाराचा सर्व भार तुकोबावरच पडला. पण थोडयाच अवधींत त्यांच्या संसारसमुद्रास सुखसमृद्धीची जी भरती येत होती, ती ओसरूं लागली. तुकोबांनीं प्रपंचाची स्थिति चांगली राखण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले. अनेक प्रकारचे वैश्यव्यवसाय केले, दूर देशीं जाऊन व्यापार केला, जेथें मालास चांगला भाव येईल तेथें तो विकावयास घेऊन जावें, अशा प्रकारें त्यांनीं बरीच खटपट केली. परंतु कांहीं केलें, कोठेंहि गेले तरी प्रपंचाला पुरेसा पैसा मिळेना. अशा स्थितींत भयंकर दुष्काळ पडून धारण शेराची झाली. तुकोबांचा व्यापार नीट चालेनासा झाला. लोकांकडे थकलेले पैसे वसूल होईनात. तेव्हां अत्यंत काळजी उत्पन्न होऊन तुकोबांचे नेत्रांतून अश्रु येऊं लागले व "पांडुरंगा आतां हा संसार कसा चालवूं" म्हणून त्यांनीं देवाची करुणा भाकिली—

माझिया संकटा न करी आळस । लावूनिया कास पार पावीं ॥ १ ॥

ह्याच वेळीं त्यांची पहिली बायको रुखमाई मृत्युमुखीं पडली—"स्त्री एक अन्न अन्न करितां मेली" ती दम्याची असल्यामुळें मेली असेल. पण पुढें लौकरच त्यांचा मुलगा[1] संताजी हाहि निवर्तला. अशीं एका मागून एक संकटें

१ टीपः—बाप मेला न कळतां । नव्हती संसाराची चिंता ॥ १ ॥
विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ॥ २ ॥

त्यांच्यावर कोसळली तरी ते डगमगले नाहीत व त्यांनी संसार सोडला नाहीं. पण दुसरी बायको जिजाबाई ही अत्यंत कोपिष्ट व तापट स्वभावाची निघाल्यामुळें संसारांत त्यांचें मन रमावें तसें रमेना.

कर्कश संगती । दुःख उदंड फजिती ॥

प्रपंचाचा भार शिरावर घेतल्यानंतर तुकोबांचा कांहीं काळ सुखांत गेला. पण पुढें आईबाप निवर्तले, बंधु घर सोडून गेला व कुटुंबाची वाताहत झाली. अशा प्रकारें त्यांजवर एकामागून एक अशी संकट परंपरा कोसळल्यामुळें त्यांच्या मनाची स्वस्थता नाहींशी झाली.

संसाराच्या तापें तापलों मी देवा । करिता या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥
म्हणऊनी तुझे आठवले पाये । येवो माझे माये पांडुरंगे ॥ २ ॥
बहुता जन्मींचा झालों भारवाही । सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥ ३ ॥
वेढियेलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं । कवण न करी कोणी माझी ॥ ४ ॥
बहु पांगविलों बहु नागविलों । बहु दीस झालों कासावीस ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां धांव घाली वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीनानाथा ॥ ६ ॥

---

बाईल मेली मुक्त झाली । देवें माया सोडविली ॥ ३ ॥
पोरें मेलीं बरें जालें । देवें माया विरहित केलें ॥ ४ ॥
माता मेली मज देखतां । तुका म्हणे हरली चिंता ॥ ५ ॥

सर्व चरित्रकारांनीं एकच मुलगा निवर्तल्याचें वर्णिलें आहे. पण वरील अभंगांत 'पोरें मेलीं' असा अनेक वचनी प्रयोग असल्यामुळें, एकच मुलगा मेला असें होत नाहीं.

घरांत बायकोचा तापट स्वभाव व बाहेर बेअब्रु, अपमान, सावकारांचे तगादे इ० मुळें त्यांचें मन संसारांतून उठलें. संसाराचा त्यांना वीट आला. पण त्यामुळें त्यांनीं डोक्यांत राख घालून संन्यास घेतला नाहीं. किंवा गांगरून जाऊन सामान्यजनाप्रमाणें जलसमाधि घेतली नाहीं; अथवा आत्म-हत्या केली नाहीं. जें होणार तें चुकत नाहीं, असा विचार करून ते संसा-रांतच राहिले व संकटांना तोंड देऊन परमार्थ साधनाच्या कार्यांत व्यत्यय येणार नाहीं, अशा प्रकारचा वर्तनक्रम त्यांनीं स्वीकारला.

रात्रि दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥

हीच परिस्थिति आपल्या आत्मोन्नतीस इष्ट असावी, असा ईश्वरीसंकेत असेल, तर आपण त्याच्या विरुद्ध कां जावें ? ज्याला जें इष्ट व योग्य असेल तेंच ईश्वर त्याला देतो. मग आपण त्याच्या कृताला दोष न देतां त्याच्या आज्ञेनुसार चालणें हेंच इष्ट होय.

संसाराचें ओझें वाहता वाहविता । तुजविण अनंता नाहीं कोणी ॥ १ ॥

असें ठरवून तुकोबा संसारांतच राहिले व स्वतःची बुद्धि चालवून दीर्घो-द्योगानें त्यांनीं परंपदाची प्राप्ति करून घेतली.

. तुकोबांनीं आपत्तीमुळें संसाराला कंटाळून कायमची सोडचिठी दिली, असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण तें योग्य नसून संसारांत राहूनच तुको-बांनीं आपल्या भक्तिज्ञान वैराग्याच्या जोरावर आपत्तीरूपी वाळूचे डोंगर ढांसळून टाकले. त्यांची दुसरी बायको जिजाबाई ही जरी कर्कशा व तापट स्वभावाची होती, तरी तुकोबापासून तिला सहा आपत्यें झालीं होतीं. तीन कन्या—काशी, भागीरथी व गंगा आणि तीन पुत्र—महादेव, विठ्ठल व नारा-यण, अशीं सहा अपत्यें तुकोबांना होतीं. तुकोबांच्या प्रयाणसमयीं जिजा-

बाई पांच महिन्यांची गरोदर होती. यावरून तुकारांनीं संसार सोडला होता, असें मुळींच म्हणतां येत नाहीं.

तुकोबांनीं विषयवासना आवरण्याचा पुष्कळ प्रयत्न केला.

नित्य या मनासी करितों विचार । तों हें अनावर विषय लोभी ॥

\+ \+ \+

आवरितां चित्त नावरे दुर्जन । घात करी मन माझें मज ॥

याप्रमाणें मनाचे दुष्ट विकार मोडत नाहींत, असेंच तुकोबांनीं म्हटलें आहे—

निरोधितो परी न मोडे विकार । बहुही दुस्तर विषय द्वारें ॥

विषयांचीं द्वारें अत्यंत दुस्तर असल्यामुळें त्यांतून पार पडणें फार कठीण आहे.

शरीर सोंकलें देखलिया सुखा । कदान्न हें मुखा मान्य नाहीं ॥

\+ \+ \+

आतां सोडवणें धांवा नारायणा । मज हे वासना अनावर ॥

माझ्या मनांत काम, क्रोध लोभ, मोह, मद, मत्सर हे षड्रिपु ठाण देऊन बसले आहेत. व मी दुर्बळ असल्यामुळें त्यांच्या तडाक्यांतून सुटे असें मला वाटत नाहीं.

एकाचेंही मज न घडे दमन । अवघी नेमून कैसा राखों ॥

एकाहि इंद्रियाचें दमन करतां येत नाहीं, मग हीं सर्व इंद्रियें कशी आवरतां येतील ?

वरील विवेचनावरून तुकोबांची विषयवासना अजिबात सुटली होती, असें म्हणतां येत नाहीं. मन ताब्यांत ठेवण्याकरितां त्यांनीं देवाची करुणा भाकली---

राहते ती तुम्हीं भरोनी अंतरीं । होतो तदाकारी निर्विषयचि ॥

देवा, तुम्हींच माझें अंतःकरण सदा भरून राहावें म्हणजेच मन निर्विषय होईल.

जे जे कांहीं मज होईल वासना । ते तें नारायणा व्हावें तुम्हीं ॥

याप्रमाणें अंतःकरण परमेश्वरास अर्पण करून तुकोबा प्रपंचांत राहिले. त्यांनीं संसार सोडला नाहीं, किंवा बायकापोरेंहि टाकलीं नाहींत. त्यांच्या संसाराचा फजिता उडाला असें म्हणण्यांत येतें, तेंहि सत्याला धरून नाहीं. तुकोबांनीं नारायणाला हृदय संपुटीं ठेवून संसार केल्यामुळें त्यांचा संसार सुखाचाच झाला.

संसार हा जन्मतांच मनुष्याच्या पाठीस लागला आहे व तो देहपातापर्यंत त्यास सुटत नाहीं. संसारांतील अनेक तऱ्हेचे व्यवहार व्यवस्थितपणें व पथ्यानें वागून केले असतां मनुष्यास त्यांत निरनिराळ्या सुखदुःखांचा प्रत्यक्ष अनुभव घेतां येतो. पण धर्माचें अवडंबर माजविणारांनीं संसाराला तुच्छ लेखून त्याची वाजवीपेक्षां अधिक अवहेलना केली आहे. संसार म्हटला म्हणजे दुःखमय अतएव त्याज्य, अर्थात् संसारात राहून परमार्थ साधतां येणें शक्य नसून संसारांतून उठलें तरच परमार्थ दिसेल, असा सर्व साधारण जनतेचा त्यांनीं समज करून दिला आहे. विषयातिरेकानें संसार दुःखमय होतो म्हणून संसारांतील विषयातिरेकाचा त्यांनीं निषेध केला असता, तर तें ठीक झालें असतें. पण त्याकरितां समूळ संसारच त्याज्य मानावा हें अन्याय्य होय. संसार ही बेडी नसून अध्यात्मिक उन्नति गांठण्यासाठीं उभार-

लेली, शिडी आहे, अर्थात् त्याची अवहेलना करणें म्हणजे धर्माच्या नांवावर धर्मलंडपणा माजविणें होय. जलचर प्राण्याला पाण्याबाहेर राहतां येणें जसें शक्य नाहीं, तद्वत मनुष्याला संसाराबाहेर राहतां येणें अशक्य आहे. संसार हा कोणालाच सुटलेला नाहीं. " गृह त्यजे तो मठी बनावे उदिम त्यजे तो फेरी " यांत म्हटल्याप्रमाणें घराचा त्याग केला तरी मठ बांधावा लागतो व धंदा सोडला तरी पोटासाठीं भिक्षा मागावी लागते मिळून प्रपंच कायमचा सुटत नाहीं.

म्हणोनि संग जंव प्रकृतीचा । तंव त्यागु न घडे कर्माचा ।
ऐसियाहि करूं म्हणती तयांचा । आग्रहचि उरे ॥—ज्ञानेश्वर.

म्हणून प्रपंचांत राहूनच परमार्थ साधला पाहिजे.

युक्तिचा आहार नीति वेव्हार । वैराग्य तें सार तरावया ॥ १ ॥
लोलुपता काय निद्रेसी जिंकावें । भोजन करावें परिमित ॥ २ ॥

अनीति, दंभ, मद, अहंकार इ० दुर्गुणांचा त्याग करून व सारासार विचार करून विषयांत आसक्ति न ठेवतां सदाचारांचें सेवन केल्यास संसार बाधक न होतां उलट तो सुखदच होतो.

न करी कांहीं आस मुक्तीचे सायास । नभें संसारास येतां जातां ॥१॥

तुकोबा म्हणतात संसारांस काय म्हणून भ्यावें ?

भवसागर तरतां । कां रे करितसां चिंता । पैल उभा दाता । कटीं कर ठेवूनियां ॥ १ ॥ त्याचे पायीं घालामिठी । मोल ने घे जगजेठी । भावा एकासाठीं । खांदां वाहे आपुल्या ॥ २ ॥ सुखें करावा संसार । परि न संडावे दोन्ही वार । दयाक्षमा घर । चोजवीत येतील ॥ ३ ॥ भुक्तिमुक्तिची चिंता । नाहीं दैन्य दरिद्रता । तुका म्हणे दाता । पांडुरंग ओळगिल्या ॥४॥

\+ + +

नको सांडूं अन्न नको सेवूं वन । चिंतीं नारायण सर्व भोगीं ॥ १ ॥
मातेचिये खांदीं बाळ नेणें सीण । भावना त्या भिन्न मुंडाविया ॥ २ ॥
नको गुंपों भोगीं नको पडों त्यागीं । लावुनि सरे अंगीं देवाचिया ॥३॥
तुका म्हणे नको पुसों वेळोवेळां ! उपदेश वेगळा उरला नाहीं ॥ ४ ॥

ईश्वराला आठवून व्यवहार केला असतां संसाराची चिंता वाहण्याचें कांहीं कारण नाहीं; व अन्नादि भोग सोडणें, वनसेवन करणें अर्थात् संसाराचा त्याग करणें इ० चीहि जरूर नाहीं. ' नलगे लौकिक सांडावा वेव्हार ' तर केवळ परमेश्वरावर भाव ठेवून ' सुखें करावा संसार ' असेंच तुकोबांनी वरील अभंगात म्हटलें आहे.

चोरचोरी करी । ठेवी वनांतरीं । वर्ततसे चराचरीं । परी लक्ष तेथें ॥
याप्रमाणें संसारांत राहून लक्ष मात्र देवाकडे असावें.

कायें करूनी करी धंदा । चित्त गोविंदा तुमचे पायीं ॥ १ ॥
ऐशा संकल्पाची संधि । माझे बुद्धि धीर देवा ॥ २ ॥
कुटुंबाचा तुम्हां भार । मज व्यवहार निमित्त ॥ ३ ॥
तुका म्हणे करितां काम । हृदयीं नाम धरीन ॥ ४ ॥

आपल्या धर्म ग्रंथांत गृहस्थाश्रमाचें महत्व अत्यंत श्रेष्ठ मानिलें आहे. जीविताला उदात्तता प्राप्त करून देणारे गुण या गृहस्थाश्रमांतच राहून संपादितां येतात; इतकेंच नव्हें तर जनतेच्या उद्धारास सहाय्यभूत होणारे सद्गुण या कर्तव्य क्षेत्रांतचत्रावरून प्राप्त करून घेता येतात. कार्यकर्ते पुरुष, ज्ञानी, वीर, साधु इ० जन्माला येण्याचें हेंच स्थान होय.

नाना वेष नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम ।
जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ॥ १ ॥—श्री समर्थ.

याच आश्रमांत दानादि प्रकार सांगितलें असून परोपकाराचें मोठें महत्व वर्णिलें आहे.

गेयं गीता नामसहस्त्रं । ध्येयं श्रीपति रूपमजस्त्रम् ।

नेयं सज्जन संगे चित्तं । देयं दीन जनायच वित्तम् ॥ १ ॥

संसार विषमय म्हणून त्याज्य, तर परोपकारादि कृत्यें करून दुसऱ्याचा संसार सुखाचा करण्याची काय जरूर ? याचा प्रशांत चित्तानें विचार करावा, म्हणजे त्याचें मर्म ध्यानांत येईल.

श्रीएकनाथ महाराजांनीं प्रपंच सोडला नव्हता. गृहस्थाश्रमांत राहूनच त्यांनीं संसार सुखाचा केला. जनकराजा मोठा आत्मज्ञानी होता; पण त्यानें आपल्या राज्यावर तुळसीपत्र ठेवलें नव्हतें.

प्रपच साधुनि परमार्थाचा लाभ ज्यानें केला । तो नर भलारे भला ॥

—शिवदिन केसरी.

परमार्थाकरितां प्रपंचाचा त्याग करणें अयोग्य होय, इतकेंच नव्हें तर उलट त्यापासून अकल्याण होणार आहे असें श्रीसमर्थ रामदासांनीं सुद्धां म्हटलें आहे. ते म्हणतात—

आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थ विवेका । एथें आळस करूं नका । विवेकी हो ॥ १ ॥ प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल । प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ॥ २ ॥ प्रपंच सोडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला । मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ॥ ३ ॥ प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण । प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थीं खोटा ॥ ४ ॥ म्हणून सावधानपणें । प्रपंच परमार्थ चालविणें । ऐसें न करितां भोगणें । नाना दुःख ॥ ५ ॥ प्रपंचीं असूनि परमार्थ पाहे । तो हे स्थितीतें लाहे ।

प्रारब्ध योगें करूनि राहे । लोकां मध्यें ॥ ६ ॥ पदार्थी असावें उदास । विवेक पहावा सावकाश । येणें करितां जगदीश । अलभ्य लाभे ॥ ७ ॥ जगदीशा परता लाभ नाहीं । कार्या कारण सर्व कांहीं । संसार करीत असतांही । समाधान ॥ ८ ॥

संसारांत अनेक अडचणी उद्भवतात म्हणून तो सोडून देणें युक्त नसून सृष्टींतील कर्मांचा लोप न होतां जेणेंकरून त्यांचें बंधन आपणांस होणार नाहीं अशा प्रकारचें वर्तन ठेवणें हेंच इष्ट होय. बहुतेक साधुसंतांनीं हाच मार्ग स्वीकारला होता. त्यांनी प्रपंचाला भिऊन त्यावर पाणी सोडलें नव्हतें. अर्थात् परमार्थ प्राप्तिसाठीं प्रपंचाचा त्याग करावा, हें म्हणणें अयुक्त असून तें अप्रबुद्ध पुरुषांसच शोभण्यासारखें आहे. ईश्वराची तशी इच्छा असती तर त्यानें हें जगच निर्माण केलें नसतें. जगाचा व्यवहार सुरळीत-पणें चालावा, हीच त्याची इच्छा. मग त्याच्या इच्छेविरुद्ध प्रपंच सोडावा-संसाराचा त्याग करावा अशी अयुक्त शिकवण संत देतील, हें असंभाव्य आहे. तुकोबा म्हणतात—

कासया उदास असों देहावरी । अमृत सागरीं बुडोनिया ॥
कासया एकांत सेवूं तया वना । आनंद या जना माजीं असे ॥

संसार सुखमय आहे आणि दुःखमयहि आहे. पण तो सुखाचा अथवा दुःखाचा करणें, ही गोष्ट प्रत्येक मनुष्याच्या ताब्यांतली आहे. अन्न हें प्राणघातक आहे व प्राणरक्षकहि आहे. अर्थात् तें प्राणरक्षक कसें होईल, अशी ज्याप्रमाणें योजना करण्यांत येते, तद्वत संसारमार्गांत परमार्थाला आड येणारे कामक्रोधादि षड्रिपु आहेत, त्यांना आपल्या स्वाधीन ठेवून वाट सरळ केली म्हणजे संसारहि सुखाचा होतो. म्हणून ज्याला संसार

सुखाचा कळावयाचा असेल त्यानें संसारांतील कर्म धर्माचें वर्म जाणलें पाहिजे.

वर्म जाणावें हा मुख्य धर्मसार । अवघे प्रकार तयापाशीं ॥
तुका म्हणे वर्म जाणितल्यावीण । पावे करितां सीण सांडी मांडी ॥

+ × +

भोगें घडे त्याग । त्यागें अंगा येती भोग ॥ १ ॥
ऐसें उफराटें वर्म । धर्मा अंगींच अधर्म ॥ २ ॥
देव अंतरे तें पाप । खोटें उगवा संकल्प ॥ ३ ॥
तुका म्हणे भीड खोटी । लाभ विचारावा पोटीं ॥ ४ ॥

प्रवृत्ति आणि निवृत्ति हे दोन्ही परमार्थाचे मार्ग आहेत. त्यांतील एकाचाच स्वीकार केल्यानें इष्ट ध्येय साध्य करून घेतां येणें शक्य नाहीं. नुस्त्या प्रवृत्तींत रममाण होणारे पुरुष अंधःकारांत पडतातच. पण नुस्त्या निवृत्ति मार्गाकडे लागलेले लोक अधिक अंधःकारांत पडतात. म्हणून या दोहोंच्या समुच्चयाची अवश्यकता गीतेंत विशेषत्वानें वर्णिली आहे. प्रवृत्ति आणि निवृत्ति ही दोन्ही एकमेकांसह ज्यानें जाणलीं तो प्रपंच तरून अमृतत्व प्राप्त करून घेतो. हे दोन्ही मार्ग परस्परावलंबी असून परस्पर पोषक आहेत.

विधिसेवनें विहितें । कार्य कारणापुरतें ।
न वाटे जो चित्तें । अधर्माच्या तो त्यागी ॥ १ ॥

याप्रमाणें संसारांत राहूनच परमार्थ साधणें शक्य आहे. ' विधिनें सेवन । विषय त्यागातें समान ' संसारालाच चाट दिला तर सर्वच अव्यवस्था होऊन समाज घटना, जनतेंत शांतता नांदणें, जनतेचा उत्कर्ष होणें इ० गोष्टी अशक्य होतील.

गीताग्रंथ वेदांतपर असून तो सर्वत्रांना मान्य आहे. मग त्यांत मनुष्यानें संसार सोडावा म्हणून सांगितलें आहे कीं कर्तव्यदक्ष होऊन त्यानें तो नीट रीतीनें करावा, म्हणून सांगितलें आहे ? अज्ञानी लोक प्रकृतीच्या स्वाधीन राहून जसें वागतात, तसें न वागतां इंद्रियें स्वतांच्या ताब्यांत ठेवून व मन स्थिर व शुद्ध करून जो मनुष्य सृष्टिक्रमानें प्राप्त झालेलें कर्म अनासक्त बुद्धीनें करतो तोच साधु, स्थितप्रज्ञ व मुक्त होय. अर्थात् गीतेंत कर्माचा निषेध केला नसून " अहंकरोमिति वृथाभिमानः—अहंकार सोडून एकनिष्ठेनें कर्तव्य कर. " " तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युद्धयच—सर्व काली माझें स्मरण करून युद्ध कर " असाच अर्जुनाला श्रीकृष्णांनीं ठिकठिकाणी उपदेश केला आहे. त्यावरून गीता निवृत्तिपर नसून कर्मयोगपर आहे, हेंच सिद्ध होतें. योग वासिष्ठांतहि वसिष्ठांनीं रामाला ज्ञानमूलक प्रवृत्ति मार्गाचाच उपदेश केला. व रामांनी त्याप्रमाणेंच आचरण केलें.

प्रपंचाच्या ठिकाणीं आसक्ति न ठेवतां प्रपंचांतील नित्यनैमित्तिक कर्में फलाशेचा त्याग करून म्हणजे आसक्ति विरहित होऊन केलीं असतां त्यांतच परमेश्वराचें पूजन होतें व सर्व सिद्धि प्राप्त होतात. अशा प्रकारें वागणारा मनुष्य प्रपंचांत प्रतिकूल परिस्थितीच्या अवगुंठणानें कितीहि वेष्टित असला तरी संसाराला पराङ्मुख न होतां, तो आपल्या विचारशक्तीच्या जोरावर सर्व अरिष्टांना चुकवून आपलें ध्येय साध्य केल्यावांचून राहत नाहीं.

हें विश्वचि माझें घर । ऐसी मति जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपणचि जाहला ॥ १ ॥

अशी निश्चयात्मक ज्याची बुद्धि झाली, त्याला त्याचें घर त्याज्य वाटणें शक्य नाहीं. सर्व वस्तूंत परमेश्वर भरलेला असल्यामुळें प्रत्येक वस्तुविषयीं त्याच्याठायीं आदर उत्पन्न होऊं लागतो.

अवघीं रूपें तुझी देवा । वंदू भावें करूं सेवा ॥

भागवत धर्मीय संतांनीं मोक्ष व लोकसंग्रह यांवर सारखी दृष्टि ठेवूनच संसार केला हें त्यांच्या चारित्र्यांवरून चांगलें सिद्ध होतें. ज्यांची दृष्टि परंपरा, सांप्रदाय, गुरुमहिमा, चमत्कार, संसार—असार इ० कडेच वळलेली, त्यांनीं त्यांतच गुरफटून " तुकोबांनीं संसारावर तुळशी पत्र ठेवलें होतें " असें म्हणावें, यांत नवल नाहीं. जगांतील सर्व साधुसंत नरदेहांतील मुख्य कर्तव्य ' ईश्वरप्राप्ति ' हेंच सांगत आले आहेत. पण त्याकरितां घरादाराचा त्याग करावा, असें त्यांनीं सांगितलें नाहीं.

नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें । वैराग्य वाउगें देश त्यागें ॥ १
काम वाढे भय वासनेच्या द्वारें । सांडावें तें धीरें आचावाचा ॥ २ ॥
कापवूनि टिरी शूरत्वाची मात । केलें वाताहात उचित काळें ॥ ३ ॥
तुका म्हणे करी जिव्हेसी विटाळ । लटिक्याची मळ स्तुति होतां ॥ ४ ॥

वासनेच्या मुळें कामादि विकार वाढतात म्हणून वादफळ वासनांच्या आधीन न होतां समाजाचें धारण पोषण होण्याला लागणाऱ्या अवश्यक अशा गुणांचाच माणसानें संग्रह करावा, अशीच संतांची शिकवणूक होती.

पुण्य परउपकार पाप तें परपीडा । आणिक नाहीं जोडा दुजा यासी ॥१॥
सत्य तोचि धर्म असत्य तें कर्म । आणिक हें वर्म नाहीं दुजे ॥ २ ॥

\+ \+ \+

तुका म्हणे उघडें आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ॥ ५ ॥

तुकोबांनीं मातृपितृ सेवा, ईश्वरभक्ति, सत्य भाषण, धैर्य, शौर्य इ० सद्गुणांचें वर्णन करून मद्यपान, अभक्ष्यभक्षण, परस्त्रीगमन, कन्याविक्रय इ० दुर्गुणांचा निषेधहि केला आहे.

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी ॥ १ ॥
उत्तमगती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥ २ ॥
पर उपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥ ३ ॥
भूत दया गाई पशूंचें पालन । तान्हेल्या जीवन वना माजी ॥ ४ ॥
शांति रूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचें ॥ ५ ॥
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परम पदबळ वैराग्याचें ॥ ६ ॥

व्यवहारांत वागावें कसे, राहाणी कशी ठेवावी इ० चें विवरण करून परमपद प्राप्तीला लागणारें वैराग्याचें बल तें प्राप्त होणें या गृहस्थाश्रमाचेंच फळ होय, असें तुकोबांनीं म्हटलें आहे. अशा प्रकारें इतरांना बरें वाईटपणाचा उपदेश करणारें तुकोबा स्वतः संसाराच्या विरुद्ध होते, असें म्हणणें म्हणजे त्यांची थट्टा करण्यासारखं आहे.

तुका म्हणे सुखें देई संसार । आवडिसी थार करी माझे ॥

तुकोबांना गृहस्थाश्रमाच्या कर्तव्याची चांगली जाणीव असून त्यांनी स्वतांच्या मुलांमुलींचें लालन पालन केलें; इतकेंच नव्हे तर त्यांनी आपल्या हयातीत मुलींचीं लग्नेंहि केलीं होतीं. त्यांचा संसार मोठ्या श्रीमंतीचा नसला तरी तो दैन्यवाणा नव्हता, हें खास. " निर्वाहापुरतें अन्न आच्छादन " त्यांच्या येथें होतें. ते अखेरपर्यंत व्यवहार करीत होते व त्यांना संसारांतील हालअपेष्टांचा अनुभवहि होता. सारांश तें संसारांत होते, पण " पद्मपत्रमिवांभसा " प्रमाणें त्यात वर्तत होते.

सत्यवादी करी संसार सकळ । अलिप्त कमळ जळीं जैसें ॥ १ ॥

कमलपत्र पाण्यांत उत्पन्न होऊन नालद्वारें पोषक रसाचें शोषण करतें, पण त्याला जसें पाणी चिकटत नाहीं, तद्वत तुकोबाराय संसारांत

राहून उन्नतिकारक तत्वांचें ग्रहण करून अपायकारक परिणामांपासून अलीप्त होते.

प्रवृत्ति निवृत्तीचे आटूनियां भाग । उतरिलें चांग रसायण ॥
तुका म्हणे आम्ही जिंकिला संसार । होऊनी किंकर विठोबाचे ॥

---

## प्रथमावस्था.

गति अधोगति मनाची हे युक्ति । मन लावी एकांती साधु संगें ॥ १ ॥
जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें ॥ २ ॥
मान अपमान मनाचें लक्षण । लावलिया ध्यान तेंचि करी ॥ ३ ॥
तुका म्हणे मन उतरी भवसिंधु । मन करी बंधु चौऱ्याशीचा ॥ ४ ॥

संसारांत राहून उत्तम गति अथवा अधोगति प्राप्त होणें, हें सर्व मनावर अवलंबून आहे. तें चौऱ्यांशीच्या बंधनांत घालतें व भवसागरांतुन उतरून तेंच पार नेतें. म्हणून मन ताब्यांत ठेवण्याविषयी संतांनीं सामान्य जनांस पुष्कळ उपदेश केला आहे.

या मनाची एक उत्तम गती । जरी स्वयें लागलें परमार्थी ।
तरी दासी करी चारी मुक्ती । दे बांधोनि हातीं परब्रह्म ॥ १ ॥

—श्री एकनाथ.

एकनाथ महाराज म्हणतात कीं, मन हातीं आल्यावर परब्रह्म प्राप्ति अवघड नाहीं.

साधन तें मन करी आपुलें आधीन । या परतें कारण आन नाहीं ॥
एका जनार्दनी मानसी आवरी । मग तूं संसारीं धन्य होसी ॥

पण मन स्वाधीन नसेल तर कांहींच साधतां येणार नाहीं. ‘ मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयोः ’ सर्व सुख दुःख प्राप्तीला मनच कारण आहे. ‘ आपुलेंचि मन । करवी आपणा बंधन ’ इतकें त्याचें प्राबल्य आहे. पण अशा प्रबल मनाला स्थिर करणें मनुष्याच्या हातचें आहे. हळू हळू प्रयत्न करून तें साध्य होण्यासारखें आहे. पाणी अनावर असतें पण ‘ माळिया जेउ तें नेलें । तेउ तें निवांतुचि गेलें ’ तें पाट बांधून नेलें असतां निवांत जातें, तद्वत मनाला हळु हळूं एकाग्र करण्याचा प्रयत्न करून इष्ट वस्तूच्या ठायीं लावलें पाहिजे.

चंचळ मन अस्थिर हें ज्या विषयाकडेचि बा धांवें ।
त्या त्या पासुनि आणुनि सुज्ञें हृदयीं हळुंच बांधावें ।। १ ।।

मोरोपंत.

मनाला एकाग्र करणें याचेंच नांव योग. ‘ परोहियोगो मनसः समाधिः ’ ही एकाग्रता साधल्यानें मनुष्याचे ठायीं लोकोत्तर गुण येतात, त्यालाच सिद्धि म्हणतात.

मन हें निश्चळ झालें एकेठायीं । तया उणें काई निज सुखा ।।
म्हणून तुकोबा म्हणतात—

मन करारे प्रसन्न । सर्व सिद्धींचें साधन ।
मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।। १ ।।
मन गुरु आणि शिष्य । करी आपुलेंचि दास्य ।
प्रसन्न आपआपणास । गति अथवा अधोगति ।। २ ।।

मनुष्याची जशी इच्छा असते त्याप्रमाणें त्याला फलप्राप्ति होते. ‘ वासना तसें फळ ’ अशी म्हण आहे. या वासनेचा जोर इतका प्रबळ

असतो कीं, मनुष्य मनांत आणील तें होऊं शकतें. ' तुका म्हणे मन । तेथें सकळ कारण ' । या मानसिक शक्तीची बरोबरी करण्याला पृथ्वी, आप, तेज, वायु इ० पैकीं एकहि तत्व समर्थ होऊं शकत नाहीं. अशा ह्या शक्तीला सैरावैरा धांवूं न देतां एकाग्र केलें तर त्यापासून भावनारूप अति प्रचंड व महा प्रखर असें तेज उत्पन्न होतें. या भावनेलाच ' इच्छा शक्ति ' ( Will power ) म्हणतात. या मानसिक बलानें वाटेल तें होऊं शकतें, असा मानसशास्त्राचा नियम आहे. ' नर करनी करे तो नरका नाराण होय ' इतकें या मानसिक शक्तींत सामर्थ्य आहे. मात्र तिचा सद्भावनेनें व एकनिष्ठपणें उपयोग करून घेतला पाहिजे.

मन हें ओढाळ गुरूं असल्यामुळें त्याला आपल्या स्वाधीन ठेवण्याचा प्रथमपासूनच नेटाचा प्रयत्न करणें अवश्यक आहे.

तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ॥

या मनाला थोडें का सैल सोडलें तरी मनुष्याचा पशू बनतो. उंचावर ठेवलेल्या एखाद्या वस्तुला थोडासा धक्का दिला असतां ती जशी खालीं गरंगळत येते तद्वत मनोविकाराला बळी पडलेले मोठमोठे विद्वान, तत्ववेत्ते, कवी इ० सुद्धां उच्च स्थितीतून पतन पावतात. विश्वामित्रासारखे मोठमोठे तपस्वी मनाला सैरावैरा धावूं दिल्यामुळेंच तपश्चर्येपासुन भ्रष्ट झाले. ' अचपळ मन माझें नावरे आवरितां ' असें समर्थांनीहि म्हटलें आहे. " तुका ह्मणे येणें । बहु नाडिलें शाहणे " म्हणून प्रथम करावयाचें काम म्हणजे मन ताब्यांत ठेवणें हें होय. या मनास ' मागें परतवी तो बळी । शूर एक भूमंडळी ' रणांत शौर्य दाखवून विजयश्री संपादणें सुलभ आहे; पण मनावर जय मिळविणें मोठें दुर्घट आहे.

चंचलंहि मनः कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम् ।
तस्याहं निग्रहंमन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥

श्रीमद्भगवद्गीता.

' मन हें चंचल असून दांडगें आहे, इतकेंच नव्हें तर तें बलिष्ठ आहे व वळविण्यास अत्यंत कठीण आहे. वाऱ्याची जशी मोट बांधतां येत नाहीं तद्वत या मनाचा निग्रह करणें दुर्घट आहे ' असें अर्जुनानें मनाच्या प्रबलतेबद्दल श्रीकृष्णाजवळ वर्णन केलें. तेव्हां भगवंतांनी ' अभ्यासेन तुकौंतेय वैराग्येणच गृह्यते--संवयीनें व दीर्घोद्योगानें मनोनिग्रह करतां येतो' असेंच सांगितलें. " असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे " कोणतीहि असाध्य गोष्ट अभ्यासानें मिळवितां येते.

ओलें मूळ भेदी खडकाचें अंग । अभ्यासासी सांग कार्य सिद्धि ॥ १ ॥
नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड । नाहीं कईवाड तोंच वरि ॥ २ ॥
दोरें चिरा कापे पडिला कांचणी । अभ्यासें सेवनीं विष पडे ॥ ३ ॥
तुका म्हणे कैंचा बैसण्यासी ठाव । जठरीं बाळा वाव एका एकीं ॥ ४ ॥

वृक्षाचें मूळ जसें खडकाचें भेदन करतें, दोराच्या घर्षणानें मोठा दगड देखील कापला जातो, संवयीनें विष जसें पचवितां येतें तद्वत प्रथम जी गोष्ट अवघड वाटते तीच प्रयत्नानें साध्य करून घेतां येते. तुकोबांनीं मनोजय करण्याकरितां असाच दीर्घोद्योग केला. त्यांचें मन प्रपंचांतील विपत्तीमुळें अत्यंत दुःखी झालें होतें. त्याला कांहीं विरंगुळा वाटावा म्हणून त्यांनीं तें पांडुरंगाकडे लावलें. पांडुरंग हेंच मुख्य दैवत असून त्याला अनन्य भावें शरण जाणें, त्याच्या ठिकाणीं मन लावून त्याची उपासना करणें हेंच मन

ताब्यांत ठेवण्याचें मुख्य साधन होय असें वाटून त्यांनी पांडुरंगाचें भजन पूजन करण्यास सुरवात केली.

आतां तुज कळेल तें करीं । तारिसी तरी तारीं मारीं ॥
जवळी अथवा दुरी धरीं । घालीं संसारीं अथवा नको ॥
शरण आलों नेणतपणें । भाव आणि भक्ति कांहींच नेणें ॥
मतिमंद सर्व ज्ञानें । बहु रंक उणें रंकाहुनी ॥
मनस्थिर नाहीं माझिये हातीं । इंद्रियें धांवतां नावरती ॥
सकळ निवेदिला भाव । तुझिये पायीं ठेविला जीव ॥
आतां करीं कळे तो उपाय । तूंचि सर्व ठाव माझा देवा ॥
राहिलों धरूनि विश्वास । आधार नेटीं तुझी कास ॥
आणिक नेणें मी सायास । तुका म्हणे यास तुझें उचीत ॥

वैकुंठांत वास करणारा परमेश्वर पांडुरंगाच्या रूपानें पंढरपुरांत वास करीत आहे, अशी आरंभीं तुकोबांची समजूत होती व त्याप्रमाणें त्यांना प्रथम त्याच सगुण मूर्तीचा ध्यास लागला.

पंढरीस जावें ऐसें माझें मनीं । विठाई जननी भेटे केव्हां ॥
तुका म्हणे त्याचे पाहिलिया पाय । मग दुःख जाय सर्व माझें ॥

## सगुणोपासना.

सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें ।
सारासार विचारें । संत संगें ॥ १ ॥—श्रीसमर्थ.

मनुष्य हा ईश्वराचा अंश आहे व परमेश्वर हा सर्व जगाचा प्रभु आहे, हें तत्व मान्य केलें म्हणजे मनुष्याला आपला संबंध ईश्वराशीं घडावा अशी इच्छा होणें साहजिक आहे. अर्थात् ही इच्छा मनुष्याला उपासनेच्या योगानें पूर्ण करतां येते. निर्गुण ब्रह्म निराकार व अव्यक्त असून मनोवाचातीत आहे; तेथें बुद्धि पोंचत नसल्यामुळें तें उपासनेचा विषय होणें शक्य नाहीं, म्हणून सगुण ब्रह्म जो ईश्वर तोच उपासनेचा विषय होऊं शकतो. उपासना ह्मणजे चिंतन अथवा ध्यान होय. कोणतें तरी ध्येय पुढें ठेवून त्यावर चित्तवृत्ति इतर विषयाकडे जाऊं न देतां सतत ठेवणें व त्याचे प्रेमानें आकलन करून मन तदाकार करणें यासच उपासना म्हणतात. उपासना द्वैतीच असते. ती चित्ताची शुद्धि करणारी असून अद्वैत ज्ञानास उपकारक होते. ही उपासना दोन प्रकारची आहे. एक अव्यक्त सगुणोपासना व दुसरी व्यक्त सगुणोपासना. ईश्वर व्यक्त आहे आणि अव्यक्तहि आहे.[1] व्यक्ताची उपासना अव्यक्ताच्या उपासनेंइतकीच सत्य आहे. पण अव्यक्ताचें कोरडें ज्ञान होऊन भागत नाहीं. तर तें हृदयांत बाणलें पाहिजे. त्याचें आकलन करतां आलें पाहिजे. परमेश्वर सगुण असला तरी तो

---

१ द्वेवाव ब्रह्मणो रूपे मूर्तं चैवामूर्तंच मर्त्यंचामृतंच स्थितंच यच्च सच्च तच्च ॥
—बृह० उपनिषद् २–३–१.

मूर्त व अमूर्त, मर्त्य व मृत्युरहित स्थिर व चलनात्मक, प्रत्यक्ष व परोक्ष अशीं ब्रह्माचीं दोन रूपें आहेत.

ताब्यांत ठेवण्याचें मुख्य साधन होय असें वाटून त्यांनी पांडुरंगाचें भजन पूजन करण्यास सुरवात केली.

आतां तुज कळेल तें करीं । तारिसी तरी तारीं मारीं ॥
जवळी अथवा दुरी धरीं । घालीं संसारीं अथवा नको ॥
शरण आलों नेणतपणें । भाव आणि भक्ति कांहींच नेणें ॥
मतिमंद सर्व ज्ञानें । बहु रंक उणें रंकाहुनी ॥
मनस्थिर नाहीं माझिये हातीं । इंद्रियें धांवतां नावरती ॥
सकळ निवेदिला भाव । तुझिये पायीं ठेविला जीव ॥
आतां करी कळे तो उपाय । तूंचि सर्व ठाव माझा देवा ॥
राहिलों धरूनि विश्वास । आधार नेटीं तुझी कास ॥
आणिक नेणें मी सायास । तुका म्हणे पास तुझें उचीत ॥

वैकुंठांत वास करणारा परमेश्वर पांडुरंगाच्या रूपानें पंढरपुरांत वास करीत आहे, अशी आरंभीं तुकोबांची समजूत होती व त्याप्रमाणें त्यांना प्रथम त्याच सगुण मूर्तीचा ध्यास लागला.

पंढरीस जावें ऐसें माझे मनीं । विठाई जननी भेटे केव्हां ॥
तुका म्हणे त्याचे पाहिलिया पाय । मग दुःख जाय सर्व माझें ॥

## सगुणोपासना.

सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें ।
सारासार विचारें । संत संगें ॥ १ ॥—श्रीसमर्थ.

मनुष्य हा ईश्वराचा अंश आहे व परमेश्वर हा सर्व जगाचा प्रभु आहे, हें तत्व मान्य केलें म्हणजे मनुष्याला आपला संबंध ईश्वराशीं घडावा अशी इच्छा होणें साहजिक आहे. अर्थात् ही इच्छा मनुष्याला उपासनेच्या योगानें पूर्ण करतां येते. निर्गुण ब्रह्म निराकार व अव्यक्त असून मनोवाचातीत आहे; तेथें बुद्धि पोंचत नसल्यामुळें तें उपासनेचा विषय होणें शक्य नाहीं, म्हणून सगुण ब्रह्म जो ईश्वर तोच उपासनेचा विषय होऊं शकतो. उपासना म्हणजे चिंतन अथवा ध्यान होय. कोणतें तरी ध्येय पुढें ठेवून त्यावर चित्तवृत्ति इतर विषयाकडे जाऊं न देतां सतत ठेवणें व त्याचें प्रेमानें आकलन करून मन तदाकार करणें यासच उपासना म्हणतात. उपासना द्वैतीच असते. ती चित्ताची शुद्धि करणारी असून अद्वैत ज्ञानास उपकारक होते. ही उपासना दोन प्रकारची आहे. एक अव्यक्त सगुणोपासना व दुसरी व्यक्त सगुणोपासना. ईश्वर व्यक्त आहे आणि अव्यक्तहि आहे. व्यक्ताची उपासना अव्यक्ताच्या उपासनेंइतकीच सत्य आहे. पण अव्यक्ताचें कोरडें ज्ञान होऊन भागत नाहीं. तर तें हृदयांत बाणलें पाहिजे. त्याचें आकलन करतां आलें पाहिजे. परमेश्वर सगुण असला तरी तो

---

१ द्वेवाव ब्रह्मणो रूपे मूर्तं चैवामूर्तंच मर्त्यंचामृतंच स्थितंच यच्च सच्च तच्च ॥
—बृह० उपनिषद् २–३–१.

मूर्त व अमूर्त, मर्त्य व मृत्युरहित स्थिर व चलनात्मक, प्रत्यक्ष व परोक्ष अशीं ब्रह्माचीं दोन रूपें आहेत.

अव्यक्त म्हणजे निराकार असून इंद्रियांस अगोचर असल्यामुळें त्याच्या ठायीं मन जडून तें स्थिर करतां येणें साधारण मनुष्यांस अत्यंत अवघड असतें.

अव्यक्तोपासनेचा मार्ग अनादि कालापासून प्रचारांत आलेला असला तरी तो अत्यंत कष्टमय आहे, असें भगवद्गीतेंतहि म्हटलें आहे—

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ताहिगतिर्दुःखंदेहवद्भिरवाप्यते ॥

देहधारी मानवी प्राण्याला अव्यक्ताचे ठिकाणीं चित्ताची एकाग्रता करतां येणें मोठया कष्टानेंच साध्य होतें. म्हणून जी वस्तु इंद्रियांना दिसत नाहीं व जिच्याविषयीं कल्पना करतां येणें सुद्धां अत्यंत अवघड असते अशा अव्यक्ताच्या खटपटींत मनुष्यानें पडूं नये. व्यक्तोपासनेची गोष्ट तशी नाहीं.

व्यक्ताची उपासना कमी कष्टकारक असून सुलभ आहे व भगवंताला तीच अधिक प्रीय आहे. श्रीमद्भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं याच मार्गाची प्रशंसा केली असून अव्यक्तापेक्षां व्यक्तोपासनेचें सुलभत्व त्यांनीं वर्णिलें आहे व अशी उपासना करणाराच सर्वांत उत्तम होय, असेंहि त्यांत म्हटलें आहे.

मय्यावेश्यमनोयेमांनित्ययुक्ताउपासते ।
श्रद्धयापरयोपेतास्तेमेयुक्ततमामतः ॥

व्यक्तोपासनेंत परमेश्वराचें स्वरूप प्रेमगम्य व व्यक्त म्हणजे प्रत्यक्ष समजण्यासारखें असतें. तुकोबांना प्रथमतः याच मार्गाची गोडी लागली. ते सगुण मूर्तीची निःसीम उपासना करूं लागले व पुढें अनुभवांनीं त्यांनीं जनतेला हाच उपदेश केला आहे. तुकोबा म्हणतात—

तुज व्हावा आहे देव । तरी हा सुलभ उपाय ॥

परमेश्वराची प्राप्ति करून घेण्याचा हाच सुलभ मार्ग आहे.

परमेश्वर सर्वांभूतीं भरलेला आहे. तो अनादि आहे, अनंत आहे; पण तो निर्गुण व अव्यक्त असल्यामुळें इंद्रियद्वारें त्याचें चिंतन करतां येणें शक्य नाहीं. मोठमोठया ज्ञान्यांसहि तसें करतां येणें कठीण वाटतें. मग साधारण मनुष्यास तें अवघड वाटावें, यांत आश्चर्य नाहीं.

दृष्टीला नसे रूप गोचर । ऐसा असे हा परमेश्वर ।
म्हणोनि चर्म चक्षूंनी त्या नर । पाहूं न शके ॥

अव्यक्त म्हणजे इंद्रियांना गोचर न होणारें. या अव्यक्तापासूनच सर्व व्यक्त सृष्टि निर्माण झाली आहे. म्हणून परमेश्वराच्या उपासनेला अव्यक्तापासून सुरवात न करता व्यक्त अशा सगुण रूपापासूनच केली पाहिजे. अव्यक्त ब्रह्माशीं तद्रूप होण्याची जी अद्वैताची स्थिति–ब्रह्मात्मैक्य बुद्धि ती प्राप्त होण्याला परमेश्वर रूपाचें उपासना द्वारें आकलन करणें हाच एक मार्ग आहे. अर्थात् या उपासनेसाठीं जी वस्तु घ्यावयाची ती सगुण साकारच म्हणजे प्रत्यक्ष नामरूपात्मक अशी असल्याशिवाय सामान्य मनुष्याचें भागणार नाहीं. व्यक्त वस्तुवरूनच अव्यक्ताची कल्पना होत असते. मनुष्याच्या जीविताची सुरवात या जगाच्या दृश्य प्रदेशांनच प्रथम होत असते. व जसजशी त्याची वाढ होत जाते–मनुष्याचें ज्ञान वाढत जातें तसतसा तो जगाच्या सूक्ष्म प्रदेशांत दाखल होत जातो.

या जगांत दिसणाऱ्या सर्व वस्तु परमेश्वराचींच रूपें आहेत. इतकेंच नव्हे तर अखील चराचर वस्तूंत परमेश्वर भरलेला आहे. 'न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम्' अशी एकहि चराचर वस्तु नाहीं कीं, जी परमेश्वराशिवाय आहे. तुजवीण तिळभरी रिता ठाव । नाहीं ऐसें विश्व बोलतसे ॥ उपनिषदांत हाच सिद्धांत प्रतिपादिला आहे. परमेश्वर सकल विश्वाचें कारण असून तो पृथ्वी, आप, तेज, वायु इ० सर्व ठिकाणीं

आहे. त्यानेंच हें सर्व जग व्याप्त आहे. पण अशा प्रकारचें परमेश्वराचें सर्व व्यापी ज्ञान हृदयांत एकदम बाणणें कठीण आहे. हें ज्ञान होण्याचें साधन म्हणूनच साकार रूपाची उपासना अस्तित्वांत आली व त्याकरितां मनुष्यानें स्वतांसारखीच म्हणजे मानव रूपधारी सगुण परमेश्वराची मूर्ति पसंत केली. भक्त आपल्या श्रद्धेप्रमाणें देवाचें स्वरूप घडवीत असतो; उपासनेचा हा एक सोपा प्रकार आहे. डोळ्यांना प्रत्यक्ष दिसणारी मूर्ति आधारार्थ पुढें असली म्हणजे त्या ठिकाणीं मन स्थिर करतां येऊन परमेश्वराची उपासना सहज करतां येते. देहधारी मनुष्याचा हा एक स्वभावच आहे. व तो काढून टाकतां येणें शक्य नाहीं. म्हणून उपासनेसाठीं निर्गुण ब्रह्मांतून सगुण ब्रह्मांत सत्यांतहि अव्यक्त व गुणांतून व्यक्त सगुणांत येणें अत्यंत जरूर आहे. ‘आला आकारा आमुच्या चाडा। तुका म्हणे भिडा भक्तांचिया ॥’

सर्वच जर परमेश्वराचीं रूपें आहेत—अमूक वस्तूंत परमेश्वर नाहीं असें जर कांहींच नाहीं, तर मग मनुष्यानें उपासनेंकरितां घेतलेल्या मूर्तींत परमेश्वर नाहीं असें कसें ह्मणतां येईल ?

अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव। प्रतिमा तो देव कैसा नव्हे ? ॥
नाहीं भाव तया सांगावें तें किती। आपुलाल्या मतीं पाषांडिया ॥

या ठिकाणीं भाव हाच विशेष आहे. व तो दृढ करण्याचें साधन ह्मणून साकार देवाची उपासना करणें जरूर आहे. मनाची प्रवृत्ति ईश्वराकडे वळविण्याचें हेंच सुलभ साधन होय.

हरि तुका ह्मणे अवघा एकला। परि हा धाकुला भक्तिसाठीं ॥

ह्या मूर्तींच्याठायीं मनुष्याची मनोवृत्ति जागृत होऊन जशी भक्ति जडेल, त्याप्रमाणें त्याला फल प्राप्ति होत असते.

स्वतंत्र प्रत सं. नि. नं. ८९७

पाषाण देव पाषाण पायरी । पूजा एकावरी पाय ठेवी ॥
पायरी प्रतिमा एकचि पाषाण । परि तें महिमान वेगळालें ॥

पायरी व मूर्ति एकाच दगडाची पण पाषाणाच्या केलेल्या मूर्तींत परमेश्वर आहे, अशी भावना ठेवून तींत आपलें हृदय ओतावयाचें असतें.

तुका ह्मणे संतीं भाव केला बळीं । नकळतां खळीं दूषिला देव ॥

हें रहस्य न कळल्यामुळें अभक्तांनीं मूर्तिपूजेची निंदा केली आहे. मूर्ति दगडाची, काष्ठाची, मातीची अथवा धातूची कां असेना, पण देवाची भावना धरून तिची पूजा केली तर ती देवासच पावते. ज्याला तळमळ लागली असेल त्यालाच त्या मूर्तींत चैतन्य व सामर्थ्य असल्याचें प्रत्ययास येईल.

केला पाषाणाचा विष्णु । परि पाषाण नव्हे विष्णु ॥
विष्णु पूजा विष्णूसी अर्पे । पाषाण राहे पाषाण रूपें ॥

नुसत्या दगडाच्या मूर्तींत तारकत्व नाहीं, तर तें मनुष्याच्या भावनेंत आहे. " यो यच्छ्रद्धः स एव सः " भाव असेल तर धोंडयाचा देव होतो; पण भाव नसेल तर देवहि धोंडा होतो.

तुका ह्मणे मुख्य पाहिजे हा भाव । भावापाशीं देव शीघ्र उभा ॥

परमेश्वराची दृष्टि भक्ताच्या भावाकडे असते. ' भावेन देवं ' जो पुरुष ज्या ज्या भावाच्या ठिकाणीं निश्चित होतो, तो त्या त्या भावानुरूपच फल पावतो.

यस्मिन् यस्मिंश्च विषये यो यो याति विनिश्चयम् ।
स तमेवाभि जानाति नान्यं भरत सत्तम ॥—महाभारत.

भाव ही प्रत्यक्ष कामधेनु आहे " भाव धरी तया तारील पाषाण " मनाच्या इच्छेला भावाचें बळ जितकें मिळेल, त्या मानानें त्या इच्छेची सिद्धि होणार आहे. भाव बळेंच सर्व कांहीं साधतां येतें. परमेश्वर प्राप्ति या भाव बळानेंच करून घेतां येणार आहे. ' भाव बळें फळ इच्छेचें तें '

असें तुकोबा म्हणतात. तें सत्य असून सशास्त्र व सोपपत्तिक आहे. पण हा भाव विवेकाच्या कसोटीवर बावन्नकशी उतरणारा नसेल तर त्याला तुकोबा कांहींच किंमत देण्याला तयार नाहींत.

परमेश्वराची पूजा अर्चा मनोभावें करून त्याची मूर्ति आपल्या हृदयांत ठसविण्याचा प्रयत्न केला व त्याच्या गुणांचें चिंतन केलें तर मनुष्य आत्मोन्नतीच्या मार्गास लागल्यावांचून राहणार नाहीं. ईश्वराच्या शुद्ध स्वरूपाची जसजशी ओळख होत जाते तसतसा मनुष्याच्या अंतील भाव पालटत जातो. " सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म " असा परमेश्वर आहे. तो सत्यस्वरूप आहे ह्मणून सत्यव्रत स्वीकारून न्यायानें वागण्याचा मनुष्यानें प्रयत्न केला पाहिजे. ज्ञानस्वरूप आहे म्हणून ज्ञानाची आवड ठेवून त्याला जाणण्याचा यत्न केला पाहिजे. तसेंच तो अनंत आहे ह्मणून एकलकोंडी वृत्ति न ठेवतां सर्वभूतीं प्रेम ठेवणें अर्थात् ' वसुधैव कुटुंबकम् ' अशी वृत्ति बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

दिसतो हा नव्हे तैसा । असे देशा व्यापक ॥

देव सर्व व्यापक असून त्यास सर्व ठिकाणीं सर्व कांहीं दिसत आहे. तो या जगाचा नियन्ता असून पालकहि आहे. त्याला सद्गुण प्रीय तर दुर्गुण द्वेष्य ह्मणून त्यास आवडणाऱ्या सद्गुणांचा अधिकाधिक लाभ होत जाईल, असें आचरण ठेवून दुर्गुणांचा त्याग केला पाहिजे. सारांश परमेश्वराकडे आपलें अंतःकरण जितकें खुलें करून देतां येईल तितकें तें खुलें करून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. रोजच्या रोज स्वतांमध्यें बदल करून एकेक पायरी वर चढून जाण्याचा यत्न केला व प्रत्येक पायरी चढतांना साधकानें स्वतांची वृत्ति उत्तरोत्तर शुद्ध व उदात्त होत आहे अशी खात्री करून घेतली, तरच त्याचें परमेश्वरविषयक ज्ञान वळावत जाऊन त्याच्या सात्विक

गुणांची वृद्धि होईल, अंतःकरण निर्मळ होईल, आसुरी भाव नष्ट होऊन दैवी गुणांचा त्याच्या ठायीं प्रादुर्भाव होत जाईल. व चित्तशुद्धिद्वारा साम्य-बुद्धि उत्पन्न होऊन देव व भक्त हा भेदहि नष्ट होईल व शेवटी "वासुदेवः सर्वं" अशी मनाची स्थिति होईल.

चित्त रंगलिया चैतन्यचि होय । तेथें उणें काय निज सुखा ॥

मनुष्यामध्यें चिद्रूपानें असणाऱ्या ईश्वराला ओळखणें हीच मनुष्याची इतिकर्तव्यता व हेंच सर्वोपयुक्त व सर्वोत्कृष्ट ज्ञान होय. ही ओळख पटली कीं इहलोकीं मनुष्याला जें कांहीं साधावयाचें, तें त्यानें साधलें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

नकळे महिमा वेद मौनावले । तेथें पांगुळलें मन पवन ॥

अशी वस्तुस्थिति असल्यामुळें परमेश्वराची ओळख कशी होणार व त्याची सेवा तरी कशी घडणार ? ह्मणून प्रापंचिक व्यवहारांतच असा कांहीं सुलभ मार्ग असला व त्यायोगें परमेश्वराची ओळख करून घेतां आली तर चांगलें. आमच्या धर्म ग्रंथांतुन भक्ति हाच सुलभ मार्ग सांगितला असून त्या वाटेनें गेलें असतां ईश्वराची ओळख पटते, असे सर्व साधु संतांनीहि ह्मटलें आहे. भक्तीचा हा मार्ग आमच्या येथें ज्ञानपर उपनिषदांच्या मागून निघालेला आहे. वैदिक धर्माचें प्राचीन स्वरूप यज्ञमय असून ऋग्वेद, संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांत यज्ञयागादि कर्मपर मार्गच मुख्यत्वें प्रतिपादिला आहे. वैदिक धर्माची हीच पहिली पायरी होय. यालाच त्रयी धर्म ह्मणजे तीन वेदांनीं—ऋक्, यजु व साम -प्रतिपादिलेला धर्म ह्मणतात. या धर्मानें स्वर्गांतील दिव्य भोग भोगावयास मिळतात. पण पुण्याचा क्षय झाल्या-बरोबर त्रयी धर्मानें वागणाऱ्यास पुनः मृत्युलोकीं यावें लागतें.

नाना यज्ञ करितां विधि । मंत्र तंत्र पात्र शुद्धि ॥
सहसा पावों न शकें सिद्धी । पावल्या बाधी फळ भोगू ॥—श्रीएकनाथ.

यज्ञयागादि कर्मांत अनेक प्रकारचा त्रास सहन करावा लागून त्यांत सिद्धी मिळेलच अशी खात्री नसते. व कदाचित् मिळाली तर फलभोगार्थ जिवाच्या स्वर्गांतील येरझाऱ्या ह्मणजे जन्म मरणाच्या फेऱ्या चुकत नाहींत. अर्थात् या फेऱ्यांतून सुटका होण्याला जिवाला ब्रह्मात्मैक्य ज्ञान झालें पाहिजे. तो मनाचा विषय असल्यामुळें औपनिषदिक ज्ञानमार्गाचा प्रादुर्भाव झाला. यालाच वेदान्त ह्मणतात. उपनिषदांत यज्ञयागादि कर्में गौण मानली आहेत. औपनिषदिक ज्ञानाचा विकास होत असतांनाच त्यांतून भक्तिमार्ग निर्माण झाला. भक्तींत कर्म, ज्ञान व प्रेम या तिहींचा समावेश होतो.

ब्रह्माची प्राप्ति होण्याला ब्रह्मचिंतनाची जरूर आहे; पण हें चिंतन योग्य प्रकारें करतां येण्यास प्रथमतः चित्ताची एकाग्रता झाली पाहिजे. अर्थात् ही एकाग्रता साधण्यासाठीं परमेश्वराचें कांहीं तरी सगुण प्रतीक दृष्टिसमोर ठेवण्यास हरकत नाहीं, असें छांदोग्यादि उपनिषदांतून सांगितलें आहे. व्यक्त मानव देहधारी ईश्वराची उपासना प्राचीन उपनिषदांत सांगितलेली नाहीं, तरी अव्यक्त व निर्गुण ब्रह्माचें आकलन होणें कठीण असल्यामुळें रुद्र, शिव, विष्णु, सूर्य, अग्नि इ० ची उपासना करण्यास उपनिषत्कारांची मान्यता आहे. व त्याचेंच पुढें रूपांतर मानव रूपधारी मूर्ति पूजेंत होऊं लागलें व तेव्हां पासूनच भक्तिमार्गाची विशेष प्रवृत्ति झाली. हा मार्ग गौतम्बुद्धाच्या पुष्कळ पूर्वीं निघालेला आहे. पंचायतनांची उपासना तेव्हांपासून सुरू झाली व त्या देवतांचीं ठिकठिकाणीं मोठमोठीं मंदिरें बांधण्यांत येऊन अनेक तीर्थें, क्षेत्रें इ० ची उत्पत्ति झाली; आणि तेथें त्या देवतांचें गुण वर्णन, कथा कीर्तन, पुराण, धर्मविषयक चर्चा इ० होऊं लागलीं. ह्या बाह्योपचारांनींच अंतस्थ प्रेम प्रगट होऊं लागतें व तें ह्या प्रतीकांच्या पलिकडचा जो उपासना विषय तेथपर्यंत जाऊन पोंचतें. पूर्वीं उप-

निषत्काळांत सर्व एकत्र जमून धर्मविषयक चर्चा करीत असत. व ईश्वरविषयक ज्ञान संपादण्याचा प्रयत्न करीत असत. पण पुढें यज्ञक्रिया संपुष्टांत आल्यामुळें ईश्वरविषयक ज्ञान प्राप्त करून घेण्याला अशा मंदिरांचा विशेष उपयोग होऊं लागला.

वस्तुत: देव देवळांतच आहे, असें नाहीं. तो सर्वत्र असल्यामुळें त्याचें चिंतन कोठेंहि असतां करतां येतें. ईश्वराची मूर्ति एकदां अंत:करणांत स्थिर झाल्यावर देवळांत जाण्याची जरूर रहात नाहीं. पण हें ईश्वराचें खरें स्वरूप जाणण्याची इच्छा उत्पन्न होण्याला व मनुष्याची श्रद्धा एकवटून तिला योग्य दिशा लागण्याला देवस्थान हें एक साधन आहे. वनश्रीनें शोभिवंत अशा रम्यस्थळीं हीं देवळें बांधण्यांत येत असल्यामुळें तेथें प्रवेश करतांच मनुष्याचें मन प्रसन्न होतें व देवाच्या ठायीं तें कांहीं वेळ रममाण होतें. देवळाच्या आजूबाजूची रमणीय जागा व तेथील वृक्षांची शोभा, शुद्ध हवा इ० च्या योगानें मन प्रफुल्लित होऊन तें उच्च वातावरणांत वावरूं लागतें. अद्यापि कांहीं क्षेत्रांच्या ठिकाणीं अशी नैसर्गिक रमणीयता अवलोकनांत येते; पण बऱ्याच ठिकाणीं ही रमणीयता नष्ट करण्याचा लोकांचा हल्लीं प्रयत्न चालू आहे. देवदर्शन घेतल्यानंतर देवळाच्या आसपास असलेल्या उघडया रमणीय व स्वच्छ अशा जागेंत बसून मोकळ्या मनानें इतरांबरोबर संभाषण करून आनंदांत वेळ घालविण्यालाहि अशा स्थानांचा फार उपयोग होत असतो. पण हल्लीं तशी सोय नसल्यामुळें देवळांत जाण्याची लोकांची प्रवृत्ति कमी होत चालली आहे.

सध्यांची स्थिति पाहिली तर एकाच गांवांत थोडयोडया अंतरावर अनेक देवळे असतात व तेथें बहुतेक अंधेर असून कितीतरी केरकचरा व घाण सांठलेली असते. पण तिकडे कोणी लक्षहि देत नाहींत. फक्त उत्स-

वाचे वेळीं थोडी साफसफाई होईल तेवढीच. यापेक्षां गांवांत एक दोनच देवळें असून तीं हवाशीर अशा स्वच्छ जागीं असलीं व त्यांची योग्यप्रकारें व्यवस्था ठेवण्यांत आली, तर त्यांचा लोकांना कितीतरी चांगला उपयोग होईल. देवळाचा आंतील भाग रमणीय व पवित्र असणें जितकें अवश्य आहे, तितकेंच त्याच्या आसपासचा प्रदेश रमणीय व स्वच्छ असणें जरूरीचें आहे. तेथें कीर्तन व पुराण श्रवणाची सोय असावी. निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर व्याख्यानें व्हावीं. धार्मिक बाबतींत कोणकोणतीं मतें निरनिराळ्या देशांत हल्लीं प्रचलित आहेत, त्यांची माहिती देण्यांत यावी. लहान मुलांस ऐतिहासिक माहिती सांगून त्यांना सत्यान्वेषणाचें शिक्षण देण्यांत यावें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अज्ञ असणाऱ्या लहान थोर हिंदु स्त्रीपुरुषांस उंच नीच इ० भेदभाव बाजूस सारून धार्मिक बाबतींत सुज्ञ व सुबुद्ध करण्याचा तेथें अवश्य प्रयत्न व्हावा. हें सर्व घडून येण्याला सर्वांनीं एकमेकांशीं प्रेमानें वागून सहकार्य केलें तरच सर्व कामें व्यवस्थितपणें होतील व इष्ट फलप्राप्ति होईल. सहकार्याचा हा गुण एकदां अंगीं बाणला म्हणजे इतर कार्यांतहि सहकार्य होण्यास वेळ लागणार नाहीं.

देवळाच्या आसपास बाग व क्रीडांगणें असावींत व तेथें ऐतिहासिक स्त्रीपुरुषांच्या तसबिरा व पुतळे ठेवण्याची व्यवस्था व्हावी. अर्थात् अशा स्थळीं नियमितपणें देवदर्शनास जाणाऱ्या इसमाला योग्य व्यायाम होऊन त्याचें शरीरारोग्य चांगलें राहील व कीर्तन, पुराण, व्याख्यानादि श्रवणानें मनाला चांगलें वळण लागून त्याला परमार्थहि साधतां येईल. या दृष्टीनें विचार केला म्हणजे देऊळ हें जनतेला भक्तिमार्गाला लावणारें एक पवित्र स्थान असून ज्ञान व नीति संवर्धन करणारें आहे असें म्हणण्याला हरकत नाहीं. आज त्याचा दुरुपयोग होत आहे. पण त्याचा मूळ उद्देश स्तुत्य

होता. इतर बाबतीत आमचे लोक जसे मागें पडत चालले आहेत, तसेंच या धर्माच्या बाबतीतहि ते मागें पडत आहेत.

देव मुळांत एकच असल्यामुळें निरनिराळ्या धर्मपंथांत जे कलह होत आहेत, ते मूर्खपणाचे असून अज्ञानमूलक आहेत, असेंच ह्मणावें लागतें. कोणतीहि देवता घेतली तरी ती भगवंताचें एक प्रकारचें रूप आहे, ही जाणीव प्राचीन काळा पासून वैदिक धर्मांत चालत आहे. शिव, शक्ति, गणपती इ० चें यजन करणारे पर्यायानें विष्णूचेंच यजन करतात—

शिवशक्ति आणि सूर्य गणपति । एकचि ह्मणती विष्णूसहि ॥

हे सर्व देव एकाच परमेश्वराचीं रूपें असल्यामुळें देव कोणता कां असेना 'सकळ देवांचें दैवत । उभें असे रंगा आंत ॥' यांत भक्ति मुख्य असुन देवता रूप प्रतिक गौण होय. मनुष्याची जशी आवड त्या-प्रमाणें त्यानें त्याला प्रीय असलेल्या देवाची उपासना सुरू केली. भेद-भावाची त्यावेळीं मुळींच कल्पना नव्हती.

हरिहरां भेद । नाहीं करूं नये वाद ॥
एक एकाचे हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ॥
भेदकासी नाड । एक वेलांटीच आड ॥
उजवे वामांग । तुका म्हणे एकचि अंग ॥

पण पुढें ही दृष्टि अज्ञानामुळें नष्ट होऊन वृथाभिमान वाढत गेला
मतमतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला । जो जे मतीं सांपडला ॥ तयासी तोचि थोर ॥ श्रीसमर्थ.

निरनिराळे पंथ उत्पन्न होऊन त्यांच्यांत परस्पर वैरभाव वाढला.

देव झाले उदंड । देवाचें मांडिलें बंड । भूता—देवाचें थोतांड । एकचि जाहले ॥—श्री समर्थ.

१०३२

देव उदंड होऊन त्यांचें जणूं बंडच माजलें व मुख्य परमात्मा कळेनासा झाला.

धर्माच्या अंतरंगाकडे जितकें लक्ष द्यावयास पाहिजे तितकें न दिल्यामुळें कर्मकांडांच्या कोंडवाडयांत स्वतांस कोंडून घेऊन हे लोक अनुदार वृत्तीचे बनले. बाह्यविधि व क्रिया यांचेंच अवडंबर माजविण्याकडे त्यांची प्रवृत्ति होऊं लागली. धर्माचें संरक्षण करण्याकरितां बाह्यविधींची अवश्यकता असली तरी त्यापासून धर्मतत्वाचा लोप होणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे. पण हें तत्व मागें पडून बाह्य विधींचे स्तोम इतकें माजलें कीं, पाषाण मूर्तींत चैतन्यरूपी ईश्वर पाहण्या ऐवजी उपासकांची वृत्तीच पाषाणमय बनत गेली व त्यामुळें खऱ्या धर्माची पायमल्ली झाली.

जड पूजुनि जड झाले । व्यर्थ जन्मुनिया मेले ॥

धर्माच्या नांवावर देवतांचे अचाट सोहाळे, अशुद्ध आचार, सोंवळ्या ओंवळ्याचें वरपांगी बंड, दानधर्माचे विकृत स्वरूप, स्वपंथाबद्दल फाजील दुरभिमान व अन्य पंथांबद्दल असहिष्णुता इ० अनिष्ट प्रकारांचा शिरकाव होऊन व कित्येक पंथांत अनेक किळसवाण्या गोष्टी शिरून हिंदुधर्मास अत्यंत हिडिस स्वरूप प्राप्त झालें आहे. ह्मणून यांत ज्या वाईट गोष्टी शिरल्या आहेत, हीणकस भागाचें मिश्रण झालें आहे, तें काढून टाकुन धर्माचें शुद्धस्वरूप जनतेपुढें येईल, असे प्रयत्न होणें अत्यंत इष्ट आहे.

सर्व दैवतें एकाच परमात्म्याचीं रूपें आहेत अशी जाणीव मनांत ठेवुन निरनिराळ्या पंथांचे लोक वागूं लागतील तर त्यांच्यांत भांडणें होण्याचें कारणच उरणार नाहीं. संतांची या दैवतांविषयींची कल्पना अशीच होती. त्यांनीं अन्य देवतांचा उपहास किंवा निंदा केली नाहीं. एका परमात्म्याच्या ह्या विभूती आहेत, असेंच ते मानीत असत व सर्व उपास-

कांबरोबर स्वताची श्रद्धा न सोडतां व इतरांची श्रद्धा न दुखवितां ते बंधुत्वाच्या नात्यानें वागत असत. अशा वागणुकीमुळेंच त्यांच्या ठायीं दिव्य तेज निर्माण होत असे. तुकोबा हे पांडुरंगाचे भक्त होतें तरी ते इतर देवभक्तांनाहि सारखाच मान देत असत.

आतां देवळाच्या नुसत्या पायऱ्या झिजविल्या म्हणजे देवाची प्राप्ति होतें, असें जरी नसलें तरी देवाकडे लक्ष वेधण्याचें हें एक साधन आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. परमेश्वराची प्राप्ति होण्याला त्याची एकान्तिक भक्ति करणें हेंच मुख्य साधन सांगितलें आहें " निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास " व अशी भक्ति करतां करतां बुद्धि स्थिर होऊन अखेर त्याचें ज्ञान होतें. देवळांत गेलेंच नाहीं, तर देवाची आठवण तरी कशी होणार? आठवण होईल तरच देवाचें वास्तविक स्वरूप कसें आहे, तें समजून घेण्याची इच्छा होईल व दीर्घोद्योगानें देवाच्या सत्य स्वरूपाविषयीं चित्तांत प्रकाश पडून जनीं जनार्दन असल्याचें प्रत्ययास येईल, यांत संदेह नाहीं.

सगुण रूपाचे ज्ञान झाल्यानंतरच हळूहळू निर्गुणाचा अनुभव येत जातो. धर्मग्रंथांतून ब्रम्हप्रतीकाची चढती उपासना अशाच प्रकारें वर्णिली आहे.

ध्यानीं ध्यातां पंढरीराया । मनासहित पालटे काया ॥
तेथें बोला कैंचि उरी । माझें मीं पण झाला हरी ॥
चित्त चैतन्यीं पडली मिठी । दिसे हरिरूप अवघी सृष्टि ॥
तुका म्हणे सांगों काय । एकाएकीं हरिवृत्तिमय ॥

तुकोबांनीं हा अनुभव मार्ग अशाच प्रकारें शनैः शनैः आक्रमिला. विठाबाची भक्ति त्यांच्या कुळांत पूर्वापार होतीच; अर्थात् त्यांची त्यांच्या

कुलदैवताविषयीं पूज्यबुद्धि होणें साहजिक असून त्याप्रमाणें 'विठ्ठल कुळीचें दैवत' म्हणून त्यांनीं त्याची भक्ती आरंभिली.

पंढरीची वारी आहे माझें घरीं । आणिक न करी तीर्थ व्रत ॥
व्रत एकादशी करीन उपवासी । गाईन अहर्निशी हरिनाम ॥

याप्रमाणें वारकरी पंथाचा जो साधन मार्ग तोच त्यांनीं स्वीकारला. एकादशीचें उपोषण व पंढरीची वारी तेव्हांपासून ते करूं लागले. संतांच्या संगतींत देवाचे गुणानुवाद ऐकावयास मिळतात म्हणून त्यांनीं संत संगति केली.

मनुष्याला जशी चांगली अथवा वाईट संगति असेल त्याप्रमाणें त्याला चांगले अथवा वाईट गुण जडत असतात. सज्जनाचीं संगति झाली तर त्याच्या मनावर चांगल्या गुणांचा संस्कार होऊन तो सन्मार्गाला लागतो 'क्षणमिह सज्जन संगति रेका । भवति भवार्णव तरणे नौका' सज्जन संगति ही या भवार्णवांतून पार पाडण्याला नौकाच आहे. सामान्यजनांस सरस्वती मंदिरांत नेऊन त्यांना विचार करावयास लावणें व त्यांचें कल्याण करणें, हेंच सज्जनांचे कर्तव्य असल्यामुळे त्यांचा स्वभावच असा बनतो कीं त्यांचे विचार व मनोभाव त्यांच्या वर्तनांत व्यक्त होऊन त्याचा परिणाम सामान्य जनसमुहाला योग्य वळण लागेल असाच होतो. संत कोणत्याहि प्रकारचा भेदभाव मनांत न बाळगितां समबुद्धीने व प्रेमळपणें लहान थोर, गरीब श्रीमंत, विद्वान अविद्वान, ब्राम्हण ब्राम्हणेतर, स्त्रीपुरुष इ० सर्वांबरोबर मिळून मिसळून वागतात.

धरे ऐसें सहनशील । हृदय जयांचें अतिकोमल ।
समदृष्टीनें पाहती सकल । प्राणियातें ॥

अशी ज्या संतांची योग्यता ते जनतेला सद्भावनांचा व सदाचारांचा दंडक आपल्या पुण्य चारित्र्यानें व प्रबोधशक्तीनें लावून देतात. समर्थ म्हणतात—

जयाचेनि संगे महादुःख भंगे । जगीं साधनेंवीण सन्मार्ग लागे ॥

संत ज्ञानानें व भक्तीनें श्रेष्ठ असल्यामुळें त्यांच्या केवळ संगतीनें प्रयास न पडतां मनुष्याला सन्मार्ग लागून त्याच्या सर्व दुःखाचा परिहार होतो.

संसारीचें सार जया नाश नाहीं । तेंचि पडे ठायीं संत संगे ॥

नाशिवंत मानलेल्या संसारांतच शाश्वत सार आहे व तें संतसमागमानेंच प्राप्त होतें. तुकोबांना याच कारणास्तव संत संगतीची गोडी लागली.

संतांचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःख लेश ॥
तेंथें मी राहीन होऊनि याचक । घालितील भीक तेंचि मज ॥
संताचिये गांवीं वरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥
संतांचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्वकाळ ॥
संतांचा उदीम उपदेशाची पेठ ॥ प्रेम सुख साठीं घेतीं देती ॥

तुका म्हणे तेथें आणिक नाहीं परी । म्हणोनि भिकारी झालों त्यांचा ॥

संत उदार असून आनंद देणारे आहेत. ते सुखाचा सागर आहेत त्यांच्या संगतीनें त्यांच्या ज्ञानाचा व भक्तीचा अलभ्य लाभ होऊन ईश्वराची प्राप्ति सहज करून घेतां येते. म्हणून ' तुका म्हणे संत मेळीं । पाय धुळी वंदीन ' याप्रमाणें तुकोबा संत संगतींत राहून पंढरीची वारी करूं लागले.

पहिल्याच वेळीं तुकोबांना पांडुरंगाच्या भेटीची इतकी तळमळ लागून राहिली कीं, पंढरीरायाचें त्यांना केव्हां दर्शन होतें, असें झालें—

तुका म्हणे केव्हां देखीन कळस । पळाला आळस निद्रा भूक ॥

पंढरीला पोंचल्याबर त्यांना जो आनंद झाला त्या भरांत त्यांनी—

पावलों पंढरी वैकुंठ भुवन । धन्य आजि दीन सोनियाचा ॥
धन्य झालो हो संसारीं । आम्ही देखिली पंढरी ॥
चंद्रभागे करूं स्नान । पुंडलिकाचें दर्शन ॥
उभे राहूं गरुडपारीं । डोळे भरूनी पाहों हरी ॥

असे उद्गार काढले. चंद्रभागेंत स्नान करून तुकोबा देवळांत गेले व पांडुरंगाची मूर्ति पाहून अगदीं सद्गदीत झाले.

सुंदर तें ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनिया ॥
गळा तुळसी हार कासे पितांबर । आवडें निरंतर हेंचि रूप ॥
मकर कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभ मणी विराजित ॥

याप्रमाणें पांडुरंगाचें त्यांनीं मोठ्या प्रेमानें वर्णन केलें व ' हेंच माझें सर्व सुख ' असे आनंदाचें उद्गार त्यावेळीं त्यांच्या मुखांतून निघालें.

तुका म्हणे हेंचि सर्व माझें सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥

यावरून पांडुरंगाचे ठायीं प्रथम दर्शनींच त्यांचे किती प्रेम जडलें, हें दिसून येतें.

पांडुरंगाच्या दर्शनानें तुकोबाची जी वृत्ति झाली, त्यासंबंधीं ते म्हणतात—

धांवोनियां आलों पहावया मुख । गेलें माझें दुःख जन्मांतरीचें ॥
ऐकिलेंहि होतें तैसेंचि पाहिलें । मन स्थिरावलें तुझ्या पायीं ॥
तुका म्हणे माझी इच्छा पूर्ण जाली । कांहीं न राहिली वासना हे ॥

पुढें पंढरपुराहून परत निघतांना विठोबाचें स्वरूप अंतःकरणांत बिंबून राहावें म्हणून तुकोबांनीं देवाजवळ मागणें मागितलें—

राहो आतां हेंचि ध्यान । डोळां मन लंपटो ॥
कोंड कोंडुनि धरीन जीवें । देह भावें ओंवाळीन ॥

\+ \+ \+

सदा माझे डोळां जडो तुझे मूर्ती । रखुमाईच्या पति सोयरिया ॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्वकाळ ॥
विठो माउलिये हाची वर देईं ! संचरोनि राही हृदयामाजीं ॥
तुका म्हणे कांहीं न मागे आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥

शेवटीं तुकोबा म्हणतात—

जालों आतां दास । माझी पुरवी हे हास ॥
पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदी हरी ॥
संत समागम । अंगीं भरोनियां प्रेम ॥
चंद्रभागे स्नान । तुका म्हणे हेंचि दान ॥

मराठी ग्रंथ संग्रह
स्थळ प्रत
सं. नं.
ता.

पंढरपुराहून देहूस परत आल्यावर तुकोबा विठोबाच्या भजनपूजनांत रंगून राहूं लागले. त्यावेळीं देहू येथील विठोबाचें देऊळ चांगल्या स्थितींत नव्हतें. तें भंगलेलें होतें. ‘ देवाचें देऊळ होतें तें भंगलें । चित्तासी जें आलें करावेंसें ’ तें तुकोबांनीं दुरुस्त करून तेथेंच ते देवाची पूजा अर्चा करूं लागले. पुढें विठोबाच्या ठिकाणीं त्यांचीं इतकी निष्ठा जडली कीं, विठोबाला दगडाची मूर्ति म्हणणारांचा ते अत्यंत कठोर शब्दांनीं निषेध करूं लागले.

म्हणे विठ्ठल पाषाण । त्याच्या तोंडावरी वहाण ॥
नको नको दर्शन त्याचें । गलित कुष्ट भरो वाचे ॥

इतकें पांडुरंगाच्या सगुण मूर्तीवर तुकोबांचें अत्यंत प्रेम जडलें व ते वारकरी बनून पंढरीस जाऊं लागले.

आषाढी कार्तिकी निर्धारीं । चालवीत पंढरिची वारी ॥
जैसी सासुरवासीण जात माहेरीं । उल्हास अंतरीं धरोनियां ॥

—महिपती.

या पहिल्या अवस्थेंत तुकोबांचा नित्यनैमित्तिक कर्मे, व्रतें उपोषणें इ. वर विशेष विश्वास होता व त्याप्रमाणें ते आचरणहि करीत असत. एकादशीच्या दिवशीं उपवास व रात्रीं जागरण करून विठ्ठल नामाचा घोष करावा, असा ते इतर जनांस उपदेशहि करीत.

जया नाहीं नेम एकादशी व्रत । जाणावें तें प्रेत शव लोकीं ॥
जयाचिये द्वारीं तुळसी वृंदावन । नाहीं तें स्मशान गृह जाणा ॥
एकादशी सोमवार न करिती । कोण त्यांची गति होइल नेणो ॥
हरी हरा नाहीं बोटभरी वाती । कोण त्याची गति होईल नेणो ॥

हरिदिनीं निराहार करून भगवद्भजन करणें हें भागवत धर्मीयांचें महाव्रतच होतें व तुकोबांच्या पहिल्या अवस्थेंत तें त्यांना पटून त्यांनीं त्यासंबंधीं व इतर गोष्टी संबंधींहि लोकांना कळवळ्यानें उपदेश केला आहे.

पंधरा दिवसां एक एकादशी । कां रे न करिशी व्रतसार ॥
काय तुझा जीव जातो एका दिसें । फराळाच्या मिसें धणी घेसी ॥
तुका म्हणे कां रे सकुमार जालासी । काय जाब देसी यमदूतां ॥

\+ + +

पराविया नारी माउलीसमान । मानिलिया धन काय वेंचे ॥
न करितां परनिंदा परद्रव्य अभिलाष । काय तुमचें यास वेंचे सांगा ॥
बैसलिया ठायीं म्हणतां रामराम । काय होय श्रम ऐसें सांगा ॥
संतांचे वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेचें सांगा ॥
खरें बोलतां कोण लागतो सायास । काय वेंचे यास तुमचें सांगा ॥
तुका म्हणे देव जोडे याचसाठीं । आणिक ते आटी नलगे कांहीं ॥

नित्यनेम पाळून व परस्त्री, परधन, परनिंदा, इ. सर्व वर्ज करून सदाचारानें जो वागेल व संत वचनांवर विश्वास ठेवून देवाला शरण जाईल त्यालाच ईश्वराची प्राप्ति होईल, यावरून विठोबाची भक्ति करीत असतां तुकोबांचें लक्ष संसारांतील कर्ममार्गाकडे नव्हतें, असें म्हणतां येत नाहीं.

## अध्ययन.

केली आटा आटी । अक्षरांची देवासाठीं ॥

तुकोबांचा नित्यक्रम म्हटला म्हणजे रोज प्रातःकाळीं उठून शौचमुखमार्जनादि प्रातर्विधी आटोपून व इंद्रायणींत स्नान करून देवळांत जावें, तेथें विठोबाची पूजा अर्चा करून इंद्रायणी नदीच्या पलिकडे भामनाथ, भंडारा अथवा गोरडा यांपैकीं कोणत्यातरी एका डोंगरावर जाऊन एकांतांत नामस्मरण, भजन व ग्रंथपठण करावें, असा होता.

एके दिवशीं असेंच तुकोबा भामनाथाच्या डोंगरावर जाऊन एकांतांत भजन आटोपून ग्रंथपठण करीत बराच वेळ बसले. नित्याप्रमाणें ते घरीं न आल्यामुळें जिजाबाईला चैन पडेना. 'ती कर्कशा व भांडखोर असून स्वभावानें तापट होती,' असें तिच्या संबंधीं वर्णन केलें आहे. तसेंच 'ती थोर पतिव्रता होती,' असेंहि म्हटलें आहे "नारीरूपं पतिव्रतं" पातिव्रत्य हेंच स्त्रीचें खरें सौंदर्य आहे व तें संपादणें प्रत्येक स्त्रीच्या हातांत आहे. 'पंचप्राण भ्रतारापाशीं' हा स्त्रियेला भूषणास्पद मानलेला मुख्य गुण जिजाबाईंत विशेषत्वानें वास करीत असल्यामुळें तुकोबा घरीं न आल्याकारणानें तिला घरकाम सुचेनासें झालें. तिनें घरच्या मंडळींकडून त्यांचा पुष्कळ शोध करविला. तेव्हां मोठ्या प्रयासानें भामनाथावर ते एकांत ठिकाणीं बसलेले आढळले. तुकोबांना परमार्थाची भूक विशेष लागल्यामुळें त्यांनीं परमार्थपर ग्रंथ पाहण्याची मोठ्या आस्थेनें सुरवात केली होती. त्यांचा अभ्यास दांडगा होता. त्यांचें शिक्षण कसें व कोठें झालें यासंबंधीं कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. त्यांना लिहितां वाचतां चांगलें येत होतें, इतकेंच नव्हे तर शास्त्र पुराणादि संस्कृत ग्रंथ व ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत इ० प्राकृत

ग्रंथ, यांचें त्यांनीं चांगलें पठण केलें होतें, असें त्यांच्या अभंगाच्या रचनेवरून दिसून येतें.

मथळ्यावरील अभंगांत म्हटल्याप्रमाणें तुकोबांनीं देवाच्या प्राप्तीसाठीं अक्षराची आटाआटी केली.

पाहिलीं पुराणें । धांडोळलीं दरुषणें ॥
ऐसा न देखे मी कोणी । दुजा यो त्रिभुवनीं ॥

त्यांनीं पुराणें पाहिलीं व षड्दर्शनेंहि धुंडाळली; पण परमेश्वराशिवाय या त्रिभुवनांत दुसरा कोणी समर्थ नाहीं असेंच त्यांना त्यावरून समजून आलें.

ज्याचे गर्जतां पवाडे । श्रुति शास्त्रां मौन पडे ॥

यासारख्या त्यांच्या अनेक अभंगांवरून तुकोबांनीं वेदादि ग्रंथ पाहिले होते किंवा त्यांचें श्रवण केलें होतें, असें म्हणावें लागतें, तसेंच ज्ञानेश्वराचे योगवासिष्ठ, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, भावार्थरामायण, नामदेवाचे अभंग इ० चेंहि त्यांनीं चांगलें पारायण केलें होतें.

पेरल्यावांचून उगवत नाहीं, या न्यायानुसार तुकोबांनीं अध्यात्मज्ञान मिळविण्यासाठीं अनेक खटपटी केल्या. त्यांनीं परमार्थ ग्रंथ अत्यंत आस्थेनें पाहिलें, इतकेंच नव्हे तर संतांची संगति करून व तत्कालिन सामाजिक व धार्मिक परिस्थितीचें अवलोकन करून तत्संबंधीं चांगलें ज्ञान संपादन केलें होतें.

ग्रंथाचें पारायण करुनी । अर्थान्वय ध्यानासी आणी ॥ महिपती.

अर्थ ध्यानांत घेऊन पारायण करण्याची तुकोबांची पद्धति असल्यामुळें ग्रंथाचें मर्म त्यांच्या सहज ध्यानांत येत असे. पारायण करण्यांत सुद्धां एक प्रकारचें कौशल्य लागतें. अर्थ समजल्याशिवाय नुसती पानें फिरविलीं म्हणजे पारायण झालें असें नाहीं. पारायण करीत असतां त्याचा अर्थ पूर्णपणें समजण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अर्थ न समजतां केवळ अध्ययन करणें म्हणजे काळाचा अपव्यय करण्यासारखें आहे.

अर्थाविणें जे जे कळा । ते ते जाणावी अवकळा ॥

अर्थ म्हणजे शब्दार्थ नव्हे तर त्याचें रहस्य समजणें हेंच खरें ज्ञान होय.

ज्ञाना वांचून अनुभव येणें शक्य नाहीं. ' नहि ज्ञानेन सदृशं पवित्र मिह विद्यते' ज्ञानासारखें पवित्र असें यालोकीं दुसरें कांहीं नाहीं. ज्ञानानेंच जीवशिवाची गांठ पडते. या दृष्टीनें तुकाबांनीं वाङ्मयाची फारच महति वर्णिली आहे. वाङ्मय ही प्रच्छन्न शक्ति असून तिच्यापासून मनुष्याला प्रचंड शक्ति प्राप्त होते. मनुष्याची उत्तरोत्तर उच्च स्थितींत उत्क्रांति होऊन त्याला उज्ज्वल व उन्नत स्वरूप प्राप्त होण्याला वाङ्मयच कारणीभूत होत असतें. या वाङ्मयांत अशीच कांहीं जादु आहे कीं, त्याच्या सेवनानें मनुष्याचें अंतःकरण परमेश्वराकडे वेधलें जातें. तुकोबा म्हणतात—वाङमय हें उदकाप्रमाणें आहे. तें तृषिताला तृप्त करतें; म्हणून तृषितानें—ज्याला हरिकृपेची तहान लागली असेल, त्यानें--वेद, शास्त्रें, पुराणें, संत वचनें इ० सर्व वाङ्मय जीवाच्या उद्धारासाठीच असल्यामुळें त्याचें मननपूर्वक अध्ययन करून-तृप्त होण्याचा अवश्य यत्न करावा. हें वाङमय निर्माण करण्याचा या आर्यावर्तांत अनेक महात्म्यांनीं आरंभापासून प्रयत्न केला व अज्ञजनांस आत्मबोध होऊन शाश्वत सुखाची जोड करून घेतां यावी

म्हणून अनेक ग्रंथ करून ठेविले. त्यांची योग्यता अवर्णनीय असून ते या राष्ट्राचें सर्वोत्कृष्ट भूषण आहेत. त्यांत मानवी प्राण्याच्या उन्नतीला अवश्यक अशा सद्गुणांचें प्रतिपादन केलेलें असून परमेश्वर प्राप्तीच्या राजमार्गाचें प्रासादिक वाणीनें वित्ररण केलें आहे. ज्यांना त्यांचा लाभ होईल ते थोर भाग्याचे समजले पाहिजेत. शांत वृत्तीनें त्यांतील शब्दांच्या गुह्यार्थांत शिरून त्याचें मनुष्यानें मनन केलें तर हृदयांत अंतःस्फूर्तीचा झरा उमटल्यावांचून राहणार नाहीं. सारांश, अशा वाङ्मयांत मनुष्याचे अंतरंग पालटून टाकण्याचें सामर्थ्य असतें, यांत संशय नाहीं. म्हणून ज्याला आपली उन्नति व्हावी असें वाटत असेल, त्यानें अशा वाङ्मयाचेंच सर्वदा अध्ययन केलें पाहिजे. तळमळ लागलेल्या मनुष्यास त्यांत उन्नतीचा मार्ग सांपडल्यावांचून राहाणार नाहीं.

वेद अनंत बोलिला । अर्थ इतुकाचि साधिला ॥
विठोबासी शरण जावें । निजनिष्ठें नाम गावें ॥
सकळ शास्त्रांचा विचार । अंतीं इतकाचि निर्धार ॥
अठरा पुराणीं सिद्धांत । तुका म्हणे हाचि हेत ॥

\+ + + +

विश्वीं विश्वंभर । बोले वेदांतीचा सार ॥
जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकाश ॥
व्यापिलें हें नारायणें । ऐसें गर्जती पुराणें ॥
जनीं जनार्दन । संत बोलती वचन ॥
सूर्याचिया परी । तुका लोकीं क्रीडा करी ॥

तुकोबा म्हणतात वेदाचें खरें रहस्य आम्हांलाच कळलें बाकीचे वैदिक भारवाहक होत.

वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा । येरांनीं वाहावा भार माथां ॥
खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं । भार धन वाही मजुरीचें ॥

खाण्याचा गोडीचा अनुभव नुसत्या पाहाणारास कसा येईल? तो खाणारासच येणार. यावरून तुकोबांचें अध्ययन किती उच्च दर्जाचें होतें, हें ध्यानांत येणार आहे.

हें ज्ञानोदक पीत असतांच तुकोबांना कवित्वाची स्फूर्ति झाली. तुकोबांना कविता करण्याची स्फूर्ति नामदेवाच्या प्रेरणेनें झाली असेंहि त्यांनीं म्हटलें आहे.

नामदेवें केलें स्वप्नामाजीं जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ॥
सांगितलें काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नको ॥

तुकोबांच्या अंतर्यामीं भक्तिरसाचा जो उदय झाला त्याचाच प्रभाव अभंगरूपानें सहज वाहूं लागला. त्यांच्या अभंगांत निर्मळ भक्तिभाव, आत्मानुभव, भूतमात्राविषयीं प्रेम, सात्विकवृत्ति, निर्मत्सरता इ. संबंधीं जीवन साठविलेलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्यांचें हें अभंगात्मक वाङ्मय धर्मोपदेश, नीत्युपदेश व भगवद्भक्ति यांना वाहिलेलें आहे.

त्यांनीं श्लोक, ओव्या व पदेंहि केलेलीं आहेत पण त्यांची संख्या अल्प असून अभंगाचीच संख्या अतिशय मोठी आहे.

कवित्व करण्यासंबंधीं तुकोबा म्हणतात—

करितों कवित्व म्हणाल हें कोणी । नव्हे माझी वाणी पदरींची ॥
माझीये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ॥
काय मी पामर जाणे अर्थ भेद । वदवी गोविंद तेंचि वदे ॥
निमित्त मापासी बैसविलों आहे । मी तों कांहीं नव्हे स्वामी सत्ता ॥
तुका म्हणे आहे पाईकची खरा । वागवितो मुद्रा नामाची हे ॥

' कविता मी करीत आहे—असें कोणी म्हणतील तर ही माझ्या पदरची वाणी नसून विश्वंभरच मला बोलावित आहे. मी पामर असून मला अर्थज्ञान काय होणार ? मी निमित्त मात्र आहे. मी देवाचा पाईक असून सर्वसत्ता त्याची आहे. '

तुकोबांनी केलेल्या अभंगांतील शब्दयोजना साधी आहे; पण त्यांत तेज, भेदकता, मार्मिकपणा व अनुभवसिद्धता असून एकप्रकारची मोहनी आहे, त्यामुळें त्यांचें अभंग सर्वमान्य झाले आहेत. अंतःकरणाची कळकळ, प्रेम व भक्ति यांच्या सात्विक उमाळ्यापासून ते निघालेले असल्यामुळें त्यांच्या अभंगावर जनतेचें अजूनहि प्रेम अढळ असल्याचें दिसून येतें. त्यांच्या अभंगांची छाप साक्षर व निरक्षर महाराष्ट्रीयांवर इतकी जबरदस्त पडली आहे कीं, त्यांनी केलेल्या अभंगापैकीं एकाद्या अभंगाचा एकादा चरणहि ज्याच्या कानावरून गेला नाहीं, असा एकहि मनुष्य या महाराष्ट्रांत आढळणार नाहीं इतके त्यांचे अभंग सुबोध असून मनाला चटका लावणारे आहेत. काव्य लक्षणाविषयीं समर्थ एके ठिकाणीं ह्मणतात कीं—

कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें सरळ ।
कवित्व असावें वेगळें । अहंतेसी ॥
जेणें अनुताप उपजे । जेणें लौकिक लाजे ।
जेणें ज्ञान उमजे । या नांव कवित्व ॥
जेणें ज्ञान हें प्रबळे । जेणें वृत्ति हे मावळे ।
जेणें भक्ति मार्ग कळे । या नांव कवित्व ॥
जेणें होय समाधान । जेणें तुटे संसार बंधन ।
जया मानितीं सज्जन । त्या नांव कवित्व ॥

तुकोबांचे अभंग वरील लक्षणांनीं युक्त असेच आहेत. ते सुभाषितमय असल्यामुळें त्यांतील बहुतेक चरण लोकांच्या तोंडीं बसून त्यांना म्हणीचें रूप प्राप्त झालें आहे. तसेंच ते सोपे व सरळ असल्यामुळें भजन करणारांचेंहि पाऊल त्यांवाचून हालत नाहीं व हरिकीर्तनांत तर त्यांना अग्रस्थान मिळालें आहे.

तुकोबांच्या अभंगांवांचून हरिकीर्तनाला सुरवात तर होत नाहींच; पण शेवटींसुद्धां " हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा " हा अभंग म्हणून कीर्तन समाप्ति करण्याचा परिपाठ पडला आहे.

> ज्याच्या होय अभंगा वांचुनि होऊनि हरिकथा नाहीं ॥
> श्रोत्यांसि अभंगांहि ती दे जशी माय हरिख थानाहीं ॥

याप्रमाणें मोरोपंतांनींहि तुकोबांच्या अभंगाची महति वर्णिली आहे. त्यांच्या एकंदर काव्याचा विचार केला तर त्यांत सांसारिक व पारमार्थिक व्यवहाराचें बरेंच वर्णन केलेलें आढळतें. सामान्य जनसमूहाला योग्य वळण लागण्याकरितां भक्तिमार्गाचा त्यांत विशेष बोध केला आहे व तो चांगल्या रीतीनें ठसावा म्हणून रसभरित, सरळ व सोप्या भाषेच्या कोंदणांत बसविला आहे. आणि म्हणून महाराष्ट्र कवींत त्यांचा नंबर सर्वांच्या वर लागला आहे.

आतां त्यांच्या अभंगांत परस्पर विरोध बराच आढळतो. पण त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. त्यांचे बहुतेक अभंग स्फुट व प्रासंगिक आहेत. जसा प्रसंग उपस्थित होई त्याप्रमाणें त्यांनीं आपले विचार त्या प्रसंगाला अनुसरून अभंगांत प्रकट केले आहेत. कोठें दया, क्षमा, शांति ईश्वरी प्रेम यांचें गोडवें गाईलें आहे तर कोठें भोंदु, दांभिक, पाखांडी इ० लोकांवर निर्दयतेचे कठोर प्रहारहि केले आहेत. ते एकाच हेतूनें एकाच वेळीं किंवा एकाच अधिकार भुमिकेवर असतांना त्यांच्या मुखांतुन निघालेले नाहींत. तर निरनिराळ्या हेतूंनीं, निरनिराळ्या वेळीं व निरनि-

राळ्या अधिकार भूमिकांवर असतांना ते निघालेले आहेत. तेव्हां ज्या ज्या अवस्थेंतील ते अभंग असतील त्या त्या अवस्थेला धरूनच त्यांचा उपयोग केला म्हणजे त्यांच्या परस्पर विरोधी अर्थाच्या अभंगांची नीट व्यवस्था लागते.

तुकोबांनी केलेल्या अभंगांची निश्चित संख्या सांगता येत नाहीं, तरी त्यांच्या एका भक्तानें दिलेल्या खालील वर्णनावरून ती पांच कोटीच्या वर होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वेदाचे अभंग केले श्रुतिपर । द्वादश सहस्र संहितेचे ॥
निरुक्त निघंट आणि ब्रह्मसूत्र । अवांतर सहस्त्र उपग्रंथ ॥
अभंग ते कोटी भक्तिपर केले । ज्ञानपर केले तितुकेंचि ॥
पंचाहत्तर लक्ष वैराग्य वर्णिलें । नाम तें गाइलें तितुकेंचि ॥
साठी लक्ष केला बोधक जनासी । वर्णिलें रूपासी तितुकेंची ॥
द्वादश सहस्र आत्मबोध केला । अनुभव घेतला एक कोटी ॥
चौतीस सहस्त्र लक्ष कोटी पांच । सांगोनियां साच तुका गेला ॥

तुकोबांना मराठी भाषेचें चांगलें ज्ञान होतें. पण संस्कृत भाषेचेंहि बरेंच ज्ञान होतें, असें त्यांनी ठिकठिकाणीं आपल्या अभंगांत संस्कृत ग्रंथांतील विचाररत्नांचें केलेल्या प्रदर्शनावरून दिसून येतें. खालीं दिलेल्या अभंगावरून त्यांचें संस्कृत भाषेचें ज्ञान किती उत्तम होतें, हें समजून येणार आहे

'अणो रणीयान्महतोमहीयान'

अणुरेणु या थोकडा । तुका आकाशा एवढा ॥

'निर्दोषं हि समं ब्रम्ह'

ब्रम्ह सर्व गत सदासम । जेथें भान नाहीं विषम ॥

'अंत कालेच मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्'

अंतकाळीं ज्यांच्या नाम आलें मुखा । तुका म्हणे सुखा पार नाहीं ॥

'पद्म पत्र मिवाम्भसा'

मग मी व्यवहारीं असेन वर्तत । जैसें जळा आंत पद्मपत्र ॥

'उद्धरेदात्मनात्मान'

आपणचि तारी आपणचि मारी । आपण उद्धरी आपण या ॥

'मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयो:'

आपुलेंचि मन । करवी आपणा बंधन ॥

'हरिर्दाताहरिर्भोक्ता'

दाता नारायण । स्वयें भोगिता आपण ॥

'परोपकार:पुण्यायपापायपरपीडनं'

पुण्य परउपकार पाप ते परपीडा ॥

'क्षमाशस्त्रं करेयस्य दुर्जन: किं करिष्यति ।
अतृणे पतितो वन्हि स्वयमेवोप शाम्यति ॥'

क्षमा शस्त्र जया नराचिये हातीं । दुष्ट तयाप्रति काय करी ॥
तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोनि आपसया ॥

'यथा नद्य: स्यंदमाना: समुद्रेऽस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय'

क्षराला सागर गंगा ओघीं मिळे । आपणचि खेळे आपणाशी ॥

यासारखे आणखी पुष्कळ अभंग देतां येण्यासारखे आहेत. त्यावरून तुकोबांना संस्कृताचें चांगलें ज्ञान होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. संस्कृत भाषा समजण्याला कठीण असल्यामुळें त्या भाषेंत असलेलें अध्यात्म ज्ञान सामान्य जनतेस समजावें म्हणून ज्ञानेश्वर एकनाथादि संतांनीं तें सोप्या व सुगम अशा प्राकृत भाषेंत आणिलें, तोच कित्ता तुकोबांनीं गिरविला व जनतेवर अनेक उपकार करून ठेविले. "वाचा बोलूं वेदनीती । करूं संतीं केलें तें ॥" अशी त्यांची प्रतिज्ञा होती.

## कीर्तन.

कीर्तनें महादोष जाती । कीर्तनें होय उत्तम गती ।
कीर्तनें भगवत्प्राप्ती । यदर्थीं संदेह नाहीं ॥ —श्रीसमर्थ.

कीर्तन हीं एक भक्तीच आहे. भक्ति प्रेम याचें मूर्त स्वरूप कीर्तन होय. भागवत धर्मांत भक्ति प्रमाण असून ती अंगीं बाणण्याला कीर्तन हेंच मुख्य साधन सांगितलें आहे. ज्या ईशसत्तेनें जीव प्रकाशित झाला, त्या सत्तेची जाणीव जीवाला त्याच्या सर्व व्यवहारांत ज्या धर्माच्या योगानें होते व शिवाशीं ऐक्य होऊन जीवाला शांत व निश्चळ स्थिती प्राप्त होते, तोच भागवत धर्म. भागवत धर्म म्हणजे जीव व शिव यांच्या अविभक्ततेच्या प्रतितीचा मार्ग होय. या मार्गाचा प्रसार करणें हेंच कीर्तनाचें ध्येय होय.

भगवद्गुण वर्णनानें मनाला समाधान होऊन भक्ति, ज्ञान, वैराग्य इ० ची चांगली वाढ होते. भक्तीचा आरंभ श्रवणापासून होतो. तुकोबांना प्रथम कीर्तन श्रवणाची गोडी लागली. कोणी हरीदास गावांत आलां असतां त्यांनीं त्याच्या कीर्तनाची तयारी करावी, त्याचें मागें उभें रहावें, धृपद म्हणावें इ० कामें तुकोबा मोठ्या आवडीनें करीत असत.

कीर्तनीं ध्रुपद धरितसे जेथें । अद्‌भूत रंग येतसे तेथें ॥
प्रेमें तुका होय सद्‌गदित। नेत्रीं अश्रुपात वाहती ॥

इतके तुकोबा कीर्तनांत तल्लीन होऊं लागले. व अशाप्रकारें श्रवण भक्ति करितां करितां त्यांची कीर्तन भक्तीकडे प्रवृत्ति झाली. श्रवण भक्तीनंतरच कीर्तनभक्तीला आरंभ होतो. श्रीसमर्थ म्हणतात:—

प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथा पुराण श्रवण ।
नाना अध्यात्म निरूपण । ऐकत जावें ॥

पिंड ब्रह्मांडाची रचना । नाना तत्व विवंचना ॥
सारासार विचारणा । कैसी ते ऐकावी ॥
ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधोनि घ्यावें ।
असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवण भक्ति ॥

याप्रमाणें श्रवणानेंच तुकोबांचे ठायीं कीर्तनभक्तीचा उदय झाला.

पाहुनियां ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हां झालें जाण फळ त्याचें ॥

आरंभीं तुकोबा एकादशीचेच दिवशीं कीर्तन करीत असत.

आरंभीं कीर्तन करी एकादशी । नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ॥
पवित्र होईन चरित्र उच्चारें । रूपाच्या आधारें गोजिरिया ॥
अपुरती बुद्धि पुण्य नाहीं गांठीं । पायीं घाली मिठी पाहे डोळां ॥
गाईन ओविया शिष्टांच्या आधारें । सारीन विचारें आयुष्या या ॥
तुका म्हणें तुझें नाम नारायणा । ठेवीन मी मना आपुलिया ॥

लहान मूल प्रथमच नीट बोलूं शकत नाहीं.

नेणतें लेंकरूं आवडीचें तान्हें । बोलतो वचनें आवडीनें ॥
प्रीतीचिया बोला नाहीं पेसपाड । भलतेंसें गोड करुनी घेई ॥
तैसें विठ्ठल राया तुज मज आहे । आवडीनें गाये नाम तुझें ॥
वेडे वांकडे बाळकाचें बोल । करिती नवल माय बाप ॥
तुका म्हणे तुज येवो माझी दया । जीवींच्या सखया जीवलगा ॥

मुलाचे बोबडे बोल वेडे वांकडे असले तरी मातापिता ते प्रियच मानून घेतात, तद्वत देवानें या कीर्तनाचें कौतुक करावें; असें तुकोबांनीं म्हटलें आहे. याप्रमाणें कीर्तनास आरंभ करून पुढें अभ्यास जसा वाढूं लागला, तसें तुकोबा रोज कीर्तन करूं लागले.

बहुत करावें पाठांतर । कांहीं धरावें ग्रंथांतर । भगवत्कथा निरंतर ।

करीत जावी ॥ आपुलिया सुखस्वार्थी । केलीच करावी हरिकथा ।
हरिकथेविण सर्वथा । राहोंचि नये ॥ भगवंतासि कीर्तन प्रीय ।
कीर्तनें समधान होय । बहुत जनांसि उपाय । हरिकीर्तन कलियुगीं ॥

तुकोबा वैष्णव परंपरेंतील संत होते. त्यांनीं ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, इ. संतांचीं भक्तिज्ञान वैराग्यानें युक्त अशीं अनेक काव्यें पाठ केलीं व त्यांत स्वताच्या शुद्ध प्रेमाची, भक्तीची व अनुभवाची भर घालून संतांनीं स्वीकारलेला मार्ग तसाच पुढें चालू ठेवला.

झाडू संतांचें मारग । आडरानीं भरलें जग । उच्छिष्टाचा भाग ।
शेष उरलें तें सेवूं ॥ पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ॥
तुका म्हणे करा । जयजयकार आनंदें ॥

याप्रमाणें ज्ञानेश्वरादि भक्तिमार्गी साधुसंतांचा जो मार्ग तोच तुकोबांनीं अनुसरला व रोज कीर्तन करण्याचा सपाटा चालविला.

करूं याची कथा नामाचा गजर । आम्हां संसार काय करी ॥
म्हणवूं हरीचें दास लेवूनीं भूषणें । कांपे तया भेणें कळिकाळ ॥
आशा भय लाज आड नये चिंता । ऐसी तया सत्ता समर्थाची ॥
तुका म्हणे करूं ऐसियाचा संग । जेणें नव्हे भंग चिंतनाचा ॥

तुकोबांनीं भगवद्‌गुणवर्णन करून कीर्तन द्वारा जनतेला योग्य मार्ग दाखविण्याची सुरवात केली. अज्ञजनांना जागृत करून त्यांच्या मनावर उत्तम संस्कार व्हावा म्हणून त्यांनीं झटून प्रयत्न केला. ते अति प्रेमळपणानें, शुद्ध भावानें व कळकळीनें कीर्तन करीत असत. त्यांना वक्तृत्व चांगलें साध्य असल्यामुळें कीर्तन प्रसंगीं ते श्रोत्यांचीं मनें हालवून सोडीत असत. त्यांच्या कीर्तनामुळें महाराष्ट्रांत त्यावेळीं मोठी जागृति झाली. तुकोबांचे उद्गार निर्जीव नसून तें व्यावहारिक व पारमार्थिक मार्गांतील अडचणी दूर

करण्याच्या कामीं उपयोगीं पडण्यासारखें असत व लोकांत सामर्थ्य व चैतन्य उत्पन्न करीत असत.

तुकोबांची वाणी रसाळ, प्रासादिक व जोरदार असून कीर्तन करण्याची शैली फार मार्मिक होती. त्यांच्या उपमा समर्पक व हृदयंगम असत. त्यांच्या वेचक व साध्या शब्दांत तेज असून पुष्कळ अर्थ सांठविलेला असे. त्यांच्या कीर्तनांत ईश्वरी प्रेम, करुणा व शांति या रसांचा विशेषत्वानें परिपोष होत असे. भक्तिरूपी जलाची वृष्टि श्रोत्यांच्या मनोभूमीवर होत असल्यामुळें ' त्यांचें कीर्तनीं । रंग येतसे चौगुणी ' असें महिपतीनें म्हटलें आहे. विद्वता, समयसूचकता व वक्तृत्व हे गुण तुकोबांच्या अंगीं चांगल्या प्रकारें वसत असून उपदेशाप्रमाणें त्यांचें आचरण असल्यामुळें श्रोत्यांच्या मनावर त्यांच्या अधिकारयुक्त प्रासादिक वाणीचा चांगला परिणाम होत असे.

शाब्दिक ज्ञान, बाह्य कर्म व दांभिकभक्ति यांचा तुकोबांना तिटकारा असून ते भक्तीला अनुकूल अशाच गुणांचा उपदेश करीत असल्यामुळें त्यांच्या कथा श्रवणानें ' खळ तेहि होती भाविक. ' तुकोबांच्या कीर्तनांत नीत्युपदेश, दंभस्फोट, भागवत धर्माचा प्रसार, भक्ति महात्म्य, इ. चेंच विशेषत्वानें विवरण होत असे. अज्ञानी लोकांची दुःखद व भ्रांत स्थिति पाहून त्यांचें मन कळवळत असे व अधिकारानुरूप त्यांना भक्तीचा, प्रेमाचा व सद्-गुणांचा उपदेश करून त्यांचें अंतरंग निर्मळ व उज्वल करावें व त्यांना उन्नतीच्या मार्गास लावावें; हाच उदात्त हेतु तुकोबांचा होता.

त्यांचें साधुत्व, स्पष्टवक्तेपणा, सरळबुद्धि, निस्पृहपणा, एकनिष्ठ भगव-द्भक्ति, लोकसुधारणेविषयीं अंतःकरणाची कळकळ, विशाळ अनुभव यांमुळें ते आचांडाळ ब्राह्मण, लहान थोर अशा सर्वांना प्रिय व पूज्य वाटूं लागलें

करीत जावी ॥ आपुलिया सुखस्वार्था । केलीच करावी हरिकथा ।
हरिकथेविण सर्वथा । राहोंचि नये ॥ भगवंतासि कीर्तन प्रीय ।
कीर्तनें समधान होय । बहुत जनांसि उपाय । हरिकीर्तन कलियुगीं ॥

तुकोबा वैष्णव परंपरेंतील संत होते. त्यांनीं ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, इ. संतांचीं भक्तिज्ञान वैराग्यानें युक्त अशीं अनेक काव्यें पाठ केलीं व त्यांत स्वताच्या शुद्ध प्रेमाची, भक्तीची व अनुभवाची भर घालून संतांनीं स्वीकारलेला मार्ग तसाच पुढें चालू ठेवला.

झाडू संतांचें मारग । आडरानीं भरलें जग । उच्छिष्टाचा भाग ।
शेष उरलें तें सेवूं ॥ पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ॥
तुका म्हणे करा । जयजयकार आनंदें ॥

याप्रमाणें ज्ञानेश्वरादि भक्तिमार्गी साधुसंतांचा जो मार्ग तोच तुकोबांनीं अनुसरला व रोज कीर्तन करण्याचा सपाटा चालविला.

करूं याची कथा नामाचा गजर । आम्हां संसार काय करी ॥
म्हणवूं हरीचे दास लेवूंनीं भूषणें । कांपें तया भेणें कळिकाळ ॥
आशा भय लाज आड नये चिंता । ऐसी तया सत्ता समर्थाची ॥
तुका म्हणे करूं ऐसियाचा संग । जेणें नव्हे भंग चिंतनाचा ॥

तुकोबांनीं भगवद्‌गुणवर्णन करून कीर्तन द्वारा जनतेला योग्य मार्ग दाखविण्याची सुरवात केली. अज्ञजनांना जागृत करून त्यांच्या मनावर उत्तम संस्कार व्हावा म्हणून त्यांनीं झटून प्रयत्न केला. ते अति प्रेमळपणानें, शुद्ध भावानें व कळकळीनें कीर्तन करीत असत. त्यांना वक्तृत्व चांगलें साध्य असल्यामुळें कीर्तन प्रसंगीं ते श्रोत्यांचीं मनें हालवून सोडीत असत. त्यांच्या कीर्तनामुळें महाराष्ट्रांत त्यावेळीं मोठी जागृति झाली. तुकोबांचे उद्गार निर्जीव नसून ते व्यावहारिक व पारमार्थिक मार्गांतील अडचणी दूर

करण्याच्या कामीं उपयोगी पडण्यासारखें असत व लोकांत सामर्थ्य व चैतन्य उत्पन्न करीत असत.

तुकोबांची वाणी रसाळ, प्रासादिक व जोरदार असून कीर्तन करण्याची शैली फार मार्मिक होती. त्यांच्या उपमा समर्पक व हृदयंगम असत. त्यांच्या वेचक व साध्या शब्दांत तेज असून पुष्कळ अर्थ सांठविलेला असे. त्यांच्या कीर्तनांत ईश्वरी प्रेम, करुणा व शांति या रसांचा विशेषत्वानें परिपोष होत असे. भक्तिरूपी जलाची वृष्टि श्रोत्यांच्या मनोभूमीवर होत असल्यामुळें ' त्यांचें कीर्तनीं । रंग येतसे चौगुणी ' असें महिपतीनें म्हटलें आहे. विद्वता, समयसूचकता व वक्तृत्व हे गुण तुकोबांच्या अंगीं चांगल्या प्रकारें वसत असून उपदेशाप्रमाणें त्यांचें आचरण असल्यामुळें श्रोत्यांच्या मनावर त्यांच्या अधिकारयुक्त प्रासादिक वाणीचा चांगला परिणाम होत असे.

शाब्दिक ज्ञान, बाह्य कर्म व दांभिकभक्ति यांचा तुकोबांना तिटकारा असून ते भक्तीला अनुकूल अशाच गुणांचा उपदेश करीत असल्यामुळें त्यांच्या कथा श्रवणानें ' खळ तेहि होती सात्विक. ' तुकोबांच्या कीर्तनांत नीत्युपदेश, दंभस्फोट, भागवत धर्माचा प्रसार, भक्ति महात्म्य, इ. चेंच विशेषत्वानें विवरण होत असे. अज्ञानी लोकांची दुःखद व भ्रांत स्थिति पाहून त्यांचें मन कळवळत असे व अधिकारानुरूप त्यांना भक्तीचा, प्रेमाचा व सद्-गुणांचा उपदेश करून त्यांचें अंतरंग निर्मळ व उज्वल करावें व त्यांना उन्नतीच्या मार्गास लावावें; हाच उदात्त हेतु तुकोबांचा होता.

त्यांचें साधुत्व, स्पष्टवक्तेपणा, सरळबुद्धि, निस्पृहपणा, एकनिष्ठ भगव-द्भक्ति, लोकसुधारणेविषयीं अंतःकरणाची कळकळ, विशाळ अनुभव यांमुळें ते आचांडाळ ब्राह्मण, लहान थोर अशा सर्वांना प्रिय व पूज्य वाटूं लागले

व त्यांची कीर्ति सर्वांमुखीं होऊं लागली. अशाप्रकारें त्यांचा लौकिक दश-दिशा वेगानें फैलावून त्यांच्या कीर्तनाला लोकांच्या उडया पडूं लागल्या.

तुकोबांना काव्य रचनेला वेळ लागत नसे. कीर्तनाचे वेळीं विषय प्रति-पादनाच्या भरांत आंतडयाला पीळ पडून त्यांच्या मुखांतून कवित्वमय उद्गार सहज बाहेर पडत. ते करारी, तेजस्वी व कधीं कठोरहि असत. व अशा त्यांच्या काव्यानें श्रोतेजन स्वभावतांच आकर्षिले जात. त्यांचा उप-देश सत्य, प्रिय, मित इ० विशेषणांनीं विशिष्ट असे. ते स्वतां सदाचारी, सुस्वभावी, निरहंकारी, प्रेमळ व निर्मळ हरिभक्त असल्यामुळें त्यांच्या गुणांचा ठसा त्यांच्या कीर्तनांत चांगला उमटत असे.

ईश्वरविषयक कर्तव्याची जाणीव होऊन भक्तीचा फैलाव होण्याला व धार्मिक व सामाजिक व्यवहारांत उपयुक्त असें लोकशिक्षणाचें कार्य कर-ण्याला कथा, पुराणें, प्रवचनें इ० साधनांची अत्यंत जरूर आहे. समाजास धर्म व नीति यांचा मार्ग लावून देण्याचें काम कीर्तनकारास फार चांगलें करतां येतें.

कीर्तनें वाचा पवित्र । कीर्तनें होय सत्पात्र । कीर्तनें प्राणीमात्र ।
सुशील होती ॥ कीर्तनें अव्यग्रता घडे । कीर्तनें निश्चय सांपडे ।
कीर्तनें संदेह उडे । श्रोत्या वक्त्यांचा ॥

इतकी कीर्तनाची महति वर्णिली आहे. कीर्तनांतील बोधवचनें ऐकून श्रोत्यांची सावस्थ वृत्ति होते, त्यांच्या ठायीं ईश्वरविषयक प्रेमाचा उद्भव होतो व तो कार्यरूपानें जणूं काय प्रगट होऊं लागतो.

अभिष्ट वरितात जे तव कथेस विश्वासती—मोरोपंत.

कीर्तन हें साधन सामान्य नसून फार श्रेष्ठ आहे.

मराठी ग्रंथ संग्रह
स्पृश्य प्रत
ता.


तुका ह्मणे कथा देवाचें हें ध्यान । समाधि लागोनि उभा तेथें ॥

अशा कथेंत देव समाधिस्त होऊन उभा असतो.

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद ॥

" माझे भक्त गाती जेथें । नारदा मी उभा तेथें " अशा या साधनाचा योग्य उपयोग केला तर त्यापासून पुष्कळ चांगल्या गोष्टी साधतां येणार आहेत. कीर्तनाविषयीं लोकांची स्वभावतांच पूज्य बुद्धि असल्यामुळें त्यांचें अज्ञान, भोळा भाव दूर करून त्यांच्याठायीं निर्मळ भक्ति व सद्भाव यांचे प्रस्थापन किर्तनकारास सहज करतां येणार आहे.

आधींच शिकोन जो शिकवी । तोची पावे श्रेष्ठ पदवी ।
गुंतल्या लोकांस उगवी । विवेक बळें ॥ —श्रीसमर्थ.

भगवद्भक्तीचें महत्व प्रतिपादून सामान्य जनांस सदाचाराचें वळण लावणें व त्यांच्या मनांतील दुर्विकार नष्ट करून त्यांना परमार्थोन्मुख बनविणें, हेंच हरिदासाचें परम पवित्र कर्तव्य होय. ह्मणून हरिदासानें तसल्याच ग्रंथांचें अध्ययन करून त्यांचें हृद्गत स्वतां पटवून घेतलें पाहिजें. तसेंच अनेक विषयांचा ज्ञान संग्रह करून देशांतील सांप्रतच्या सामाजिक, धार्मिक, नैतिक वगैरे स्थितिसंबंधीं चर्चा केली पाहिजे. संसारांत कशा-रीतीनें वागलें असतां ऐहिक अभ्युदय आणि पारमार्थिक निःश्रेयस् साधतां येईल व जीव सुखी, स्वतंत्र व समर्थ होईल, हें त्यांनीं श्रोत्यांच्या मनावर चांगलें ठसविलें पाहिजे. कोरड्या विद्वत्तेनें हें होणें शक्य नाहीं. त्याला जिवंतवाणीची अत्यंत जरूर आहे. 'कथा करीं वरिवरी । प्रेम नसेचि अंतरीं' ईश्वरासंबंधीं प्रेम असून निर्लोभिता व सदाचार हे गुण हरिदासाच्या अंगीं असले पाहिजेत. ते नसले तर त्याच्या कीर्तनाची थट्टा होते.

मोलें घातलें रडाया । नाहीं आसू आणि माया ॥
तैसा भक्तिवाद काय । रंग बेगडीचा न्याय ॥

ह्मणून कीर्तनांत प्रेमाचा ओलावा नसेल तर श्रोत्यांच्या चित्तावर त्याचा कांहींच परिणाम होणार नाहीं.

प्रेमेंविण जे जे केलें । निरर्थक वायां गेलें ॥
मुखें करितो कीर्तन । मनीं विषयाचें ध्यान ॥
केव्हां सरेल हे कथा । चित्त ठेविलें मन्मथा ॥
ऐसें श्रवण कीर्तन । गेलें ओहोळीं वाहोन ॥
तुका ह्मणे पांडुरंग । जाणतसे अंतरंग ॥

प्रेम नाहीं, निष्ठा नाहीं, अंतरिक साधनाची तयारी नाहीं; त्यांनीं केवळ शब्द पांडित्यानें लोकांना फसवूं नये, असें तुकोबांनीं ह्मटलें आहे.

मुखें सांग ब्रह्मज्ञान । जन लोकांची कापितो मान ॥
ज्ञान सांगतो जनासी । नाहीं अनुभव आपणासी ॥
कथा करितो देवाची । अंतरीं आशा बहु लोभाची ॥
तुका ह्मणे तोची वेडा । त्याचें हाणुनी थोबाड फोडा ॥

कीर्तन ह्मटलें ह्मणजे तें भक्तिरूप--प्रेमरूप असें असलें पाहिजे. पण हल्लीं तें कलारूप बनलें आहे. पूर्वीं नुस्ती वीणा टाळ आणि मृदंग हीं साधनें होतीं, त्यांच्या जागीं आतां तबला, पेटी इ० आलीं असून संगीताचें अंग विशेष वाढलें आहे. पण भक्तिरस वाढला नाहीं, तर उलट तो आटत चालला आहे. तुकोबा ह्मणतात.

काय बा करिशी टाळ आणि मृदंग । जेथें पांडुरंग रंगला नाहीं ॥
काय बा करिशी ज्ञानाचिया गोष्टी । करणी नाहीं पोटीं बोलण्याची ॥

अंतरीं प्रेम नसेल तर नुसत्या तालसुरानें व मधुर आलापीनें काय होणार आहे ? उत्तम स्वर नसला व मधुर शब्दानें गातां येत नसलें तरी

हरकत नाहीं. देव त्यांचा भूकेला नाहीं. तो प्रेमाचा व भावाचा भुकेला आहे.

नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥
नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल । येईल तैसा बोल रामकृष्ण ॥

भक्तिरसाला पेटीची गरज नाहीं. भक्तिरस उत्पन्न होण्याला अंतरिक साधनांचीच तयारी झाली पाहिजे. "बोलों जाणें अंगीं नाहीं शूरपण । काय तें वचन जाळावें तें ॥" पण हें विसरून जाऊन कीर्तनावर पोट भरणारे हरिदास फार झाले व त्यामुळें कीर्तनाचा श्रोत्यांवर व्हावा तसा परिणाम होईनासा झाला.

हाका मारी ज्याच्या नांवें । त्याचें गांवचि नाहीं ठावें ॥
काय गातो हें कळेना । राग आळवितो नाना ॥
आशा धरूनियां मनीं । कांहीं देईल ह्मणउनी ॥
वितभरी पोटासाठीं । तुका ह्मणे पडिली तुटी ॥

कीर्तनाबद्दल द्रव्य घेणारांची व देणारांची तुकोबांनीं चांगलीच कानउघाडणी केली आहे. कीर्तनाचा विक्रय करणाऱ्या हरिदासास तर त्यांनीं वाईट शब्दांनीं संबोधिलें आहे.

कीर्तनाचा विकरा तें मातेचें गमन । भाड खाई धन विटाळ तो ॥

\+ + + +

कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांव ॥

इतकेंच नव्हें तर अशा प्रकारें कीर्तन करणारा व करविणारा या दोघांनाहि अधोगतीच मिळणार असें तुकोबांनीं म्हटलें आहे.

कथा करोनिया द्रव्य देती घेती । तया अधोगति नरकवास ॥

श्रोत्यांना निष्कामतेचा उपदेश करणारा हरिदास स्वतां निष्काम असला पाहिजे. त्याची वृत्ति शुद्ध व उदात्त असली पाहिजे. काम, क्रोध, लोभ इ० षड्रिपूंच्या दुष्ट मळाचा मनाला विटाळ होऊं न देतां त्यांत सात्विक प्रेमाचा जोर बळावला पाहिजे. त्याचे विचार व मनोभाव अत्यंत उन्नत असले पाहिजेत. पण अशी जाणीव ठेवून कीर्तन करणारे फारच विरळा.

कीर्तनाच्या पूर्वरंगांत संसाराची निःसारता प्रतिपादून तो त्याज्य ठरविण्याचा बहुतेक कीर्तनकाराचा अलिकडे परिपाठच पडला आहे. किंबहुना साधुसंतांच्या वाक्यांचा ओढाताण करून संसाराचा कडक शब्दांनी निषेध करणें हें जणुकाय त्यांचें कर्तव्यच ठरलें आहे. वस्तुस्थितीचा हा विपर्यास असून सामान्य जनतेवर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. संतांच्या ह्मणण्याचा हेतु पूर्णपणें लक्षांत न घेतां ‘ संसार अनर्थमूलक आहे ’ इतकेच त्यांचे शब्द पुढें करून सामान्य जनतेच्या मनावर मोहिनी पाडण्यांत येत असल्यामुळें संसाराचा मूळ हेतु बाजूला राहून भलत्याच गोष्टींना महत्व प्राप्त होत असतें. मूळ तत्व शोधनाचा यत्न करण्याची हरिदासांतच पंचाईत; मग सामान्य जनता या विषयांत खोलांत जाऊन त्याचा विचार करण्याच्या यातायातींत कशाला पडत ? परमेश्वरानें हें जग निर्माण केलें असून यच्चावत जीवजात त्याचेच अंश आहेत व त्यामुळेंच हा संसार वाढला आहे. तो मोडून टाकण्याचा उपदेश करणें म्हणजे परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध जाण्यासारखें आहे. जगांतील दृश्य अदृश्य सर्व वस्तूंबद्दल विचार करतां कोणतीहि वस्तु निरुपयोगी नाहीं, हें रोज नवीन नवीन लागणाऱ्या शोधावरून ठरत आहे; अर्थात् परमेश्वराचीच ही सर्व सृष्टि असल्यामुळें ती निरुपयोगी आहे, असें विधान करणें ह्मणजे परमेश्वरास दोष देण्यासारखें आहे.

आमचीं धर्मशास्त्रेंसुद्धां संसार करावा ह्मणून सांगत आहेत, हें त्यांतील शासनपद्धतीवरून सहज ध्यानांत येणार आहे. शास्त्रांत विधिनिषेधादि जे नियम सांगितले आहेत ते योग्य रीतीनें न पाळल्यास प्रपंच बाधक होतो. जगांत चांगलें अथवा वाईट कांहींच नाहीं. तर तें ठरविणारावर आहे. वस्तु मुळांत वाईट नसते व चांगलीहि नसते; तर तिची योजना करणारा जसा असेल त्याप्रमाणें ती चांगली अथवा वाईट ठरते; तद्वत संसार सुखदायक अथवा दुःखदायक नसून तो करणारा जसा असेल त्याप्रमाणें त्याचा संसार सुखाचा अथवा दुःखाचा होत असतो. 'योजकस्तत्र दुर्लभः' सोमल खाऊन मनुष्य प्राणास मुकतो, पण वैद्य त्यानेंच त्याचा प्राण वांचवितो. ह्मणून संसाराची निंदा न करितां संसारांत कशा प्रकारें वागलें असतां तो श्रेयस्कर होईल याबद्दल शास्त्राधारें प्रतिपादन करणें हेंच इष्ट होय. पारमार्थिक उन्नति साधणें हें मनुष्याचें ध्येय असून प्रपंच हें त्याचें साधन आहे. अर्थात हें ध्येय पूर्णतेनें साधण्यासाठीं प्रपंचाचीच जर अवश्यकता आहे, तर तो सोडून तें कसें साधतां येईल ? प्रपंचांत उत्पन्न होणारीं संकटें मनुष्यानें शांत आणि तेजस्वी वृत्ति ठेवून सहन केलीं तरच प्रपंचांत राहून त्याला खऱ्या सुखाचा अनुभव घेतां येईल. संकटामुळें संसाराला फांटा दिला तर मानसिक शक्ति दुबळी होऊन मनुष्याचेठायीं एकदेशीयपणा येईल व अंतीम ध्येय साधतां येणें त्याला अशक्य होईल. ह्मणून परमार्थ साधनाच्या आड येणाऱ्या ज्या गोष्टी असतील त्या नाहींशा करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल उपदेश करणें हेंच युक्त होईल. पण त्याकडे दुर्लक्ष करून कीर्तनांत भलत्याच गोष्टींचा उपदेश करण्यांत येत असतो.

कनक आणि कांता यांवर तर कीर्तनांत सारखी झोड उठविण्यांत येत असते व त्यांपासून अलिप्त राहण्याचा श्रोत्यांना उपदेश करण्यांत येत असतो.

वस्तुतः संसारांत त्यांची सर्वांच्या आधी जरूर असते. त्यांच्या अभावीं सर्व व्यवहार असाध्य होईल. इतकेंच नव्हेतर सर्व संसारच नष्ट होणार आहे, बरें स्वतां उपदेशक तरी त्यांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात काय? दूर तर नाहींच; पण उलट ते संसार थाटून त्यांत त्यांचे दास बनलेले असतात. अशी वस्तुस्थिति असतां "भाङगार कांता द्रव्य कातराया । केल्या विधानें नर कातराया " असें प्रतिपादन करणें हा कृतघ्नपणा नव्हे काय? द्रव्याचे तर हे हरिदास इतके लोभी असतात कीं

गांठि बांधोनि धन । मिरवितो भक्ति ।
मनीं ते आसक्ति । अधिक व्हावें ॥—श्री एकनाथ.

द्रव्य अधिक कसें मिळेल हा एकच प्रश्न बहुतेक हरिदासांच्या मनांत घोळत असतो व त्याकरितां वणिग्वृत्ति स्वीकारून ते गांवोगांवीं सारखे, हिंडत असतात.

हरिभक्तपरायण करिं धननिंदा गात गात वाजवित ।
परि उपवस्त्रा त्यांच्या पाहुनि ध्या काठ रूंद वीतवित ॥
धन निंदा मुखिं भरली परि आचारें स्तुतीच जन करिती ।
बोलावें एक असो कृति दुसरी हीच दांभिका रीती ॥—अनामिक.

वरीलप्रमाणें दामाजीची ओढ असणारे कीर्तनकार रामापासुन दूर राहातात हें सांगणें नलगे. मग जनतेला ईश्वरप्राप्तीचा राजमार्ग ते काय दाखविणार?

आशाबद्ध वक्ता । धाक श्रोतयाच्या चित्ता ॥
वायां गेलें तें भजन । उभयतां लोभी मन ॥

\+ \+ \+

तुका ह्मणे चित्तीं राहे अभिलाष । दोघां नरकवास सारिखाची ॥

द्रव्याच्या दुराशेनें गुलाम बनलेल्या उपदेशकांचा श्रोत्यांच्या मनावर तरी काय परिणाम होणार ? ' स्वयें आपणचि रिता । रडे पुढिलांच्या हिता ' ह्मणून कीर्तन असें असावें की त्या योगें स्वतां तरून श्रोत्यांचाहि उद्धार झाला पाहिजे.

भावें करितां कीर्तन । तरे तारी आणिक जन ॥

तुकोबांचें कीर्तन असेंच असे. त्यांच्या कीर्तनांत प्रेमाचा व दयेचा व्यवहार कसा करावा याची शिकवण असून जीवाला आत्मप्राप्तीची जोड कशी करून घेतां येईल याचें सरळ वर्णन असे. कीर्तन प्रसंगीं ते परमेश्वराच्या प्रेमळ स्वरूपांत अगदीं तल्लीन होऊन जात असत.

सत्वाचें शरीर भावाचें कीर्तन । प्रेम जनार्दन उभा तेथें ॥
अहिंसा मृदंग अद्वैताची टाळी । प्रेमाची आरोळी हरि नामें ॥
सप्रेमाचा वीणा निःसंगाच्या तारा । आणिला दरारा पातकांसीं ॥
जगत्रय जीवन योगियांचा राणा । ध्यानीं मनीं आणा तुका ह्मणे ॥

## पुढची स्थिती.

अवघ्या दशा येणें साधती । मुख्य उपासना सगुण भक्ति ।
प्रगटे हृदयींची मूर्ति । भाव शुद्धि जाणोनियां ॥

बहुतेक मनुष्यांची स्थिति पाहिली तर ते देवाची पूजा अर्चा जन्मल्या-पासून मरेपर्यंत करीत असतात. पण तेणेंकरून त्यांच्या बुद्धींत पालट होऊन अंतःकरणाची शुद्धि झाल्याचें दिसून येत नाहीं, हें आश्चर्यजनक नव्हे काय ? मनुष्यानें काळाचे पांढरें होईपर्यंत सर्व आयुष्य देवपूजेंत घालवूनहि त्याला आपल्या जीविताचें सार्थक करतां आलें नाहीं, तर त्यासारखी हास्या-स्पद व लाजीरवाणी दुसरी गोष्ट कोणती ? असें होण्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे वाडवडील पूर्वींपासून ज्या गोष्टी करीत आले, त्या मुलानें तशाच अंधश्रद्धेनें करीत राहाणें, हेंच होय. व याचमुळें हल्लीं सामान्य जनांत देवाच्या पूजेअर्चेबद्दल योग्य आदर न राहून बाह्य कवायतीपलिकडे कांहीं कर्तव्य नाहीं, असा त्यांचा चुकीचा समज झाला आहे. बाह्य अवडंबर झालें म्हणजे धर्मविषयक सर्व कर्तव्य संपलें असा समज होणें इष्ट नाहीं. अशा समजुतीनें मनुष्याच्या मनावर उत्तम संस्कार न होतां उलट त्याचा अहंकार मात्र वाढत जातो.

देवाची पूजा अर्चा करणें म्हणजे देवावर दृढ विश्वास ठेवून आवडीनें त्याचें स्मरण करणें, गुण कीर्तन करणें इ० होय. ईश्वर सर्वव्यापी आहे, सर्व साक्षी आहे, सर्व शक्तिमान आहे, दयाळु आहे, प्रेम परोपकार सत्य-निष्ठा इ० सर्व सद्गुण ईश्वरांत आहेत, अशी अंतःकरणांत जाणीव ठेवून ईश्वराचें पूजन केलें पाहिजे. व हें करीत असतां साधकानें आपलें अंतः-करण मोकळें करून देवाचे शुभदायक किरण त्यावर पडतील असा यत्न

केला पाहिजे. अर्थात देवाच्या ठायी असलेले गुण स्वतांच्या अंगी आणण्याचा त्यानीं प्रयत्न केला पाहिजे. देवाला प्रिय असाच स्वतांचा वर्तनक्रम ठेवला पाहिजे. दुराचरणांचा व दुर्वृत्तींचा त्याग करून सदाचरणांचा व सद्वृत्तींचा स्वीकार केला पाहिजे. आपलें सुख दुःख देवाला निवेदन करून ज्ञानाचा व संतोषाचा प्रसाद त्याजपाशी प्रेमानें मागितला पाहिजे. व अशा कारणानें उत्तरोत्तर स्वतांचे अवगुण पालटून वृत्ति शुद्ध आणि उदात्त होत आहे की नाही, अंतःकरणांत सात्विक प्रेमाचा उद्भव होत आहे की नाहीं, हें पाहिलें पाहिजे.

प्रत्यहं प्रत्यवेक्षेत नरश्चरितमात्मनः ।

किं नु मे पशुभिस्तुल्यं किं नु सत्पुरुषैरिति ॥—सुभाषित.

यांत म्हटल्याप्रमाणें मनुष्यानें प्रति दिवशीं आपल्या वर्तनाचें निरीक्षण करून तें पशुप्रमाणें होत आहे किंवा सत्पुरुषाप्रमाणें होत आहे हें पाहिलें पाहिजे. आपलें हित अथवा अहित करून घेणें हें मनुष्याच्या हातीं आहे. स्वार्थ साधण्याच्या नादांत विवेक बुद्धीला सोडून कर्म घडत असल्यामुळें मनुष्याला सुखाऐवजी दुःखच प्राप्त होतें. तो जर आपल्या बुद्धीचा सदुपयोग करील व सुखाप्रमाणें सद्गुण संपादण्याकरितां प्रयत्न करील तर त्याचें पुष्कळ कल्याण होईल.

जन्मा आलियाचें फळ । कांहीं करावें सफळ ।

ऐसें न करितां निष्फळ । भूमिभार होय ॥ समर्थ ॥

हळहळ कां होईना पण मनुष्यानें आयुष्यांत आपला उत्कर्ष करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्ञानरूपी तेजानें अज्ञानरूपी अंधःकाराचा नाश केला असतां अंतःकरणांत ईश्वरी तेज चमकूं लागतें.

मनुष्यांतील मनुष्यत्व पूर्णपणें विकसित झाल्यावांचून त्याच्यांतील पर-

मेश्वरत्व विकास पावणें शक्य नाहीं. मनुष्यत्वाचा विकास होण्याला चित्ताची प्रथम शुद्धि झाली पाहिजे

काम क्रोध आड पडले पर्वत । राहिला अनंत पलीकडे ॥

चित्तशुद्धीवर तुकोबांचा फार कटाक्ष आहे. चित्तशुद्धीची अनुकुलता असल्याशिवाय विश्वांतील कोणतेंहि कार्य हितावह होत नाहीं. शारीरिक व मानसिक सर्व कर्मांचें व अनुभवांचें उगमस्थान जें अंतःकरण त्याची शुद्धि झाल्यावर मनुष्याच्या सर्व कर्मांवर शुभ परिणाम होऊं लागतात व अंतरात्मा प्रसन्न होतो. आत्मा प्रसन्न झाल्यावर सर्व जग प्रसन्न होतें.

आतां हें कार्य एकदम होणें अशक्य असलें तरी हळुहळु दृढ प्रयत्नानें तें साध्य होण्यासारखें आहे. ईश्वर सर्वत्र भरलेला असला तरी त्याचे सर्व गुण मनुष्यांत जसे एकत्रित झालेले असतात, तसें ते इतर प्राण्यांत नसतात. पण परमेश्वरांत ज्याप्रमाणें ते पूर्णत्वानें असतात त्याप्रमाणें पूर्णत्वानें मात्र ते मनुष्यांत नसतात, प्रयत्नानें मनुष्याला ते साध्य करून घेतां येतात. सचेतन कोटींत क्षुद्र जीवापासून तों मनुष्यापर्यंत जे अनेक प्राणी आहेत, त्यांत मनुष्य प्राणी श्रेष्ठ ठरविला आहे, तो याचसाठी. ‘ ब्रम्हैवसन् ब्रम्हाप्येति ’ मनुष्य हा ब्रह्मस्वरूप आहे. ह्मणून त्यानें ‘या लोकीं व या देहांतच जीवितयात्रा संपविण्यापूर्वी ब्रह्मप्राप्ति करून घेतां येणें शक्य आहे ’ असा आत्मविश्वास ठेवून या मार्गास लागलें पाहिजे. हा मार्ग खडतर असला तरी तो प्रयत्नसाध्य आहे. मात्र त्याचें आक्रमण करण्यास माणसाप शी शारीरिक व मानसिक बळ भरपूर असलें पाहिजे. हें बळ साध्य करून घेणें मनुष्याच्या आटोक्यांतील असल्यामुळें तुकोबांनी नरदेहाची मोठी महति गाइली आहे.

लाभ झाला बहुतां दिसीं । लाहो करा पुढें नासी ।
मनुष्य देहा ऐसी । उत्तम जोड जोडिली ॥

\+ + ×

मोलाचें आयुष्य वेचुनियां जाय । पूर्व पुण्यें होय लाभ याचा ॥
अनंत जन्मींचे शेवट पाहतां । नर देह हातां आला तुझ्या ॥

आपले शास्त्रकार म्हणतात त्याप्रमाणें अनेक योनीत जन्म घेतल्या-नंतर जीवाला ही मनुष्य योनी प्राप्त झाली आहे. ही सर्वांत श्रेष्ठ योनी आहे. हें श्रेष्ठत्व तिला तिच्या ठिकाणी वसत असलेल्या सदसद्विवेक बुद्धीमुळें प्राप्त झालेलें आहे. अर्थात् जीवाला हें एक मोठें घबाडच सांपडलें आहे.

धन्य धन्य हा नर देहो । यांतील अपूर्वता पहा हो ।
जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीतें ॥

इतर देहांत जन्माचें सार्थक करून घेतां येणें शक्य नसतें; तें या नरदे-हांतच साधतां येतें, हें ध्यानांत ठेवून मनुष्यानें आपल्या शरीराचा योग्य उपयोग करून घेतला तर त्याला या जन्मांतच आपल्या आयुष्याचें सार्थक करतां येणार आहे.

शरीर उत्तम चांगलें । शरीर सुखाचें घोसुलें ।
शरीरें साध्य होय केलें । शरीरें साधलें परब्रह्म ॥

आपणच आपल्या नशीबाचे कारागीर आहों. अर्थात् आपल्या जीवि-ताचें सार्थक करणें हें पूर्णपणें आपणावरच अवलंबून आहे. प्रथम शक्य तेवढा इंद्रियनिग्रह करण्यास सुरवात केली लागे पुढे अधिकाधिक इंद्रिय-निग्रह करण्याचे सामर्थ्य प्राप्त होत जातें व अशा प्रकारें एकेक पायरी वर चढून जाण्याचा मनुष्यानें नेटानें प्रयत्न केला, तरच आंतील भाव भरीव होत जाऊन त्याची बुद्धि अधिक सात्विक व शुद्ध होत जाते; व अंतःकरण मोठें प्रेमळ व निर्मळ होऊन परमेश्वरी गुणांचा त्याला अधिक विकास करतां येतो.

सकळ चिंतामणी शरीर । जरी जाय अहंकार ॥

तुकोबांचा वर्तनक्रम अशाच प्रकारचा होता. ते मोठे प्रयत्नवादी होते. त्यांनी देवाची मोठ्या आस्थेनें भक्ति केली. उंच पर्वताचीं शिखरें एकदम दिसत नसतात, तर एक चढून गेल्यावर दुसरें दिसूं लागतें. तद्वत तुकोबांनी सत्प्रयत्नांच्या जोरावर मानसिक शुद्धतेची व धैर्याची अनुकुलता मिळवून क्रिमे-पणानें उन्नतीच्या वाटेनें एक एक पायरी चढत चढत अंतीम ध्येय गांठलें.

कैशी दिसों बरी । आम्ही आळवितां हरी ॥
नाहीं सोंग अळंकार । दास झाला संसार ॥
दुःख आम्हां नाहीं चिंता । हरीचे दास म्हणवितां ॥
तुका म्हणे देवा । ऐशी झालों करितां सेवा ॥

परमेश्वराचा दास होऊन त्याला अनन्य भावें आळविलें असतां कोण-त्याहि प्रकारचें दुःख भोगण्याचा व चिंता करण्याचा प्रसंगच येत नाहीं. तुकोबा म्हणतात " अशी देवाची सेवा केल्यानेंच संसार आमचा दास झाला व आम्ही अशा स्थितीप्रत पोंचलों. "

भागवत धर्मांत विष्णूचीच भक्ति श्रेष्ठ मानिली आहे. त्याला अनुस-रून तुकोबांनी पंढरीचा विठोबा हें त्यांचें कुळ दैवत असल्यामुळें तोच एक देव असा दृढ विश्वास ठेवून पांडुरंगाची एकनिष्ठपणें सेवा केली.

चौदा भुवनें जयाचिये पोटीं । तोचि आम्ही कंठीं साठविला ॥

\+ + +

निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म । निर्धार हें वर्म चुको नये ॥
निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास । पाहों नये आस आणिकांची ॥
तुका म्हणे ऐसा कोण उपेक्षिला । नाहीं आयकिला ऐसा कोणी ॥

देवाच्या ठिकाणीं निष्काम व अचळ विश्वास ठेवून त्याची अनन्यभावें भक्ति करणें हाच भक्ताचा स्वधर्म आहे.

चारी वेद जया साठीं । त्याचें नाम धरा कंठीं ॥
न करीं आणिक साधन । कष्टसी कां वायाविण ॥
अठरा पुराणांचे पोटीं । नामाविण नाहीं गोठी ॥
गीता जेणें उपदेशिली । तो ही विटेवरी माउली ॥
तुका म्हणे सार धरी । वाचे हरी नाम उच्चारी ॥

पतिव्रता स्त्री जशी आपल्या पतीशीं काया वाचा मनें करून एकनिष्ठ असते तद्वत भक्तानें आपल्या उपास्य देवतेपाशीं एकनिष्ठ असलें पाहिजे.

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हां नारायण तैशा परी ॥
पतिव्रता नेणें आणिकाची स्तुती । सर्वभावें पति ध्यानीं मनीं ॥
तुका म्हणे एकविध झालें मन । विठ्ठला वांचून नेणें दुजे ॥

यालाच अव्यभिचारी भक्ति म्हणतात. तुकोबांची भक्ति अशाच प्रकारची होती.

माझें अवधान । पंढरपुरीचें निधान ॥
तया एकविण दुजे । कांहीं नेणें पंढरिराजे ॥
दास विठ्ठलाचा । अंकित अंकिला ठायींचा ॥
तुका म्हणे आतां । नव्हे पालट सर्वथा ॥

पंढरीचा विठोबा हेंच एक तुकोबांचें दैवत ठरलें. त्यावांचून अन्य दैवत ते जाणत नव्हते.

आनंद अद्वय नित्य निरामय । जें कां नित्य ध्येय योगियांचें ॥
तें हें समचरण साजिरें विटेवरी । पहा भीमातीरीं विठ्ठल रूप ॥
पुराणासी वाढ श्रुति नेणती पार । तें झालें साकार पुंडलिका ॥
तुका म्हणे ज्यातें सनकादिक ध्यात । तें आमचें कुळदैवत पांडुरंग ॥

जीवाला सुख देण्याला तोच एक देव समर्थ आहे. तो सर्व व्यापी अनादि, अनंत आहे. त्याहून श्रेष्ठ या जगांत कांहीं नाहीं, असा तुकोबांचा दृढविश्वास होता.

आपला तो एक देव करूनि घ्यावा । तेणेंविण जिवा सुख नोहे ॥
येर तीं माइकें दुःखाचीं जनितीं । नाहीं आदि अंतीं अवसान ॥
अविनाश करी आपुलीया ऐसें । लावी मना पिसें गोविंदाचें ॥

इतर सर्व दैवतें मायिक व दुःख देणारीं असल्यामुळें एका गोविंदालाच नित्य आठवावें हें उत्तम.

एक दृढ करी पंढरी राव । मग तुज उपाव पुढती सुचे ॥

एका पांडुरंगाच्या ठिकाणीं दृढभाव ठेवून त्याची अनन्य भावें उपासना केली असतां पुढील सर्व मार्ग आपोआप सुचूं लागतो.

तुका म्हणे घेईं विठ्ठलाचा छंद । आनंदाचा कंद विस्तारेल ॥

याप्रमाणें तुकोबा प्रथम सगुण मूर्तीचें भजन पूजन मोठ्या आस्थेनें करीत असत ते विठ्ठलाचे एक निष्ठ भक्त होते किंबहुना ते एकेश्वरी पंथाचे पुरस्कर्ते होते, असें म्हटलें तरी चालेल. त्यांच्या शुद्ध आचरणानें व एकनिष्ठ भक्तीच्या योगानें त्यांच्या अंतःकरणाची जशी शुद्धि होत गेली तसा त्यांचा अधिकारहि वाढूं लागला व त्यांच्या विचारांत पालट होऊं लागला. त्यांना यावेळीं बाह्य पूजेपेक्षां मानस पूजा अधिक श्रेष्ठ वाटूं लागली.

सगुण मूर्तीची पुजा मनोभावें होऊं लागली व त्या मूर्तीचें ध्यान मनांत चांगलें बिंबलें म्हणजे मानस पूजेचा अधिकार येतो. तुकोबांची अशीच स्थिति झाली. ते चित्तांतच विठोबास आठवूं लागले.

करावी तें पूजा मनेंचि उत्तम । लौकिकाचें काम काय असे ॥

बहिर्मुख असलेली इंद्रियें अंतर्मुख करून चित्तांतच देवाला आठविणें, हेंच देवाचें खरें पूजन होय. "अंतरीचें ध्यान। मुख्य या नांवें पूजन" देवावर पूज्यबुद्धि प्रीति व अनन्य भाव ठेवून त्याचें मनानें पूजन करणें, ध्यान करणें व त्याला प्रिय अशीं कृत्यें करणें हेच भगवंताचें खरें पूजन होय.

येर वाग्जाळ मायेचा अहंकार । वचनासि थार अज्ञान ॥

सकळहि सुखें बोळलीं अंतरीं । मग त्या बाहेरी काय काज ॥

बाहेरचा देखावा हा सर्व लौकिक आहे. त्याचे भरीस न पडतां भगवंताला अंतरींच आठवावा.

मनोमय पूजा । हेचि पढिये केशी राजा ॥

घेतो कल्पनेचे भोग । न मानिती बाह्य रंग ॥

अंतरीचे जाणे । आदि वर्तमान खुणें ॥

तुका म्हणे कुडें । कोठें सरे त्याच्या पुढें ॥

देवाला मानसिक पूजाच फार प्रिय असते. तो अंतःकरणांतील शुद्ध कल्पनांचाच भोग घेत असतो. त्याला गंध, पुष्प, धूप, दीप इ. बाह्योपचारांची व थाटमाटांची मुळींच जरूर नसते. तो सर्व कांहीं भूतवर्तमान जाणत असल्यामुळें त्याला कुडा म्हणजे खोटा भाव मुळींच खपत नाहीं.

तुकोबांच्या वेळीं भक्तिमार्ग चालू होता. पण तो पाहून त्यांना खेद वाटत होता. नानापंथ, नानामतें त्यांच्या काळांत प्रचारांत होतीं. नाना देवांच्या प्रतिमा लोक पूजीत होते. पण ज्याची प्रतिमा तो परमात्मा मात्र ओळखला जात नव्हता. तुकोबांना इतर देवता द्वेष्य नव्हत्या सर्व देवता एकाच परमात्म्याची स्वरूपें आहेत, असेंच ते मानीत. पण हें तत्व न

ओळखतां ढोंगी, पोटभरू लोक दुरभिमानाला बळी पडून अनेक देवतांचें पोकळ देव्हारें माजविण्यास प्रवृत्त होत असत व नाना मतांची उभारणी करून लोकांना फसवित असत त्यांवर तुकोबांचा विशेष कटाक्ष होता. देवाला ओळखून त्याचें भजन पूजन करावें, हे तुकोबांचें भक्तिमार्गातलें तत्व असल्यामुळें त्यांना हें बाह्य अवडंबर खपत नव्हतें. त्यांनी अशा लोकांना शाश्वत सुख कशानें मिळेल या बद्दल बराच बोध केला आहे.

## समाजस्थिति.

तुकोबांचा काळ व सांप्रतचा काळ यांत बरेंच साम्य आहे असें तुकोबांनी त्यावेळच्या समाजस्थितीसंबंधी केलेल्या अनेकविध वर्णनावरून ह्मणण्यास हरकत नाही. फाजील धर्मभोळेपणा, रूढीचें प्राबल्य इ० गोष्टी जशा हल्लीं दिसत आहेत, तशाच त्या तुकोबांच्यावेळी होत्या असेंच त्यावरून दिसतें. त्याकाळी धर्माच्या बाबतींत चुथडा होऊन जनतेंत अनेक सामाजिक दोष व दुराचार बोकाळले होते. माया ब्रह्माचा काथ्याकूट करून पिंडपोषण करणाऱ्या ढोंगी लोकांचें प्रस्थ बरेंच माजलें होतें. जगाचें मिथ्यात्व आचरणांत नसलें तरी " सर्व जग दुःखमय आहे " असा उपदेश होऊं लागल्यामुळें प्रज्ञा, पौरुष, तेज इ० गुण अंगीं आणण्याचें प्रवृत्तिमार्गीय ध्येय जनतेंतून नष्ट होत चाललें होतें. अंधश्रद्धेला ऊत आला होता. परंपरागत अनाचार वाढला होता, मूर्तिपूजेचा अतिरेक होऊन तप, तीर्थाटन, नवस, व्रतें, वैकल्यें इ० चें. खूळ माजलें होतें. सारांश सामाजिक व धार्मिक बाबतींत हिंदुसमाजामध्यें बरीच बजबजपुरी माजली होती; अर्थात् त्यापासून होणारे दुष्ट-परिणाम तुकोबांना पाहावत नव्हते.

तीर्थयात्रादि रूढ चालीरीतीसंबंधी तुकोबांच्या मनांत तिटकारा उत्पन्न होऊन त्यांवर त्यांनी सणसणीत शाब्दिक कोरडे उडविले आहेत. बाह्यात्काराचे हे व्यापार असून लोक त्यांसच धर्म समजतात व खरें तत्व विसरतात, याबद्दल त्यांनी आश्चर्य प्रकट केलें आहे.

आली सिंहस्थ पर्वणी । न्हाव्या भटां झाली धणी ॥

अंतरी पापाच्या कोडी । वरी वरी बोडी डोई दाढी ॥

बोडिलें तें निघालें । काय पालटलें सांग पहिलें ॥

पाप गेल्याची काय खूण । नाहीं पालटले अवगुण ॥
भक्ति भावें विण । तुका ह्मणे अवघा सीण ॥

काम क्रोधादि खळांना जसेच्या तसेच अंतर्यामी ठेवून बाहेरून दाढी-डोक्याचें मुंडन केलें, तपतीर्थाटनाचा खटाटोप केला, तिळातांदुळाचें हवन केलें, द्रव्यादि दान दिलें तरी त्यापासून काय होणार आहे ?

तुका ह्मणे चुकलें वर्म । केला अवघाचि अधर्म ॥

तसेंच शेंदूर थापून केलेली दैवतें भूतें खेतें इ० वरहि तुकोबांनी कडक टीका केली आहे. आपल्या भक्तांचें कल्याण करून त्यांना या भवसागरांतून तरून नेण्याऐवजी उलट अशा दैवतांनी भक्तांजवळ शिताचें अवदान मागावें हें निंद्य होय.

आपुल्या इच्छें आणिकां पीडी । काय तें देईल बराडी ॥

जीवंत जिवांचा बळी घेणारी ही दैवतें लोकांचें काय कल्याण करणार ? नाना वासनांना बळी पडून विषयासक्त झालेले लोक युक्त अथवा अयुक्त काय याचा विचार न करितां धर्माच्या नांवाखालीं शरणांगतीचें ढोंग करून व भाविक जनांस नादीं लावून फसवित असलेले पाहून तुकोबा ह्मणतात—

दगडाची नाव आधींच तें जड । तें काय दगड तारूं जाणें ॥
तुका ह्मणे वेष विटंबिला त्यांनीं । सोंग संपादणी करिती परी ॥

अशा पोटभरू साधूंवर कडक हत्यार उपसून त्यांच्या जाळ्यांत सामान्य जनांनी सांपडूं नये म्हणून तुकोबांनी खळखळून बाहविलेले विचार अत्यंत कल्याणप्रद आहेत.

नाहीं संत चिन्ह उमटलें अंगीं । उपदेशा लागी पात्र झाला ।
पोहों नेणें कासे लाविते आणिका । ह्मणावें त्या मूर्खा काय आतां ॥

\+ + +

आशा पाशीं बांधोनि चित्त । ह्मणती जालों आह्मी मुक्त ॥
त्यांचे लागले संगती । जाली त्यांची तेचि गती ॥

× × ×

डोई वाढवूनि केश । भूतें आणिनी अंगास ॥
मेळवूनि नरनारी । शकुन सांगती नानापरी ॥
तुका ह्मणे मैंद । नाहीं त्यापासीं गोविंद ॥

भोंदू, गोसावी, दंडधारी, जटाधारी, मुद्राधारी, योगी, तपस्वी, संन्यासी, पंचाक्षरी, लोभी, पुराणिक, पंडित, हरिदास, इ० सर्व प्रकारच्या लोकांवर त्यांच्या दांभिकपणाबद्दल कोरडे ओढून तुकोबांनी त्यांचा कडक शब्दांनी निषेध केला आहे.

सोंगे छंदे कांहीं । देव जोडे ऐसें नाहीं ॥
शुद्ध भावाविण । जो जो केला तो ता सीण ॥
तुका ह्मणे कळे । परी होताती आंधळे ॥

\+ + +

परद्रव्य परनारी । अभिलाषूनि नाक धरी ॥
जळो तयाचा आचार । व्यर्थ भार वाहे खर ॥
सोंवळ्याची स्फिती । क्रोधें विटाळला चित्ती ॥
तुका ह्मणे सोंग । दावी बाहेरील अंग ॥

\+ + ÷

होऊनी संन्यासी भगवीं लुगडीं । वासना न सोडी विषयाची ॥
निंदिती कदान्न इच्छिती देवान्न । पाहताती मान आदराचा ॥
तुका ह्मणे ऐसें दांभिक भजन । तया जनार्दन भेटे केवीं ॥

\+ + +

अल्प असें ज्ञान । अंगीं ताठा अभिमान ॥
तुका ह्मणे लंड । त्याचें हाणोनि फोडा तोंड ॥

\+ + ×

मुद्रा लाविती कोरोनी । मान व्हावयासी जनीं ॥
तुका ह्मणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥

हे उतारे आणखी वाढवितां येतील. यासारखेंच यासंबंधी आणखी किती तरी तुकोबांचे अभंग आहेत, ते विस्तारभयास्तव येथें देतां येणें शक्य नाही. तुकोबांचे समकालीन वामन पंडित, मुक्तेश्वर व समर्थ रामदास स्वामी यांनी सुद्धां अशा दुराचारांचा व धर्म भोळ्या रूढीचा खरपूस समाचार घेतला आहे. त्यावरून त्या काळीं सामाजिक स्थिति कशी होती व धर्माच्या नांवावर किती दुराचार होत होते, हें ध्यानांत येणार आहे. या दुराचारांना आपल्या उपदेशांनी आळा घालण्याचा तुकोबांनीं बराच प्रयत्न केला. परमार्थपर उपदेशाप्रमाणें ऐहिक कल्याणाचाहि ते उपदेश करीत असत. त्यामुळें लोकांत भक्ति, सद्भाव, सदाचार प्रवृत्ति इ० चा उद्भव होऊन जनतेवर त्याचा चांगला परिणाम होत असे.

गांवकऱ्यांत एकी नसेल तर भल्यामाणसानें तेथें एक क्षणहि राहूं नये, असें तुकोबांनी एकेठिकाणीं ह्मटलें आहे—

न मिळती एका एक । जये नगरीचे लोक ।
भली तेथें राहूं नये । क्षणें होईल न कळे काय ।
न करितां अन्याय । बळें करिती अपाय ॥

÷ + ÷

तुका ह्मणे दरी । सुखें सेवावी ते बरी ॥

"गांवकरी लोकांत ऐक्य नसलें तर कोणत्यावेळीं कसा अनर्थ गुदरेल याचा भरंवसा नाहीं. तुकोबांच्या या म्हणण्याचा व्यापक अर्थानें विचार केला तर तुकोबा राजकारणहि जाणत होतें असें ह्मणतां येईल.

तुकोबांचें आचरण 'बोले तैसा चाले' याप्रमाणें असून त्यांची नीतिमत्ता उच्च दर्जाची होती. तसेंच त्यांचें व्यवहारज्ञानहि अति श्रेष्ठ होतें. वाटेल तें झालें तरी त्यांनीं आपल्या मनाची शांति ढळूं दिली नाहीं. कट्टर कर्मठांच्या शाठ्याला त्यांनीं क्षमाशस्त्रानें वठणीवर आणलें.

क्षमाशस्त्र जया नराचिये हातीं । दुष्ट तयाप्रती काय करी ॥
तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोनी आपसया ॥
तुका ह्मणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडित सुखरूप ॥

एके वेळीं एक सुंदर तरुण स्त्री एकांत पाहून वैषयिक सुखाच्या इच्छेनें तुकोबाकडे आली व त्यांची विनवणी करूं लागली. तेव्हां तुकोबांनीं तिला मातेसमान मानून हात जोडले व सांगितलें कीं—

पराविया नारी रखुमाई समान । हें गेलें नेमून ठायींचेंची ॥
जाईं वो तूं माते न करी सायास । आह्मी विष्णूदास न हो तैसे ॥
न साहवें मज तुझें हें पतन । नको हें वचन दुष्ट वदों ॥
तुका ह्मणें तुज पाहिजे भ्रतार । तरी कां इतर लोक थोडे ॥

तसेंच एकदां गांवांतील कांहीं अहमन्य शिष्टांनीं तुकोबांना बोलावून "तूं शूद्र असल्यामुळें तुला काव्य करण्याचा व श्रुति विषयाचें प्रतिपादन करून लोकांना उपदेश करण्याचा मुळींच अधिकार नाहीं, ह्मणून इतःपर तूं तसे करूं नको" असें त्यांस बजावून सांगितलें व तुकोबांचा बराच छळहि

केला. त्यांत रामेश्वर भट हे प्रमुख होते. त्या प्रसंगाचे तुकोबांचे कांहीं अभंग आहेत.

निषेधाचा कांहीं पडला आघात । तेणें मध्यें चित्त दुःखविलें ॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ॥

दुर्जनांनीं योजिलेल्या निंदापर गुत्क्यांनीं सत्पुरुषांचें ठिकाणीं केव्हांच क्षोभ उत्पन्न होत नाहीं. नानामतें व पाखडें उत्पन्न करून तुकोबांना त्रास देण्याचा पुष्कळांनीं उपक्रम केला. पण तुकोबांनीं त्यांचीं तोंडें आपल्या क्षमाशील आचरणाने व हरिभजनाचा गजर करून ठेंचून टाकलीं. दुष्टांशीं दुष्टपणें न वागता साधुपणानें वागूनच त्यांशीं त्यांच्या मनांत सुष्टपणा उत्पन्न केला पण दुष्टांशीं प्रेमानें वागून त्यांचा दुष्टपणा नेहमीं जातोच असें नाहीं. अशावेळीं जनतेच्या कल्याणासाठीं त्यांचा प्रतिकार करणें इष्ट असतें.

मऊ मेणाहून आह्मी विष्णु दास । कठीण वज्रास भेदूं ऐसे ॥
मेले जित असों निजोनियां जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं॥
भलें तरी देऊं गांडीची लंगोटी । नाठयाळाच्या काठी देऊं माथां ॥
मायबापाहूनी बहु मायवंत । करूं घातपात शत्रूहूनी ॥

---

१ तुकोबांनीं रामेश्वर भटाच्या सांगण्यावरून कवित्व न करण्याचें कबूल केलें व तों काळपर्यंत केलेल्या अभंगाच्या सर्व वह्या इंद्रायणीच्या डोहांत बुडविल्या त्याबद्दल खेद उत्पन्न होऊन तुकोबा १३ दिवस एका दगडावर पडून राहिले. पण दगडावर पडतांना त्यांनीं १९ अभंग केल्याचें प्रसिद्ध आहे ही विसंगति दिसते.

अमृत तें काय गोड आह्मां पुढें । विष तें बापुडें कडू किती ॥
तुका ह्मणे आह्मी अवघेंचि गोड । ज्यांचें पुरे कोड त्याचे परी ॥

वरील अभंगात तुकोबा ह्मणतात 'आह्मी विष्णुदास मेणाहून मऊ असलों तरी प्रसंगी वज्राहूनहि कठीण होतो. याचें कारण परिस्थिति हेंच होय. जग हें अनेकरूप असल्यामुळें त्यांतील परिस्थितिप्रमाणें सत्पुरुष वागत असतात. ते क्षमाशील व दयाशील असतात, पण जगाच्या व्यवहारांत कांहीं ठिकाणीं त्यांना वज्रापेक्षां कठोर असें वर्तन करावें लागतें. तुकोबानांहि दुष्ट व ढोंगी लोकांचा गर्व हरण करण्याच्या कामी कांहीं प्रसंगी असें वर्तन करावें लागलें व त्यावेळीं त्यांनीं शब्दांचे प्रहारहि केले आहेत.

सामाजिक, धार्मिक वगैरे बाबतींत जातिभेदाचें पर्यवसान दुराग्रहांत व जातिद्वेषांत होऊन समाजाची होत असलेली चिरफाड पाहून तुकोबांनीं त्यासंबंधीहि लोकांत जागृति करण्याचा बराच प्रयत्न केला. यासंबंधी त्यांचें अनेक अभंग आहेत. त्यांत सामान्य नीतीतत्वें गोविलीं असून समाज सुधारणेसंबंधीं कळकळीचा उपदेश आहे. 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' ह्मणून ब्राह्मणांची योग्यता मोठी असल्याचें तुकोबांनीं कबूल केलें आहे पण केवळ वर्णावरभिस्त न ठेवतां त्या वर्णाला योग्य असें ज्ञान संपादून त्याप्रमाणें कर्माचरण होईल व अंगीं योग्यता येईल तरच ब्राह्मण श्रेष्ठ ठरून त्यांचें गुरुत्व कायम टिकणार आहे. गंगेचें उदक शुद्ध आहे पण तें गांवच्या ओहळांतून आलें तर त्याला तीर्थत्व येत नाहीं. तद्वत योग्यतेवांचून अधिकार नाहीं.

जातीचा ब्राह्मण । न करितां संध्यास्नान ॥
तो एक नांवाचा ब्राह्मण होय हीनाहूनी हीन ॥

मनुष्याची योग्यता त्याच्या गुणकर्मावरून ठरते. शास्त्रानें जीं कर्तव्यें विहित केलीं, आहेत त्यांचें रहस्य जाणून ती यथासांग आचरणें हेंच इष्ट होय. वर्ण शीलानें ठरतो. ब्राह्मणादि चार वर्ण जातिवाचक नसून ते गुणकर्मदर्शक आहेत. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागशः' गुण व कर्म यांच्या भेदांप्रमाणें हे चार वर्ण निर्माण केले आहेत, असें भगवंतानींच ह्मटलें आहे. अर्थात हीवर्णाश्रमधर्म व्यवस्था समाजस्वास्थ्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाची होती. पण त्या व्यवस्थेंत आणि हल्लींच्या जातिभेदांत पुष्कळ अंतर आहे. गुणकर्मानुसार असलेली पूर्वींची वर्णव्यवस्था हितावह व उपयुक्त होती; पण चाराच्या ऐवजी हल्लीं शेंकडों जाती व पोटजाती झाल्या आहेत व त्या आह्मीच अज्ञानानें निर्माण केल्या असल्यामुळें कलहोत्पादक व खऱ्या धर्माचा उच्छेद करणाऱ्या आहेत, असेंच ह्मणावें लागतें. जातिभेदाचें गोडवे गाणारांनीं 'जातिभेद ऐक्य विघातक नाहीं,' असें कितीहि कंठशोष करून सांगितलें तरीं त्यांचें तें ह्मणणें स्वार्थमूलक असल्यामुळें निर्माल्यवत आहे.

अंधश्रद्धेनें केवळ शास्त्रांची खोटी तरफदारी करणें या युगांत तरी व्यर्थ आहे. जी गोष्ट विवेक बुद्धीला पटत नाहीं, न्यायनीताला धरून नाहीं, ती शास्त्रांत आहे असें भासविण्याचा प्रयत्न करून समाजांत दुही माजविणें हें केव्हांहि इष्ट नाहीं. हिंदुधर्माच्या मूळ व शुद्ध हेतूंना ही गोष्ट पटण्यासारखी नसल्यामुळ तुकोबांनीं अशा दुराग्रही अहंमन्य व दांभिक उच्च वर्गीयांची फजिती करतांना आपल्या वाणींत बराच निखरपणा प्रकट केला आहे. ते ह्मणतात —

वर्ण अभिमानें कोण झाले पावन । ऐसें द्या सांगून मजपाशीं ॥

आजपर्यंत जगांत जे श्रेष्ठ पुरुष झाले ते आपापल्या गुणकर्मांनीच प्रसिद्धीस आले. व सर्वांनी—उच्च व नीच वर्णीयांनी आपापली मस्तकें त्यांपुढें वांकविलीं. ज्ञानदेव एकनाथ, नामदेव, नरहरी, रोहिदास, चोखामेळा, कबीर, तुकाराम, रामदास इ. साधुसंतांनीं सुद्धां ब्राह्मण, क्षत्रियादि सर्व वर्णांस आपल्या चरणीं लवविलें आहे. या संत मंडळींत जातीचा भेदभाव मुळींच नव्हता. ते जरी निरनिराळ्या देवांची भक्ति करीत होते, तरी सद्वस्तुला कोणतेंहि नांव ठेवलें तरी तिच्या स्वरूपांत बदल होत नाहीं, हें तत्व ते जाणत होते. व त्याप्रमाणें त्यांनीं ज्ञानभक्तीचा ओघ महाराष्ट्रांत वाहविला.

संतांनीं प्रतिपादलेला हा भगवद्भक्तीचा धर्म राष्ट्रीय असून त्यांत सर्वांची सोय होण्यासारखी आहे. " सकळांसीं येथें आहे अधिकार " भगवत्प्राप्ति करून घेण्याला सर्वांना सारखाच अधिकार आहे.

ब्राह्मण क्षेत्री वैश्य शूद्र । चांडाळाही अधिकार ॥
बाळे नारी नर । आदी करूनि वेश्याही ॥

मोक्षाचे दरवाजे सर्वांनाच उघडे आहेत. ते ब्राह्मणादि त्रैवर्णिकांसच खुले आहेत व इतरांस नाहींत, असें नाहीं. उपनिषदांतून गार्गी प्रभृती व पुराणांतून शकुंतला, दमयंती, सीता, रुक्मिणी, सुभद्रा इ० स्त्रिया ज्ञानी असल्याचे वर्णन आहे. पूर्वी स्त्रियांचें उपनयनहि होत असे " पुरा कल्पेतु नारीणां मौंजिबंधन मिष्यते " व विद्या संपादन केल्यानंतर त्यांचा विवाह होत असे. पंजाबातील हिंदु लोकांत अद्यापि ही चाल आहे व इकडील पारशी लोकांतहि ती चालू असल्याचें दिसतें. वनपर्वांत मांस विकणाऱ्या व्याधानें एका ब्राह्मणास व शांतिपर्वांत तुलाधार वाण्यानें जाजली नांवाच्या

तपस्व्यास मोक्ष मिळविण्याचें ज्ञान सांगितलें आहे. यावरून मनुष्याची योग्यता जातीवर अवलंबून नसून त्याच्या अंतःकरणाच्या शुद्धीवर अवलंबून असते, हेंच सिद्ध होतें.

उंच नीच कांहीं नेणे भगवंत । तिष्ठे भावभक्ति देखोनिया ॥

'समोऽहं सर्व भूतेषु न मे द्वेष्योस्ति न प्रिया' असें भगवंतानींहि गीतेंत म्हटलें आहे. परमेश्वर कोणाचें ऐश्वर्य पाहत नाहीं व शास्त्रज्ञान पाहत नाहीं. तो धंदा पाहत नाहीं व जाति पाहत नाहीं. लहान मोठे, श्रीमंत गरीब, विद्वान अविद्वान, स्त्री पुरुष, इ० भेदभाव देवाचे घरीं नसून त्याची उपासना करण्याचा अधिकार सर्वांना सारखाच आहे. धार्मिकपणानें वागण्याचा हक्क अमुकच जातीस दिला आहे व अमुक भाषेंतून प्रार्थना केली तरच ती देवास पोंचते, असें कोणत्याहि शास्त्रांत म्हटलेलें नाहीं. येथें भक्तीचें प्राधान्य आहे. जातीचें प्राधान्य नाहीं. हें तत्व जाणून तुकोबांनी 'यारे यारे लहान थोर । भलते याती नारी अथवा नर' स्त्रियांना, खालच्या जातींना व श्रेष्ठ ह्मणविणाऱ्या वेदवेत्त्यांनाहि, कोणत्याच प्रकारचा भेदभाव न ठेवतां भक्तिरहस्याचा लाभ व्हावा म्हणून एका पांडुरंगाची मनोभावें भक्ति करण्याचा उपदेश केला आहे.

यातायाती धर्म नाहीं विष्णु दासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥
तुका म्हणे तुम्ही विचारावे ग्रंथ । तारिले पतित नेणो किती ॥

भक्ति मार्गांत यातायाती धर्म भेद मुळींच नाहीं, अशी वेदशास्त्रादि ग्रंथ साक्ष देत आहेत.

जिहीं ह्मणविलें हरीचें अंकित । जातीचे होत कोणी तरी ॥
तुका म्हणे वर्ण धर्म । अवघें आहे समब्रह्म ॥

शंकराचार्यांनीं सुद्धां जीवोद्धार जातिभेदावर अवलंबून नाहीं असें प्रतिपादिलें आहे. अग्नीच्या संस्कारानें निरनिराळीं बिजें खाक होऊन जशीं एकाच स्वरूपाप्रत पोंचतात तद्वत अनेक वर्णांचे लोक असले तरी ते भगवद्भक्तिरूपी अग्नीच्या संस्काराने पावन होऊन एकाच योग्यतेचे होतात.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥
कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें ॥
तुका ह्मणे एका जीवाचे अवयव । सुखदुःख जीव भोग पावे ॥

जगांत सर्वत्र विष्णुच भरलेला असल्यामुळें त्यांत भेदभाव मानणें हें पाप होय. ईश्वर सर्वांच्या हृदयांत वास करीत आहे म्हणून कोणाहि जीवाचा मत्सर करणें, हें सर्वेश्वर पूजनाचें लक्षण नव्हे, एकाचेच सर्व अवयव असल्यामुळें सर्वांभूतीं भगवद्भाव ठेवून सर्वांवर दया करणें, प्रीति करणें सर्वांशीं न्यायानें व समतेनें वागणें हेंच इष्ट होय.

अवघें समब्रह्म पाहे । सर्वांभूतीं विठ्ठल आहे ॥

तुकोबांनीं असाच भाव ठेवून विठ्ठलाची उपासना केली. ते विठोबासच पूर्ण ब्रह्म समजत.

विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तहि पाताळे भरुनी ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनि मानसीं ॥

---

१ समबुद्धि झाली म्हणजे तारतम्यपणा सुटतो, असें नाहीं. जनावरांनीं खाण्याचा चारा मनुष्य खात नाहीं किंवा त्यांच्याप्रमाणें तो व्यवहारहि करीत नाहीं, पात्रापात्रतेचा सरासार विचार त्याचें ठायीं असतोच.

तपस्व्यास मोक्ष मिळविण्याचें ज्ञान सांगितलें आहे. यावरून मनुष्याची योग्यता जातीवर अवलंबून नसून त्याच्या अंतःकरणाच्या शुद्धीवर अवलंबून असते, हेंच सिद्ध होतें.

उंच नीच कांहीं नेणे भगवंत । तिष्ठे भावभक्ति देखोनिया ॥

'समोऽहं सर्व भूतेषु न मे द्वेष्योस्ति न प्रिय' असें भगवंतानींहि गीतेंत म्हटलें आहे. परमेश्वर कोणाचें ऐश्वर्य पाहत नाहीं व शास्त्रज्ञान पाहत नाहीं. तो धंदा पाहत नाहीं व जाति पाहत नाहीं. लहान मोठे, श्रीमंत गरीब, विद्वान अविद्वान, स्त्री पुरुष, इ० भेदभाव देवाचे घरीं नसून त्याची उपासना करण्याचा अधिकार सर्वांना सारखाच आहे. धार्मिकपणानें वागण्याचा हक्क अमुकच जातीस दिला आहे व अमुक भाषेंतून प्रार्थना केली तरच ती देवास पोंचते, असें कोणत्याहि शास्त्रांत म्हटलेलें नाहीं. येथें भक्ताचें प्राधान्य आहे. जातीचें प्राधान्य नाहीं. हें तत्व जाणून तुकोबांनी 'यारे यारे लहान थोर । भलते याती नारी अथवा नर' स्त्रियांना, खालच्या जातींना व श्रेष्ठ ह्मणविणाऱ्या वेदवेत्त्यांनाहि, कोणत्याच प्रकारचा भेदभाव न ठेवतां भक्तिरहस्याचा लाभ व्हावा म्हणून एका पांडुरंगाची मनोभावें भक्ति करण्याचा उपदेश केला आहे.

यातायाती धर्म नाहीं विष्णु दासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥
तुका म्हणे तुम्हीं विचारावे ग्रंथ । तारिले पतित नेणो किती ॥

भक्ति मार्गांत यातायाती धर्म भेद मुळींच नाहीं, अशी वेदशास्त्रादि ग्रंथ साक्ष देत आहेत.

जिहीं ह्मणविलें हरीचें अंकित । जातीचे होत कोणी तरी ॥
तुका म्हणे वर्ण धर्म । अवघें आहे समब्रह्म ॥

शंकराचार्यांनीं सुद्धां जीवोद्धार जातिभेदावर अवलंबून नाहीं असें प्रतिपादिलें आहे. अग्नीच्या संस्कारानें निरनिराळीं बिजें खाक होऊन जशीं एकाच स्वरूपाप्रत पोंचतात तद्वत अनेक वर्णांचे लोक असले तरी ते भगवद्भक्तिरूपी अग्नीच्या संस्कारानें पावन होऊन एकाच योग्यतेचे होतात.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥
कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें ॥
तुका ह्मणे एका जीवाचे अवयव । सुखदुःख जीव भोग पावे ॥

जगांत सर्वत्र विष्णुच भरलेला असल्यामुळें त्यांत भेदभाव मानणें हें पाप होय. ईश्वर सर्वांच्या हृदयांत वास करीत आहे म्हणून कोणाहि जीवाचा मत्सर करणें, हें सर्वेश्वर पूजनाचें लक्षण नव्हे, एकाचेच सर्व अवयव असल्यामुळें सर्वांभुतीं भगवद्भाव ठेवून सर्वांवर दया करणें, प्रीति करणें सर्वांशीं न्यायानें व समतेनें[1] वागणें हेंच इष्ट होय.

अवघें समब्रह्म पाहे । सर्वांभूतीं विठ्ठल आहे ॥

तुकोबांनीं असाच भाव ठेवून विठ्ठलाची उपासना केली. ते विठोबासच पूर्ण ब्रह्म समजत.

विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तहि पाताळें भरुनी ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनि मानसीं ॥

---

१ समबुद्धि झाली म्हणजे तारतम्यपणा सुटतो, असें नाहीं. जनावरांनीं खाण्याचा चारा मनुष्य खात नाहीं किंवा त्यांच्याप्रमाणें तो व्यवहारहि करीत नाहीं, पात्रापात्रतेचा सरासार विचार त्याचें ठायीं असतोच.

विठ्ठलचभूजल तेजसमीरख या पंच भूतांना व स्थिरचाला व्यापून राहिला आहे. )८

ब्रह्मांडांत ईश्वरावांचून दुसरी वस्तूच नाही, असा सर्व शास्त्रांचा सिद्धांत आहे.

विश्वी विश्वंभर । बोले वेदांतीचा सार ॥
जगी जगदीश । शास्त्री वदती सावकाश ॥
व्यापिलें हें नारायणें । ऐसीं गर्जती पुराणें ॥
जनीं जनार्दन । संत बोलती वचन ॥
सूर्याचिया परी । तुका लोकीं क्रीडा करी ॥

वेद, शास्त्रें, पुराणें व साधु संतांचीं वचनें या सर्वांचें सांगणें एकच आहे कीं, परमेश्वर हा विश्वांत सर्वत्र भरलेला आहे. वेदांचा काळ निराळा, शास्त्रांचा काळ निराळा, पुराणांचा काळ निराळा व साधुसंतांचा काळ निराळा; प्रत्येक काळांतील भाषा निराळी, प्रतिपादनाची शैली निराळी, विषयांची मांडणी निराळी, असें त्यांत वैचित्र्य असलें तरी सर्वांचा सिद्धांत एकच आहे. " आत्मा नारायण सर्वां घटीं आहे. " त्याची प्राप्ति करून घेण्याचा सुलभ मार्ग हाटला म्हणजे त्याचे एकनिष्ठेने अंतर्यामीं चिंतन करणें, हाच होय.

नलगे तप तीर्थ करणें महा दान । केल्या एक मन जोडे हरी ॥
ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥
रामकृष्ण हरि विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्व काळ ॥
तुका ह्मणे विंचु सर्प नारायण । वंदावे दुरून शिवों नये ॥

संतांनीं जी एक मोठी कामगिरी केली ती हीच कीं, ईश्वराच्या प्राप्ती-करितां मंत्र तंत्रादि कर्ममार्गाची जरूर नसून भक्तीच्या राजमार्गानें गेले असतां ती सहज होऊं शकते, असें सामान्य जनांना त्यांनीं आपल्या कृतीनें पटवून दिलें व कर्मकांडाच्या वादांत मुरलेल्या कर्मठांना मुरड घातली. ' देव भावाचा भुकेला ' ही गोष्ट खरी असली तरी अज्ञानाचा स्वभाव जो 'भोळा भाव' त्यानें देवाची प्राप्ति होणें शक्य नाहीं, असेंहि त्यांनीं म्हटलें आहे.

म्हणोनी जो भोळा भाव । तितुका अज्ञानाचा स्वभाव ।
अज्ञानें तरी देवाधिदेव । पाविजेल कैसा ? ॥

ज्ञान वैराग्यादि साधनांनीं चित्त शुद्ध होऊन निष्ठापूर्ण भावनेनेंच देवाची भक्ति केली तर त्याची प्राप्ति होते.

भक्ति नोहे साळी भोळी । भक्ति शुळावरची पोळी ॥

ती पचवायाला साधकाचें अंगी उत्कट ज्ञान, वैराग्य इ० असावीं लागतात. केवळ अंधभक्तीनेंच परमेश्वर प्राप्ति सुलभ आहे, अशा समजुतीवर पुष्कळ लोक ज्ञानाची अवहेलना करतात व त्याला आधार म्हणून ते संतांच्या कांहीं वचनांचा दाखला देतात. पण त्यांतील मर्म न समजल्या-मुळें ते स्वतांची दिशाभूल करून घेत असतात. ज्ञानावांचून खरी भक्ति होणें शक्य नाहीं. भक्त हा केवळ अंधश्रद्ध असून चालत नाहीं, तर त्याची ती श्रद्धा बुद्धिपुरस्सर असावी लागते. ज्ञानरहित भक्ति कायम टिकत नाहीं. नुसत्या ज्ञानानें सिद्धि मिळविण्याची कोणी इच्छा धरील तर चित्त उत्थान पावण्याचा संभव असतो; म्हणून ज्ञानयुक्त भक्तीलाच प्राधान्य दिलें आहे. ज्ञानानें ईश्वराचें ठिकाणीं प्रेम जडून भक्ति दृढ होते. आज यात्रेच्या ठिकाणीं जाऊन पाहिलें तर तेथें भक्तांच्या झुंडीच्या झुंडी नजरेस पडतील; पण त्यांत खरे भक्त किती आढळतील ? याचा विचार केला पाहिजे.

वारकरी पंथांतील पुष्कळ लोकांची अशी एक समजूत झालेली आहे कीं, संतांनीं केलेल्या अभंगांचें मुखानें गान केलें ह्मणजे देहाचें सार्थक झालें. मग अभंगाचा अर्थ न समजला तरी हरकत नाहीं; किंबहुना तो करूंच नये, अशी चुकीची समजूत झाल्यामुळें अभंगाचें रहस्य समजून घेण्याचा ते मुळीं प्रयत्नच करीत नाहींत व त्यामुळें म्हटल्या जाणाऱ्या अभंगांचा त्यांच्या मनावर कांहींच परिणाम घडत नाहीं. नामसंकीर्तन, भजनाचा कल्लोळ, उपवासादि व्रतांचें पालन इ० बाह्योपचार करणें हेंच वारकऱ्यांचें लक्षण ठरलें आहे.

परमेश्वर प्राप्तीची इच्छा करणाऱ्यानें नेहमीं आत्मपरिक्षण करण्याची संवय ठेविली पाहिजे.

नाना शास्त्रं पठेल्लोके । नाना दैवत पूजनम् ।
आत्मज्ञानं विनापार्थ । सर्वं कर्म निरर्थकम् ॥—उत्तर गीता.

पुष्कळ शास्त्रांचें पठण केलें किंवा अनेक देवतांची पूजा अर्चा केली तरी आत्मज्ञानावांचून सर्व व्यर्थ आहे. आजपर्यंत उच्च कोटीचे जे जे भगवद्भक्त झाले, त्यांच्यांत ज्ञानादि विवेकाचें सामर्थ्य नव्हतें, असें म्हणतां येत नाहीं. त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांवरून अथवा त्यांच्या मुखांतून निघालेल्या उद्गारांवरून कर्म, ज्ञान आणि भक्ति यांचें त्यांच्याठायीं पूर्ण ऐक्य होतें, असेंच प्रत्ययास येतें. साधकाला या तिहींची अत्यंत अवश्यकता आहे. ज्ञान, भक्ति व कर्म हे तिन्हा मार्ग एकमेकांपासून भिन्न नसून परस्परावलंबी आहेत. यांतुन एकाचाहि त्याग केला तर साधकाला कांहींच साधतां येणार नाहीं. यावरून भक्ति ह्मणजे केवळ टाळकुटयांचें भजन असें न समजतां, मनाला जे उच्च ध्येय वाटलें त्याचा ज्ञानपूर्वक व श्रद्धायुक्त अंतःकरणानें पाठलाग करणें, हीच खरी भक्ति होय. हें भक्तीचें रहस्य जाणून

जो वागेल तोच खरा भक्त होय. अशा भक्तीची शक्ति फार मोठी आहे. या शक्तीच्या योगें मनुष्याच्या अंतर्यामीं खळबळ उडून त्यांतुनच सद्वृत्तीचा व सुखाचा उगम होतो. मनुष्याचा देह केवळ अन्नाच्याच आधीन आहे, असें नाहीं. मनाचाहि त्यावर परिणाम होत असतो. म्हणून मनाचें सामर्थ्य वाढुन इष्ट फल प्राप्ति करून देणारी शक्ति म्हटली म्हणजे भक्तीच होय. इतर सर्व शक्तीपेक्षां ती अधिक श्रेष्ठ आहे.

केवळ श्रद्धेनें भक्तीचें साध्य जी ईश्वरप्राप्ति ती होणें शक्य नाहीं. " ध्रुव स्मृति रेव भक्तिः " खंड न पडतां ईश्वराची अखंड स्मृति ती भक्ति, असें रामानुजाचार्यांनीं म्हटलें आहे. अंधश्रद्धेनें अखंड स्मृति अर्थात् निरंतर चिंतन व निदिध्यास होणें शक्य नाहीं. तशी असलेली श्रद्धा मध्येंच तुटते व ईश्वरप्राप्तीचा मार्ग तेथेंच थांबतो. श्रद्धेनें रति म्हणजे ईश्वराविषयीं आवड उत्पन्न होऊन ती सतत टिकली पाहिजे व वाढीला लागली पाहिजे. अर्थात् ही वाढ होण्याला श्रद्धेला ज्ञानाची जोड पाहिजे. ज्ञानानेंच प्रेमवृद्धिंगत होऊन चित्तांत ईश्वराचें अखंड स्मरण होतें. नुसत्या श्रद्धेनें अथवा अंध भक्तीनें धर्मवेड मात्र बळावतें. तसेंच नुसत्या ज्ञानानें शुष्क वेदांताचें बंड माजतें.

वस्तूचें ज्ञान झाल्याखेरीज तिची ओळख चित्तांत ठसणें शक्य नाहीं. ज्ञानानंतरच भक्तिसुखाचा रंग चढत असतो. नुसत्या भजनानें देवाची ओळख होणें शक्य नाहीं. तोंडानें पुष्कळ भजन केलें तरी त्याचा मनावर योग्य परिणाम होण्याला ज्ञानाची अवश्यकता आहे. ज्ञान ह्मणजे प्रस्थानत्रयीचें अध्ययन, किंवा वेदान्त ग्रंथ मुखोद्गत करणें हें नव्हे. अशा ज्ञानी लोकांना वाचाळ पंडित म्हटलें आहे.

नको शास्त्र–अभ्यास व्युत्पत्ति मोठी ।
जडे गर्व--ताठा अभिमान[1] पोटीं

शाब्दिक ज्ञानानें उलट अधःपात होण्याची भीति असते. म्हणून—

ज्ञान म्हणजे आत्मज्ञान । पहावें आपणास आपण ॥

जग विनाशी असून आत्मा ह्मणजे ईश्वर अविनाशी आहे, हें जाणणें हेंच ज्ञान होय. अशा ज्ञानयुक्त भक्तीनें अंतःकरण तन्मय होऊन चित्तशुद्धीचा साक्षात्कार होतो.

प्रेमरसें झाली पुष्ट अंगकांती । त्रिविध नासती ताप क्षणें ॥

याप्रमाणें—

तुका ह्मणे जों जों भजनासी वळे । अंग तों तों कळे सन्निधता ॥

भक्तीचें महात्म्य पुष्कळांनी वर्णिलें आहे. पण ती "मुखमें राम, बगलमें सुरी" अशा प्रकारची असेल, तर तेणेंकरून जीवाचा उद्धार होणें शक्य नाहीं. तुकोबा नाम संकीर्तनानें धन्य झाले, याचें कारण नाम संकीर्तन करीत असतां त्यांचे अंतःकरण ईश्वरी प्रेमानें ओतप्रोत भरून जात असे. भक्तींत देव व भक्त एकरस झाले पाहिजेत, तरच ती भक्ति—

भक्ति प्रेम गोडी बैसली जिव्हारीं । आनंद अंतरीं येणें झाला ॥

तुकोबांनीं केलेल्या लोकोत्तर चमत्कारांविषयीं बऱ्याच दंतकथा प्रचलित आहेत. पण त्या आम्हीं येथें देऊं इच्छित नाहीं. संतांची योग्यता त्यांच्या चमत्कारांवरून ठरवावयाची नसते. साधु पुरुषांविषयीं अशा दंतकथा सामान्य जनांकडून नेहमींच सांगण्यांत येत असतात. विद्यमान पुरुषांविषयींहि हल्लीं कितीतरी दंतकथा पसरविण्यांत येत असतात. मग तुकोबांचा काळ कितीतरी पूर्वींचा आहे.

---

१ शास्त्रांत तीन प्रकारचे मद सांगितले आहेत. विद्यामद, धनमद, आणि कुलमद या पैकीं एकादा मद अंगीं असला तरी मनुष्याचा अधःपात होतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नं.
ता.
ठा.

## गुरुपदेश.

आत्मनो गुरुरात्मैव पुरुषस्य विशेषतः ।
यत् प्रत्यक्षा नुमानाभ्यांश्रेयोऽसावनु विन्दते ॥

श्रीमद्भा० स्कं. ११.

तुकोबांना गुरुपदेश झाला होता, असें म्हणतात व तुकोबांच्या अभंगांत सुद्धां तसा उल्लेख असल्याचें दाखविण्यांत येतें. गुरुशिष्यांचे लागे बांधे फार मागचे असतात व ठराविक वेळीं गुरु प्रकट होऊन शिष्याला आपल्या उपदेशानें कृतार्थ करीत असतात, असा जुन्या मंडळीचा समज आहे. बाबाजी चैतन्यानी अशाच प्रकारें यथाकालीं स्वप्नांत येऊन तुकोबांना उपदेश केला, असें या मंडळीचें म्हणणें आहे. पण याबद्दल विश्वासनीय अशी माहिती मुळीच उपलब्ध नाहीं, ही खेदाची गोष्ट होय. वारकरी मंडळांतसुद्धां यासंबंधीं कांहीच माहिती नाहीं. ज्या दोनचार गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांत परस्पर विरोधी असा भाग बराच आहे.

बाबाजी चैतन्य हे तुकोबांवर अनुग्रह करण्यापूर्वीं पुष्कळ वर्षे समाधिस्त झाले होते.

ज्ञानी मुक्त होऊनि गेले । मागें त्यांचें सामर्थ्य चाले ।
परंतु ते नाहीं आले । वासना धरूनी ॥

ज्ञानी पुरुष मुक्त होऊन गेल्यावर ते परत वासना धरून येणें शक्य नाहीं. अर्थात् ते परत येतात, असें ह्मणणें हा भ्रम होय, असें समर्थांनी म्हटलें आहे. " गत झाल्यांचे चमत्कार या नांव भ्रम " यावरून बाबाजी चैतन्य मुक्तस्थितींत असल्यामुळें त्यांना तुकोबांच्या स्वप्नांत येणें शक्य नाहीं.

दुसरी गोष्ट अशी कीं, ज्याला ज्याचा निदिध्यास लागला असतो, त्यालाच त्याचें दर्शन होण्याचा संभव असतो. पण तुकोबांना बाबाजी चैतन्यांची कल्पनाहि नसल्यामुळें त्यांना त्यांचा ध्यास लागणें शक्य नाहीं. वस्तुस्थिति अशी असतां बाबाजी चैतन्यासारख्या मुक्तावस्थेप्रत पोंचलेल्या सत्पुरुषाला तुकोबांच्या स्वप्नांत येऊन उपदेश देण्याची प्रवृत्ति कां व्हावी? हें समजणें कठीण आहे. बाबाजी चैतन्य हे भक्ती मार्गाचे मोठे पुरस्कर्ते होते व लोकांना मंत्रोपदेश करीत असत, असेंहि त्यांच्याविषयीं पुराव्यानिशी कोणी दाखविलेलें नाहीं. इतर संतांनीं आपापल्या काव्यांत स्वगुरु विषयीं पूज्यभाव दाखवून गुरुशिष्यत्वाचें असलेलें नातें स्पष्ट केलें आहे. तसें तुकोबांनीं बाबाजी चैतन्याबरोबर शिष्यत्वाचा संबंध असल्याचें आपल्या अभंगांत दाखविलेलें नाहीं. त्यांच्या अभंगांत फक्त एकाचे ठिकाणीं बाबाजी चैतन्यांचें नांव आलें आहे.

सद्‌गुरुरायें कृपा मज केली । परी नाहीं घडली सेवा कांहीं ॥
सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥
भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ॥
कांहीं कळे उपजला अंतराय । म्हणोनियां काय त्वरा जाली ॥
राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण माळिकेची ॥
बाबाजी आपलें सांगितलें नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरि ॥
माघ शुद्ध दशमी पाहूनि गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ॥

तुकोबा गंगास्नानाला जात असतां वाटेंतच त्यांच्यावर गुरु कृपा झाली व गुरूनीं त्यांच्याजवळ भोजनासाठीं पावशेर तूप मागितलें पण तें

त्यांस देण्यास तुकोबा विसरलें इ० वर्णन या अभंगांत असल्यामुळें संशयाला बरीच जागा राहते.

शास्त्रांत सद्गुरु करावा असें सांगितलें आहे. ज्ञान प्राप्ति होऊन हा भवसागर तरून जाण्याकरितां जीवानें सद्गुरूला शरण गेलें पाहिजे, असे अनेक ऋषीमुनींचें म्हणणें आहे.

तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभि गच्छेत् ।
समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥--मुंडकोपनिषद.

ईश्वराचें अनुभवपूर्वक ज्ञान संपादण्याकरितां समित्पाणि होऊन शमदमादिसंपन्न अशाच ब्रह्मनिष्ठ सद्गुरूला शरण जावें, अशी उपनिषदादि ग्रंथांचीहि आज्ञा आहे.

गुरु करावा अति शांत । शास्त्रार्थ परमार्थ पारंगत ॥

गुरु हा मार्गदर्शक असल्यामुळें तो अति शांत व ज्ञाता असला पाहिजे. अशा गुरूला शरण गेलें असतां इहपरलोकीं कल्याण होईल, असें श्री एकनाथ महाराजांनी म्हटलें आहे. ज्ञानदीप पेटवून मनोमालिन्य अर्थात् अज्ञानांधकार नष्ट करणारा व मोक्ष मार्गास लावणारा तोच सद्गुरु होय. पण असा सद्गुरु न मिळाल्यास गुरु केलाच पाहिजे असा मात्र त्यांचा आग्रह नाही.

सद्गुरु वांचोनी न सांपडे सोय । धरावे ते पाय आधीं त्याचे ॥

असें तुकोबादि म्हणतात. पण प्रत्येक गुरु म्हणजे सद्गुरु नव्हे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

सद्गुरु असतात ते स्वतः शुद्धबुद्ध, ज्ञानमय व दयास्वरूप असतात. ते आपल्या ज्ञानाचा फायदा सर्वजनांस करून देतात. ज्या मार्गाचा अवलंब

करून ते सुसंस्कृत झालेले असतात व मानसिक उन्नति साधून उच्चतेप्रत पोंचलेले असतात, तो मार्ग सुगम करून ते आपल्या शिष्यजनांस ती स्थिति प्राप्त करून देण्याचा यत्न करीत असतात. गर्भाशयांत गर्भ असतो तद्वत विचार हे प्रत्येक मानवी प्राण्याच्या डोक्यांत मुळचेंच सांठविलेले असतात. पण गुरूनें सुईणीप्रमाणें आपल्या ज्ञानानें त्यांचा बहिरागम इष्ट फलदायी होईल असा करावयाचा असतो. अशाप्रकारें जो आपल्या बुद्धि प्रभावानें व सोज्ज्वल नैतिक वर्तनानें मूढजनांस ज्ञानामृत पाजून त्यांच्या उच्च व गुढ शक्तींचा विकास करतो, त्यांच्या अध्यात्मिकतेची वाढ करूं शकतो तोच सद्गुरु या नामाभिधानास पात्र होतो.

तरी तो काया वाचा मनें । अति कृपाळु दीना कारणें ॥
तोडी शिष्याचीं भवबंधनें । उठवी ठाणें अहंकाराचें ॥
जो शब्द ज्ञानें पारंगतु । ब्रह्मानंदे सदा डुल्लतु ॥
शिष्य प्रबोधनीं समर्थु । यथोचितु निज भावें ॥

यांत ह्मटल्याप्रमाणें काया वाचा मनें करून शांत, परम दयाळु, शब्दशास्त्रांत निष्णात, स्वानुभवानें पूर्ण व प्रबोध शक्तीनें संपन्न असाच गुरु असला पाहिजे. अशा गुरूचें सदैव चिंतन म्हटलें म्हणजे शरण आलेल्या शिष्य जनांचा भ्रम दूर करून त्यांना त्यांच्या स्वतःच्या शक्ती काय आहेत त्यांची जाणीव करून देणें व त्यांच्याकडूनच आत्मोन्नतीचें अर्थात् ईश्वर प्राप्तीचें काम करवून त्यांस पूर्णावस्था प्राप्त करून देणें, हेंच असतें. पण अशा लक्षणांनीं युक्त असे गुरु तुकोबांचे वेळीं दृष्टोस न पडतां भोंदू गुरूंचाच सुळसुळाट अधिक दिसत होता.

संस्कृत भाषेंतच सर्व धर्मरहस्य सांठविलें असून तें ब्राह्मणांच्याच मुखांतून ऐकलें पाहिजे, हा कर्मठांचा जसा हट्टवाद होता, तद्वतच गुरु मुखावांचून ब्रह्मज्ञान नाहीं आणि ब्रह्मज्ञान नाहीं ह्मणजे मोक्ष नाहीं; अर्थात् प्रत्येक मनुष्यानें आत्मोद्धाराकरितां गुरु केलाच पाहिजे, अशी शास्त्राची सक्त ताकीद असल्याचें सांगून भोंदू गुरु अज्ञजनांना त्यावेळींहि फसवित असत. शास्त्राच्या या प्रबळ बंधनामुळें लोकांत गुरुबाजी उर्फ बुवाबाजी बोकळण्याला अधिक सवड सांपडून जनतेवर त्याचा कितीतरी वाईट परिणाम झाला आहे. प्रपंचाविषयीं औदासिन्य उत्पन्न करून जनतेला आपल्या कर्तव्यापासून पराङ्मुख करण्याला हेच गुरु कारणीभूत झाले आहेत. व्यवहारांतील पुष्कळ गोष्टी सद्हेतूनें वहिवाटींत आल्या, पण कालांतरानें मूळ हेतु विसरल्यामुळें त्यांना विकृत स्वरूप प्राप्त झालें.

आज काल महाराष्ट्रांत सुद्धां धार्मिक बाबतींत गुरूंचें प्रस्थ फारच माजलें आहे. पण त्यांत मंत्रगुरूंचें बंड जें माजलें आहे, तें अत्यंत अनिष्ट होय. चमत्कारावांचून गुरुपद नाहीं, या समजुतीवर आज कित्येक अहंमन्य गुरु स्वतांचें स्तोम माजविण्यासाठीं आपल्या हस्तकांकरवीं चमत्कारांच्या गोष्टी पसरवून व ऐहिक फायद्याची लालूच दाखवून बऱ्याच लोकांना फसवित आहेत. तद्वत तुकोबांच्या वेळींहि स्थिति होती.

शिष्या सांगे उपदेश । गुरु पूजा हे विशेष ॥
दावी आचार सोंवळें । दंडकमंडलु माळे ॥
छाटी भगवी मानसीं । व्यर्थ म्हणवी संन्यासी ॥
तुका म्हणे लोभ । न सुटे, नाहीं लाभ ॥

स्वतांचें देव्हारें माजविण्याकरितां व लौकिक वाढविण्याकरितां बाह्यता

हे लोक निवृत्तीचा आव आणितात, पण त्यांचें वर्तन मात्र उलट असतें. वासनेची बेडी पायांत असतां ते संसार सोडतात; पण शिष्य-शाखा वाढवितात. त्यांच्यांत परस्पर ईर्षा, द्वेष चुरस इ० असल्याचेंहि दिसून येतें. यासंबंधी " समाजस्थिति " या प्रकरणांत आम्हीं विवरण केलें आहे.

गुरूंत सुद्धां अनेक प्रकार असतात. कोणी राजयोगी असतात तर कोणी गृहस्थाश्रमी असतात. कोणी ब्रह्मचारी असतात तर कोणी संन्यासी असतात व कोणी जटा वाढविलेले बैरागीहि असतात. त्यांत कांहीं शीघ्र-कोपी असतात, तर कांहीं अश्लील शब्द उच्चारण्यांत मोठे पटाईत असतात. ज्ञानाचा गंध नसल्यामुळे व्यवहार वेगळा व परमार्थ वेगळा अशी लोकांची भलतीच समजूत करून देऊन ते शास्त्रांतील उच्च तत्वज्ञानाची हेटाळणी करतात व अंधश्रद्धेचीच तरफदारी करीत असतात. बहुजन समाज सुद्धां त्यांच्या मोहक वाणीला व बाह्य भपक्याला भुलून जातो. ईश्वराजवळ गुरूंचा वशीला चालतो, असा भ्रामक समज असल्यामुळें लोक गुरूंच्या नादीं लागतात. एक भजनीं लागला कीं दुसरा लागतो. मग त्यांच्या खाजगी आचरणाकडे कोणी पाहातहि नाहीं. त्यांनी अश्लील शब्द उच्चारिले अथवा शिव्या दिल्या तरी त्या आपल्या हितासाठींच दिल्या असें समजून ते त्यांशीं अधिक नम्रतेनें वागूं लागतात. गुरु शिष्याचें एकदां नातें जडल्यावर ' गुरु ' हाच ईश्वर होय-ईश्वर आणि गुरु भिन्न नाहीत-अशा तत्वज्ञानाचा सुकाळ होऊं लागतो. मग ईश्वर बाजूला राहून गुरुच ईश्वर बनतो व शिष्यजन आपल्या खऱ्या कर्तव्याला विसरून त्याच्या भजनीं लागतात व त्याचीच पूजा अर्चा करूं लागतात.

आम्हीं वर सांगितल्याप्रमाणें ' सद्गुरु ' हें पद ज्यांच्या ठायीं सार्थ

असेल त्यांना योग्य तो मान द्यावा. पण त्यांचें मनुष्यत्व हिरावून व खऱ्या ईश्वराला विसरून त्यांसच ईश्वर म्हणून देव्हाऱ्यांत त्यांच्या तसबिरांची पूजा अर्चा करण्यांत यावी, हें ठीक नाहीं. न्यायाला व नैसर्गिक नियमांना सोडून अशा आड वाटेनें जाणाऱ्यास ईश्वर प्राप्ति होईल असें मानणें, हा निवळ भ्रम होय. कितीहि मोठ्या योग्यतेचा गुरु असला, तरी तो परमेश्वराचा गुमास्ता आहे; तो स्वतां परमेश्वर नाहीं, ही गोष्ट विसरतां कामा नये. ब्रह्मज्ञानाची खूण पटवून देण्याकरितांच अशा गुरूची अवश्यकता असते. अर्थात् हें काम फार कठीण आहे. " ब्रह्मज्ञान नव्हे लेकुराच्या गोष्टी। तेथें व्हावा पोटीं अनुताप " शिष्याला खूण पटवून देण्यापूर्वी स्वतां गुरूच्या ठायीं " ब्रह्म " ओळखण्याची पात्रता असावी लागते. ज्ञानप्राप्ति होऊन ज्यांना आत्म्याचा साक्षात्कार झाला आहे, ते धन्य होत व त्यांनाच सद्गुरु हें नांव शोभतें; पण अशी पात्रता अंगीं असलेले गुरु क्वचितच असून मंत्र, तंत्र इ० सांगणारेच गुरु फार असतात. व पुष्कळ लोक ऐहिक सुखाच्या इच्छेनें प्रेरित होऊन त्यांच्या भजनीं लागलेले दिसूं लागतात.

हल्लीच्या काळांत सुद्धां असे लोक पुष्कळ आहेत. कोणास संतति पाहिजे तर कोणाला संपत्ति पाहिजे, कोणाला वधु चांगली मिळावी अशी इच्छा असते तर कोणाला स्वतांची शारीरिक दुःखें नाहींशीं व्हावीत असे वाटत असतें. सारांश स्वार्थ साधण्याच्या इच्छेनें बरेच लोक अशा गुरूंच्या नादीं लागलेले दिसतात. त्यांत अशिक्षित वर्गांतीलच नव्हे तर चांगले शिकलेल्या वर्गांतील लोकहि असतात, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. पण 'तांके कृपण तो जेऊं काय घाली ?' स्वतांच रिता तो इतरांची इच्छा काय पूर्ण करणार ? अर्थात् अशा गुरूंची योग्यता शिळंगणींचें सोन्याप्रमाणेंच होय असे तुकोबांनीं म्हटलें आहे.

वस्तुतः गुरूनें शिष्याला आपल्या नादीं लावून त्याची सेवा घेणें हें सुद्धां पापच होय.

शिष्याची जो नेघे सेवा । मानी देवा सारिखें ॥
त्याचा फळे उपदेश । आणिकां दोष उफराटे ॥
त्याचें खरें ब्रह्मज्ञान । उदासीन देह भावीं ॥
तुका ह्मणे सत्य सांगे । येवोत रागें येती ते ॥

शिष्याला देवासारिखें मानून त्याची सेवा न घेणाऱ्या गुरूचाच उपदेश फलद्रूप होत असतो इतरांचा उपदेश फलद्रूप तर होत नाहींच, पण उलट त्यांना दोष मात्र लागतो, असें तुकोबांचें ह्मणणें आहे. "शिष्यापासून सेवा घेणें । हें तो लक्षण अधमाचें" असें नाथांनीं सुद्धां ह्मटलें आहे. दुसऱ्याची शक्ति व स्वातंत्र्य हिरावून त्यास आपल्या भजनीं लावणें हें अधमपणाचें लक्षण होय, असें ते समजत असत. यावरून गुरूंनीं कांहीहि प्राप्तव्याची इच्छा न करितां सर्वभूत मात्रांच्या उद्धारार्थ झटणें हेंच आपलें परम पवित्र कर्तव्य समजलें पाहिजे. व अशा प्रकारें जे आपलें कर्तव्य बजावीत असतील त्यांसच शरण गेल्यानें शिष्याचें कल्याण होणार आहे. म्हणून शिष्य होण्यापूर्वी गुरूची तशी योग्यता असल्याची प्रत्येकानें खात्री करून घ्यावी.

भवनदींतून तरून जाण्याला नावेंत बसणें इष्ट आहे पण ती चांगली असली पाहिजे. ती फुटकी अथवा दगडाची असेल तर पैल तीर गांठतां येणे अशक्य होईल. "अंधानें अंध धरिला करी । उभयतां पडती गारीं" असाच त्याचा परिणाम व्हावयाचा. अशा गुरूंनीं भलती दिशा दाखविल्यामुळें ऐहिक व पारमार्थिक नुकसान झालेल्या लोकांचीं अनेक उदाहरणें आहेत.

विचार न करितां जें जें केलें । तें तें वाउगें व्यर्थ गेलें ॥
ह्मणोनि विचारीं प्रवर्तलें । पाहिजे आधीं ॥ श्रीसमर्थ ॥

या ठिकाणीं योग्य विचारच केला पाहिजे. विवेकाचें काम अंधश्रद्धेनें व्हावयाचें नाहीं. अंधश्रद्धेनें गुरुपरंपरा स्वीकारणें ह्मणजे विचारशक्तीला फांटा देणें होय.

गुरु कसा असला पाहिजे यासंबंधीं शास्त्रांतील वर्णनाकडे लक्ष दिलें असतां असें दिसून येतें कीं, शिष्याला नीट रीतीनें उपदेश करून वस्तुस्थितींतून उच्च ध्येयाकडे त्याचा लय लावील, त्याचें अज्ञान नष्ट करून ज्ञानदीपाच्या प्रकाशांत त्याला परमेश्वराची ओळख करून देईल व ईश्वराच्याठिकाणीं त्याची आवड उत्पन्न करील तोच सद्गुरु होय. ज्यांचें वर्तन याच्या उलट असेल ते सर्व अंध अथवा पापतरु समजावे, असा शास्त्रांत स्पष्ट निवाडा केला आहे.

हें तों गुरु पापतरु ह्मणावे । अंधासवें अंध तसे गणावे ॥
दे प्रीति कृष्णीं गुरु तोच साच । श्रुत्यर्थ इत्यर्थ असें असाच ॥

भक्तिज्ञान वाढून आत्मविकास होण्याला बराच काळ जावा लागतो. अर्थात् हें कार्य केवळ मंत्रोपदेशानें होत नसतें. ब्रह्मानंदाची प्राप्ति इतकी सहज नाहीं. शिष्याच्या ठायीं असलेल्या उच्च व गुढ शक्तीचा विकास करणें हेंच सद्गुरूचें कर्तव्य होय.

जो कोणी ज्ञान बोधी । समूळ आवघा छेदी ।
इंद्रिय दमन प्रतिपादी । तो सद्गुरु जाणावा ॥

\+ × ×

मुख्य गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमल--ज्ञान ॥
निश्चयाचें समाधान । स्वरूप-स्थिति ॥ श्री समर्थ.

भक्ति, ज्ञान, वैराग्य, नीति, न्याय इ० ज्यांनी अनुभवली असतील त्यांसच उपदेश करण्याचा अधिकार प्राप्त होतो. शिष्यसुद्धां श्रद्धा, नम्रता, शरणांगति, आदरभाव इ० गुणांनी गुरूचें मन आपणाकडे आकर्षून घेईल तरच गुरुपासून त्याला गुह्यज्ञान प्राप्त होऊन त्याची आध्यात्मिक उन्नति होईल. गुरु आणि शिष्य यांचे परस्परांवर निर्मल प्रेम नसेल, तर ज्ञान ही वस्तु देता घेता येणार नाहीं. अनन्य गति शिष्य भेटला तरच अन्योन्य हृदयाचे पडदे विरल होऊन गुरूच्या हृदयांतलें ज्ञान शिष्याला प्राप्त होतें. पण असें परस्पर प्रेम नसतां व अंगीं योग्यताहि नसतां पैशाच्या आशेनें मंत्रोपदेश करणारेच गुरु फार झाले आहेत.

शिष्यांसी न लावेती साधन । न करविती इंद्रियें दमन ॥
ऐसे गुरु अडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावे ॥ श्रीसमर्थ.

ज्ञानेश्वरांनी त्यांचे वडील बंधु निवृत्तिनाथ यांना गुरुतुल्य मानलें होतें. परंतु त्यांनी ज्ञानेश्वरीच्या मंगलाचरणांत २२ तें २७ ओंव्यापर्यंत गुरूचें जें मार्मिक वर्णन केलें आहे, तें निवृत्तिनाथांचें नसून त्यांच्या हृदयांत असलेल्या विवेकरूपी सद्गुरूचें आहे.

मज हृदयीं सद्गुरु । जेणें तारिलों हा संसार पूरु ॥
ह्मणऊनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी ॥
जैसें डोळयां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ॥
मग वास पाहिजे तेथ प्रगटे । महानिधी ॥
कां चिंतामणी आलिया हातीं । सदा विजय वृत्ति मनोरथीं ।
तैसा मी पूर्ण काम श्रीनिवृत्ति । ज्ञानदेव ह्मणे ॥
ह्मणोनि जाण तेनें गुरु भजिजे । तेणें कृतकार्य होइजे ॥
जैसें मूळ सिंचनें सहजें । शाखा पल्लव संतोषती ॥

कां तीर्थें जियें त्रीभुवनीं । तियें घडती समुद्रावगाहनीं ॥
नातरी अमृत रसास्वादनीं । रस सकळ ॥
तैसा पुढत पुढती तोचि । मियां अभिवंदिला श्रीगुरुचि ॥
जो अभिलाषित मनोरुचि । पुरविता तो ॥

ज्ञानेश्वर ह्मणतात माझे गुरु माझ्या हृदयांतच आहेत. त्यांच्या कृपेनें मी संसारमहापुरांतून पार पडलों, म्हणून विवेकावर माझी फार प्रीति जडली व त्यामुळेंच मी पूर्ण काम झालों. मुक्तेश्वरांनी पण एकेठिकाणी म्हटलें आहे कीं,

विवेका ऐसा गुरु । चित्ता ऐसा शिष्य चतरु ॥
जिवा ऐसा मित्र उदारु । भूवन त्रयीं मिळेना ॥

यावरून ज्याचा तोच गुरु होणें अधिक कल्याणप्रद आहे, असें ह्मणावें लागतें. नामदेव म्हणतातः—

माझिया मनें मज उपदेश केला । तो मज बिंबला हृदयकमळीं ॥
निर्वाणीची एक सांगितली खूण । कैवल्य चरण केशवाचे ॥
वेदशास्त्र श्रुति आणिक पुराणें । पढोनि जाणणें हेंचि सत्य ॥
क्रिया कर्म धर्म करणें ज्या कारणें । ते खुण निर्वाण चरण हेचि ॥
जप तप अनुष्ठान करोनि साधन । प्रत्यक्ष निधान चरण हेचि ॥
नामा म्हणे मज कळलें अनुभवे । न विसंबें चरण जीवें तुझे ॥

ह्या प्रकरणाच्या आरंभी ह्मटल्याप्रमाणें मनुष्याचा उत्कृष्ट गुरु ह्मणजे त्याचा स्वताचा आत्माच होय. प्रत्यक्ष आणि अनुमान या प्रमाणांनी विचिकित्सा करणाऱ्या विवेकी मनुष्याला मोक्ष मार्ग ठरवितां येतो.

श्रीसमर्थ रामदास स्वामी यांनी गुरूचा उपदेश घेतला होता, असा त्यांच्या चरित्रांत कोठेंहि उल्लेख नाहीं. अर्थात् ते गुरूपदेशावांचूनच स्वतांच्या

बुद्धीनें कृतकार्य झाले, असें ह्मणण्यास हरकत नाही. रहस्यकार लो० टिळक यांनासुद्धां गुरूपदेश झाला नव्हता. भगवद्गीतेच्या चिंतनानें व निदिध्यासनानें जे विचार उद्भवले व दृढ झाले तेच त्यांच्या आचरणांत उतरले व गीतेचें रहस्य विवेचन करून त्यांतील सिद्धांत व्यापक व विशिष्ट पद्धतीनें त्यांनी जनतेपुढें मांडले व आज ते सर्वमान्य झाले आहेत. या कामीं त्यांना गुरुपरंपरेची जरूरी भासली नाहीं.

ज्ञान संपादनाला गुरूचा फार उपयोग होतो. तथापि अनुभव ध्याव-याचा तो ज्याचा त्यानें स्वप्रयत्नानेंच घेतला पाहिजे. मुद्रणकला अस्ति-त्वांत येण्यापूर्वी ज्ञानार्जन गुरुपरंपरेनें होत असे. त्यावेळीं श्रवण हाच ज्ञानार्जनाचा मार्ग होता. पण छापण्याची कला निवाल्यापासून ज्ञाना-र्जनाकरितां गुरुपरंपरेची विशेष जरूरी राहिली नाहीं.

पूर्व मिमांसकांचें ह्मणणें असें आहे कीं, वेदप्रणीत कर्माचें निरलसप-णानें आचरण केलें असतां मोक्षप्राप्ति होते. त्या करितां गुरूला शरण गेलेंच पाहिजे असें नाही. आपण होऊनच मनुष्यानें स्वताचा उद्धार करावा. " उद्धरेदात्मनाऽऽत्मानंनात्मानमवसादयेत " यावरून मनुष्याला गुरूचा--मध्यस्थाची--जरूरच आहे, असें नाहीं. मध्यस्त उत्तम मिळाला तर चांगलेंच. त्याच्या मार्फत मिळणारें ज्ञान घेऊं नये, असें आह्मी ह्मणत नाहीं. पण तसा मध्यस्थ मिळाला नाहीं ह्मणून भलत्याच्याच नादीं लागून कार्यविघात करणें इष्ट नाहीं. राजाची भेट होण्याकरितां जशी मध्यस्थाची जरूर लागते, तद्वत ईश्वर भेटीसाठीं मध्यस्थाची--गुरूची--अत्यंत जरूर आहे--त्यावांचून तरणोपाय नाही असा जो सर्व साधारण समज होऊन राहिला आहे, तो भ्रामक असून ईश्वराच्या मोठेपणाला कमीपणा आणणारा आहे.

स्वत्व प्रत
सं. ... नं. ...
ता. ...

परमेश्वर प्राप्ति हेंच मनुष्याचें अंतिम ध्येय होय. अर्थात् परमेश्वर प्रत्यक्ष भेटला ह्मणजे मनुष्य कृतकार्य झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पण हें तत्व डोळ्याआड करून गुरूचें महात्म्य वाढविणारांनी नामदेवाचें उदाहरण देऊन प्रत्यक्ष ईश्वर भेटला तरी मनुष्याला गुरुकडून अनुग्रह घेतल्यावांचून तरणोपाय नाहीं इ० प्रतिपादण्याचा प्रयत्न करावा, हें अश्लाघ्य होय! ज्याच्या भेटीकरितां मध्यस्थाची–गुरूची–जरूरी, तो ईश्वर प्रत्यक्ष भेटल्यावर मध्यस्थाचें महत्व कोठें उरतें? नामदेवाला विठोबा प्रत्यक्ष दर्शन देत असत. तथापि त्यांस गुरूपदेश झाला नसल्यामुळें अपूर्णच समजण्यांत येत असे व तो दोष घालविण्याकरितां संत मंडळीनें त्यांस गुरु करण्याविषयीं आग्रह केला इ० त्यांच्या चरित्रांत लिहिलेला मजकूर अयुक्त दिसतो. भगवंतांनी अर्जुनावर कृपादृष्टि करून त्याला ज्ञान सांगितलें, मग त्याच्याच योग्यतेचा किंबहुना जास्त अशा नामदेवाला त्यांना ज्ञानाचा उपदेश कां करतां येऊं नये? या बाबतीत नामदेवाच्या तोंडचाच अभंग आम्ही वर दिला आहे. त्यावरून त्यांना गुरूपदेशाची जरूर भासलेली दिसत नाहीं.

ईश्वरच सर्व जगाचा गुरु असून त्याच्यासारखा सद्गुरूच नाहीं, असें ह्मटलें आहे. " त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान " सर्वांत श्रेष्ठ व आद्य गुरु अशी संज्ञा ईश्वराला सर्व धर्मशास्त्रांतुन दिलेली आहे. " नारायणाऽखिल गुरो भगवन्नमस्ते " " कृष्णं वंदे जगद्गुरूम्. " गुरु परंपरेकडे पाहिलें तरी तिचे आद्य गुरु प्रत्यक्ष महादेव अथवा विष्णू हेच असल्याचें दिसून येतें. अशा प्रकारें ईश्वराला अखिल जगाचा गुरु ह्मटलें असतां त्याची प्रत्यक्ष भेट झाल्यावर अन्य गुरूची अपेक्षा करण्याचें कारणच राहत नाहीं. आत्मोन्नतीकरितां मनुष्यानें आदिकारण व आदिगुरु जो परमेश्वर त्याचीच कांस धरल्यावर त्याला इतर गुरूंची गुलामगिरी पत्करण्याचें कारणच उरत नाहीं.

तुकोबांनी आपल्या उन्नतीसाठी स्वतांच प्रयत्न केला. त्यांच्या भक्ति ज्ञान वैराग्यावरून त्यांच्या ठिकाणीं बरीच जागृति झाली होती. ते अज्ञानांधःकारांत बावरत नव्हते. ब्रह्मज्ञान प्राप्तीकरितां त्यांनीं कोणत्याच गुरूची अपेक्षा केली नव्हती व त्यांना बाबाजी चैतन्याचा निदिध्यास लागल्याचेंहि त्यांच्या चरित्रावरून दिसत नाहीं. अर्थात् बाबाजी चैतन्यांनीं तुकोबांना त्यांच्या स्वप्नांत जाऊन उपदेश केला हें ह्मणणेंच चमत्कारिक दिसतें. बरें उपदेश तरी काय केला तर " रामकृष्ण हरि " हा मंत्र दिला. हा मंत्र देण्यापूर्वींच तुकोबांची विठ्ठलोपासना ठरून गेली होती व " रामकृष्ण हरि " हें भजन त्यांचें चालूंच होतें. मग पुनः तोच मंत्र देण्यांत अर्थ कोणता ? या मंत्राशिवाय त्यांना गुरुकडून अध्यात्मिक ज्ञानाच्या गोष्टी कळल्या नाहीत किंवा त्यासंबंधी कांहीं उपदेश झाल्याचें कोठें वर्णनहि नाहीं. मग लोकांनीं गुरुपदेशाचें लचांड त्यांच्या मागें कां लावावें ? तुकोबा पांडुरंगालाच आपला गुरु समजत असत व त्याचेच पाय त्यांनी अखेरपर्यंत दृढ धरिले.

माझ्या विठोबाचा कैसा प्रेम भाव । आपणचि देव होय गुरु ॥
भक्ता प्रकाशितो ज्ञान । स्वयें आपला आपण ॥
तुका ह्मणे सर्व देव । घेतां ठाव दावील ॥

*　　*　　*

सहावी माझी ओवी सहाही आटले । गुरुमूर्ति भेटले पांडुरंग ॥

या अभंगांत तुकोबांनीं विठोबालाच " देव आणि गुरु " असें ह्मटलें आहे. तोच भक्तांच्या ठिकाणीं ज्ञानाचा उदय करतो ह्मणून त्याला जवळ करावें ह्मणजे तो सर्व कांहीं मार्ग दाखवील.

---

## शेवटची स्थिति.

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरोनिया ॥
चालों वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सर्वें माझा ॥
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ॥
अवघे जन मज झाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राण सखे ॥
तुका ह्मणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाह्य ॥

या प्रपंचरूपी बाजारांत मनुष्यानें साधावयाची गोष्ट ह्मटली ह्मणजे ईश्वरप्राप्ति करून घेणें हीच होय. ही वस्तु याच बाजारांत मिळणारी आहे. मनुष्याजवळ असलेलें आयुष्य रूपी द्रव्य नाश पावणारें असल्यामुळें तें एकदां संपलें ह्मणजे या वस्तूची प्राप्ति होणें शक्य नाहीं. ह्मणून जोंपर्यंत हें द्रव्य जवळ आहे तोंपर्यंत या वस्तूची प्राप्ति करून घेतली पाहिजे. तसें जो करणार नाहीं, तो स्वतांचेंच नुकसान करून घेईल. तुकोबा ह्मणतात—

येथें कोणाचें काय गेलें । ज्याचें त्यानेंच अहित केलें ॥

मनुष्याचीं सर्व इंद्रियें बळकट व सावध आहेत—काळाच्या झपाट्यांत सांपडलीं नाहींत तोंपर्यंत मनुष्यानें येथील व्यवहारावर लक्ष ठेवून लाभ कशांत आहे त्याचा विचार करावा व या संसाररूपी सुखदुःखाच्या फन्यांतून कर्तव्याची वाट नीट चोखाळून इष्ट वस्तूची प्राप्ति करून घ्यावी, लौकिक व्यवहारांत स्वार्थपर वृत्तीवर चांगला दाब ठेवून कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें व मन यांचें योग्य प्रकारें नियमन केलें असतां व परमेश्वराचें सर्व शक्तिमत्व ध्यानांत आणून अनन्य भावें चित्तांत त्याचें स्मरण केलें असतां बीजरूपानें गुप्त असलेल्या अंतरींच्या शक्तीचा विकास होऊं लागतो. व ईश्वराचें ज्ञान होऊन त्याचें तेज हृदयांत चमकूं लागतें.

नाम उच्चारितां कंठीं । पुढें उभा जगजेठी ॥
ऐसें धरोनिया ध्यान । मनें करावें चिंतन ॥
तुका ह्मणे सार ध्यावें । मनें हरिरूप पाहावें ॥

अशा क्रमानें जातां जातांच तुकोबांना हृदयस्थित परमात्म्याची ओळख पटूं लागली. त्यांना सर्व कार्यांत पांडुरंग आठवूं लागला. ध्यानदृष्टीनें असा अधिकार प्राप्त झाला ह्मणजे मग डोळे बंद करून देवाचें ध्यान करण्याची जरूर राहात नाहीं. डोळे उघडे ठेवून चालतां बोलतां देवाची मूर्ति समोर दिसूं लागते. जेथें जातों तेथें देव आपल्या सांगाती असून आयुष्यांतील सर्व प्रसंगीं तोच वाट दाखवीत आहे, असें वाटून मनुष्य सर्व कामें उत्साहानें करूं लागतो. तुकोबांना अशाच प्रकारें परमेश्वराचें सानिध्य असल्याचें वाटून त्यांच्या मनावर जो परिणाम झाला त्याचें वर्णन त्यांनी मथळ्यावरील अभंगांत केलें आहे.

इतकी योग्यता अंगीं आल्यावर तुकाबांना विठोबाच्या प्रत्यक्ष दर्शनाची उत्कट इच्छा झाली.

काय ब्रह्मज्ञान करूं कोरडें । रितें मात्रेचें मापाडें ॥
भेटीविण कुडें । तुझिये अवघें मज वाटे ॥

तुकोबांना खातां पितां, उठतां बसतां विठोबाचा ध्यास लागला; इतकेंच नव्हे तर विठोबाच्या दर्शनाकरितां ते सारखे तळमळूं लागले. विठोबांचें दर्शन ह्मणजे पंढरीत विटेवर उभी असलेल्या मूर्तीचें दर्शन नव्हे.

अनुभव तो नाहीं तुमच्या दर्शनें । आइकलें तानें वदे वाणी ॥

अशा दर्शनानें अनुभव येता तर तुकोबांनी वरीलप्रमाणें उद्गार काढले नसते.

" दर्शनाचें आर्तजीवा । बहु देवा राहिलें "

देवाला प्रत्यक्ष पाहावें अशी त्यांच्या मनांत दृढ इच्छा झाली.

मी तव बैसलों धरुनियां आस । न करीं उदास पांडुरंगा ॥
नको आतां मज दवडूं श्रीहरी । मागाया भिकारी झालों दास ॥
भुकेलों कृपेच्या वचना कारणें । आशा नारायणें पुरवावी ॥
तुका म्हणे येऊनियां देईं भेटी । कुरवाळुनी पोटीं धरी मज ॥

तुकोबांनीं देवापाशीं प्रत्यक्ष भेटीची भीक मागितली. देवानीं कृपाळु होऊन त्यांना कुरवाळावें व पोटाशीं धरून दोन शब्द बोलावें, असें त्यांना वाटूं लागलें. देव सर्वशक्तिमान व दयाळू असून त्यानेंच ही इच्छा पूर्ण केली तर होणार आहे, असें वाटून तुकोबा म्हणतात—

कां रे माझा तुज नये कळवळा । असोनी जवळा हृदयस्था ॥

तूं जवळ असून तुला माझी दया कशी येत नाहीं.

तुका म्हणे काय झालासी निर्गुण । आम्हां येथें कोण सोडवील ॥

\+ + +

तुम्ही बैसलेती निर्गुणाचे खोळे । आम्हासी कां हे डोळे कान दिले ॥

निर्गुणाची खोळ घेऊन—गुप्त स्थितींत बसावयाचें होतें तर आम्हाला हे कान डोळ कां दिले ?

निष्ठुर यासाठीं करितों भाषण । आहेसी सर्वज्ञ तूं जाणता ॥
ऐसें कोण दुःख आहे निवारिता । तो मी जाऊं आतां शरण त्यासी ॥
बैसलासी कोणे करुनि एक घरीं । नाहीं येथें उरी दुसऱ्याची ॥
तुका म्हणे आलें अवघेंची पायापें । आतां मायबापें नुपेक्षावें ॥

सर्वांचें दुःख निवारण करण्याची सत्ता तूं आपल्याच हातीं ठेविली आहेस., मग मी दुसऱ्या कोणास शरण जाऊं ?'

का म्हणे आतां धरुनिया धीर । राहूं कोठवर मायबापा ॥

\+ + +

अल्प माझी मति । ह्मणुनी येतो काकुळती ॥
आतां दाखवा दाखवा । मज पाऊलें केशवा ॥
धीर माझ्या मना । नाहीं नाहीं नारायणा ॥
तुका ह्मणे दया । मज करा अभागिया ॥

' मज अभाग्याला चरण दाखवून मजवर दया करावी ' अशी तुकोबांनीं काकुळती येऊन देवाची पुष्कळ प्रार्थना केली.

स्वमुखें जी तुह्मी सांगा मज सेवा । ऐसें माझें देवा मनोगत ॥

" देवा तुमचें श्रीमुख डोळे भरून पाहून तुमच्या बरोबर भाषण करण्याचें सुख द्यावें व तुम्हीं स्वमुखानें कांहीं तरी मला सेवा सांगावी, हेंच माझें मनोगत आहे. याशिवाय दुसरें कांहींहि मला नको. "

जालीया दर्शन करीन मी सेवा । आणिकही देवा न लगे दुजे ॥

अशा प्रकारें देवाच्या भेटीसाठीं रात्रंदिवस चिंता करीत असतां तुकोबांना त्यांच्या दृढ भक्तीमुळें लवकरच साक्षात्कार झाला. पूजन, भजन, धारणा व ध्यान अशा मार्गानें जाऊन पूर्ण तयारी झाल्यावर ध्येय वस्तूचें ह्मणजे आराध्यदेवतेचें दर्शन होतें व तें भक्त मनांत आणील त्याप्रमाणें त्या स्वरूपांत होत असतें.

अचेत चेतलें भक्तिचिया सुखें । आपुल्या कौतुकें तुका ह्मणे ॥

योगी लक्ष लावून जे आभास तत्व पाहतात, तें तुकोबांना साक्षात् दृष्टीपुढें दिसूं लागलें. तेव्हां त्यांना अत्यंत आनंद झाला. कलिमध्यें देव बोलत नाहीं असा पुष्कळांचा समज आहे. पण तुकोबा ह्मणतात " कलि माजी देव बौद्धरूप झाला । जगाचिया बोला लागूं नका " दृढ भक्तीमुळंच तुकोबांना हें दर्शन झालें व ते त्यांना त्यांच्या आवडीप्रमाणें कटी कर ठेवलेलें अससें सांवळें स्वरूपांत झालें.

देवा हातीं रूप धरवूं आकार । नेदूं निराकार होऊं त्यासी ॥

असें भक्तांचें सामर्थ्य असल्यामुळें तें त्यांच्या आवडीप्रमाणें देवाला रूप धारण करण्यास लावतात. " तुका ह्मणे संतत ध्याता । परब्रह्मचि आलें हाता." इतका देव भक्ताला वश असतो. "भक्त ऋणी देव बोलती पुराणें" भक्तापेक्षां देवाला त्रैलोक्यांत कांहींच प्रिय नाही. तो सर्वतोंपरी त्यांच्या आधीन असतो. ' तुका ह्मणे भक्तिसुखाचा बांधला । आणीक विठ्ठला धर्म नाहीं.' श्रीएकनाथ महाराजांनींसुद्धां पुढीलप्रमाणें भक्तीची महति वर्णिली आहे.

एकी वेदत्रयाची पेटी । दीक्षेची दोरी बांधली पोटीं । ते स्वर्गांगना कुचतटीं । गुंतोनी शेवटीं बुडाले ॥ मंत्रतंत्रादि दीक्षितें । गुंतोनि बुडालीं जेथींच्या तेथें । कर्म नदीच्या पर पारातें । कोणी पावतें दिसेना ॥ विरळा कोणी एक सभाग्य येथें । हे सकळ उपाय हाणोनि लाथे । जो अति आवडीं भजे मातें । कर्म नदी त्यातें कोरडी ॥ माझें भक्तीचें तारूं नातुडे । जंव सप्रेमाचें शीर न चढे । तंव तरणोपाय बापुडे । वृथा कां वेडे शिणताती ॥ धरूनि अनन्य भक्तीचा मार्ग । करूनि सर्व धर्म कर्म त्याग । हा तरणोपाय चांग । येऊ तो व्यंग अधःपाती ॥

यावरून भक्तीचें साधन किती श्रेष्ठ आहे, हें ध्यानांत येईल. तुकोबा ह्मणतात—जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा " ईश्वरविषयक प्रेमाची अत्युत्कटता तीच भक्ति.

भक्ति प्रेमा वांचून ब्रह्मज्ञानहि फिकें आहे—

गोड नांवें क्षीर । परी साकरेचा धीर ॥
तैसें जाणा ब्रह्मज्ञान । बापुडें तें भक्तीविण ॥
रुचि नेदी अन्न । ज्यांत नसतां लवण ॥
अंधळ्याचे श्रम । शिकविल्याचेंचि नाम ॥

तुका ह्मणे तारा । नांव तंबुऱ्याच्या सारा ॥

दुधाची खीर साखरेमुळें गोड लागते. साखरे विरहित दूध जसें फिकट तद्वत ब्रह्मज्ञान हें भक्तीविण फिकट होय. भक्तिप्रेमाशिवाय ज्ञान फुकट असल्याचें नाथांनींहि वर्णिलें आहे. ज्ञान असून भक्तीचें प्रेम नाहीं तर तो केवळ मृताचा शृंगार होय.

भक्ति प्रेमाविण ज्ञान नको देवा । अभिमान नित्य नवा त्या माजी ॥
प्रेमसुख देईं प्रेमसुख देईं । प्रेमेविण नाहीं समाधान ॥
संडविनें जेविं शृंगारू केला । प्रेमेविण जाला ज्ञानी तैसा ॥
एका जनार्दनीं प्रेम अति गोड । अनुभवी सुरवाड जाणतील ॥

केवळ ज्ञानानें अभिमान वाढतो व शांति दुरावते " ब्रह्मज्ञान्याघरीं भक्तीचा दुष्काळ । शब्दांचा सुकाळ खटाटोप " समर्थ म्हणतात—

निर्गुणीं ज्ञान झालें । ह्मणोन सगुण अलक्ष केलें । तरी ते ज्ञाते नागविलें दोहिंकडे । ब्रह्माचें ज्ञान झालें असें समजून जे सगुणोपासना सोडतात, त्यांचा भक्तिमार्ग तर सुटतोच; पण निर्गुणाचेंहि ज्ञान त्यांच्या चित्तांत चांगलें ठरत नाहीं. अशा प्रकारें केवळ ज्ञान मार्गांत पडलेले लोक आपली फसवणूक करून घेत असतात. तुकोबांना एकमेवाद्वितीयं अशा सर्व व्यापी ब्रह्माचें ज्ञान झालें होतें, तरी त्यांची सगुणोपासना सुटली नव्हती. केवळ ज्ञानस्वरूप अशा निर्गुण ब्रह्माच्या ठिकाणीं त्यांचें चित्त रमत नव्हतें. " अद्वैतीं तों माझें नाहीं समाधान " सर्वांतर्यामी परमात्मा असल्याचें प्रतीतीस आलें तरी सगुणाच्या ठायींच त्यांचें अत्यंत प्रेम होतें. सगुण भक्तीचें महात्म्य त्यांनीं फार वर्णिलें आहे. ते पंढरीची वारी अखेरपर्यंत करीत असत. वृद्धापकाळ झाला तरी तुकोबांची दर आषाढी कार्तिकी पंढरीचीं वारी सुटली नव्हती. ती पहिली पायरी असली तरी अखंड चालूच होती.

भक्तीशिवाय नुसत्या बुद्धिगम्य ज्ञानांत कर्तृत्वशक्ति उत्पन्न होत नाहीं. ह्मणून ज्ञानाला भक्तीची नित्य जोड असावी लागते.

नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिती भाव । मी भक्त तूं देव ऐसें करी ॥

ब्रह्मज्ञानानें मुक्ति मिळेल पण ती तुकोबांना तुच्छ वाटत होती. मोक्ष हें मनुष्याचें साध्य आहे. पण ' मोक्ष ' हा शब्द सापेक्ष आहे. बंधन असेल तर मोक्ष इष्ट आहे. पण बंधन नसल्यास मोक्षाची जरूर नाहीं. मोक्ष म्हणजे कांहीं बाह्य ठेवा नाहीं. ती जीवात्म्याची एक विशिष्ट स्थिति आहे. तुकोबा ह्मणतात—

नाहीं देवापाशीं मोक्षाचें गाठोळें । आणुनी निराळें द्यावें हातीं ॥

इंद्रियांचा जय साधुनियां मन । निर्विषय करण असें तेथें ॥

जीव हा प्रथम मुक्तच होता. " मुक्त होता परी बळें झाला बद्ध " त्यानें कर्तृत्वाचा अभिमान बाळगून कर्म संस्कारांनीं बळेंच स्वतःला बद्ध करून घेतलें. " आशा बद्ध तो जगाचा दास । पूज्य तो उदास सर्वजना " मुक्त आणि बद्ध हें सर्व मानण्यावर आहे.

मुक्त तो आशंका नाहीं जया अंगीं । बद्ध मोहो संगीं लज्जा चिंता ॥

ज्याच्या चित्तांत कोणताच संशय नाहीं, कर्तृत्वाचा अभिमान नाहीं तोच मुक्त व लज्जा, चिंता, मोह, अभिमान, हीं ज्याच्या चित्तांत आहेत, तो बद्ध.

तुका ह्मणे देवचित्तीं । मोक्ष हातीं रोकडा ॥

परमेश्वर चिंतनांत ज्याचें मन सदा तत्पर त्याला मोक्ष मिळविण्यास सायास करण्याची जरूर नाहीं.

मोक्ष आम्हां घरीं काम करी ते दासी । होय सांगो तैसी तुका ह्मणे ॥

अध्यात्मिक उन्नतीनें ज्याच्या सर्व शक्ति पूर्ण फुललेल्या आहेत, त्याला मुक्तीची विवंचना करण्याचें कारण नाहीं.

यदि भवति मुकुन्दे भक्ति रानन्द सान्द्रा ।

विलुठति चरणाब्जे मोक्ष साम्राज्य लक्ष्मीः ॥

मुकुंदाच्या ठायीं असलेल्या प्रेमानंदानें ज्याचें हृदय पाझरत आहे, त्याच्या चरणीं मोक्ष साम्राज्यलक्ष्मी लोळण घेत असते. भक्तीच्याच पोटीं मुक्ति असते असें नाथांनीं ह्मटलें आहे.

भक्तीच्या पोटा मुक्ति पै आली । भक्तीनें वाढविली मुक्ती तें ॥
भक्ति ते माता मुक्ति ते दुहिता । जाणोनी तत्त्वता भजन करी ॥

अर्थात् ज्ञानोत्तर भक्तींत जें सुख आहे, तें मुक्तींत नाहीं. म्हणून "सांडुनी सुखाचा वांटा । मुक्तिमागे तो करंटा " असें ह्मटलें आहे. मुक्त स्थितींत देव आणि भक्त हा भेद नष्ट होऊन भक्तीचें सुख अनुभवावयास मिळत नाहीं. ह्मणून देवाचा नेहमी सहवास घडून त्या सहवासाच्या आनंदांत सर्वकाळ जावा असें वाटून तुकोबा ह्मणतात—

देव भक्तपण सुखाचा सोहळा । ठेवूनी निराळा दावीं मज ॥

देवआणि भक्त हे निराळे असले तरच भक्तीचा सुख सोहळा अनुभवितां येणार आहे. नुसत्या ब्रह्मज्ञान्याला हें सुख मिळणार नाहीं. इतका ज्ञानोत्तर भक्तीचा अद्भूत महिमा आहे.

भगवद्गीतेंत भक्ति करणारांचे चार प्रकार वर्णिले आहेत. आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानी. यांपैकीं पहिले तीन भक्त स्वतांला अनेक सुखें प्राप्त व्हावीं ह्मणून भक्ति करीत असल्यामुळें तिला हैतुकी भक्ति म्हटलें आहे, अर्थात् ती गौण भक्ति होय. गौण असली तरी खऱ्या भक्तीच्या शिखरावर जाण्याला तीच साधनीभूत होते. ध्रुवानें राज्यप्राप्तीच्या इच्छेनें भक्ति केली. पण ईश्वराचें दर्शन होतांच त्याची राज्यप्राप्तीची इच्छा नष्ट झाली.

स्थानाभिलाषि तपसि स्थितोऽहम् । त्वां प्राप्तवान् देव मुनींद्र गुह्यम् ।
काचं विचिन्वन्नपि दिव्यरत्नम् । स्वामिन् कृतार्थोऽस्मिवरं न याचे ॥

भक्तिसुधोदयम्.

कांच प्राप्तीची इच्छा करीत असतां दिव्यरत्न मिळावें, तद्वत देवाची प्रत्यक्ष भेट झाल्यावर ध्रुवानें राज्यप्राप्तीची याचना काय म्हणून करावी ? अज्ञानांत वावरत असलेला भक्त ऐहिक विषयांच्या सुख प्राप्तीकरितां देवाची भक्ति करतो. पण ती करीत असतां त्याच्या हृदयांत प्रकाश पडून दैवी प्रेमाचा उदय झाल्यावर त्याच्या सर्व ऐहिक कामना नष्ट होऊन जातात. मग त्याला इहलोकींची सर्व सुखें तुच्छ वाटतात. इतकेंच नव्हे तर स्वर्गाचें किंबहुना त्रैलोक्याचें आधिपत्य मिळत असलें तरी त्याला तें नकोसं वाटतें. असा जो ज्ञानी भक्त तोच सर्वांत श्रेष्ठ भक्त होय. असें भगवंतांनीं गीतेंत म्हटलें आहे.

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एक भक्ति र्विशिष्यते ।
प्रियोहि ज्ञानिनोऽत्यर्थमहं सच मम प्रियः ॥

ज्ञानप्राप्तीनें कृतार्थ होऊन ज्याला या जगांत मिळवावयाचें कांहींच शिल्लक राहिलें नाहीं, असा भक्तच भगवंताला अधिक प्रिय आहे.

"तेंचि भक्ति तेंचि ज्ञान। एक विठ्ठलचि जाण" हें ज्ञानोत्तर भक्तीचें मर्म आहे.

पंडित तो भला। नित्य भजे जो विठ्ठला ॥
अवघे सम ब्रह्म पाहे। सर्वां भूतीं विठ्ठल आहे ॥

असा समदर्शी भगवद्भक्त तोच पंडित होय. तो नेहमी निरिच्छ असून आत्मज्ञानानें संतोषित असतो व सदा ईश्वर स्वरूपीं रत राहून त्याचीच सेवा करीत असतो. ज्ञानदेवापासून तों रामदासापर्यंत सर्वच विष्णु भक्त असून ज्ञानोत्तर भक्तीचंच महात्म्य त्यांनी विशेषतः निरुपिलें आहे. त्यांचीं चरित्रें पाहिलीं तर ते भक्तिसुधेचें आकंठ पान करूनच कृतार्थ झाले आहेत, असें दिसून येतें.

बीज भाजुनि केली लाही। आम्हां जन्ममरण नाहीं ॥

बीज भाजुन त्याची लाही झाली म्हणजे तें पुनः पेरणीच्या उपयोगास

येत नाहीं. तद्वत तुकोबा ह्मणतात, आमचें कर्म ज्ञानाग्नीत भस्म झाल्यामुळें आतां आह्मांला जन्म मृत्यु नाहीं. "बोळविला देह आपुलेनी हातें" ज्ञानाग्नीनें पेटलेल्या चितेवर देह ठेवून तुकोबा कर्मबंधापासून मुक्त झाले व जिवंतपणींच त्यांनीं स्वस्ताची क्रिया केली.

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो सुख सोहळा अनुपम्य ॥

इंग्रजींत एक ह्मण आहे की, If you want to gain you must lose yourself-first die to live जीवंत राहण्यासाठीं मरणें हा विरोधाभास दिसतो—पण तत्व दृष्टीनें विचार केला ह्मणजे त्याची सत्यता पटल्यावांचुन राहत नाहीं. तुकोबांनी याच दृष्टीनें मीपणाचा नायनाट करून ह्मणजे आत्मवृत्तीचा विस्तारकरून सर्वात्मकपणाच्या भोगाचा अनुभव घेतला. या स्थितींत ते पूर्णावस्थेला पोंचले होते. त्यांच्या अंगीं देवाचीं सर्व लक्षणें आलीं होतीं. अर्थात् ते नराचे नारायण झाले होते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

तुका नाम हारपोनी । हरी झाला त्रिभुवनीं

याप्रमाणें निरनिराळ्या मानसिक अवस्थांतून जातांजातां तुकोबांची अध्यात्मिक उन्नति होऊन ते त्या क्षेत्रांत अनुभवानें वावरूं लागले. ईश्वर आत्मरूपानें सर्वांच्या ठायीं वास करीत असल्यामुळें मनुष्यानें भेदभाव सोडून जात गोत न पाहतां ज्याला ज्या मदतीची जरूर असेल ती त्याला देण्याचा यथाशक्ति अवश्य यत्न करावा, हें तत्व तुकोबांनीं आपल्या कृतीनें जनतेला शिकविलें व सर्वांशीं ममतेनें वागून त्यांनीं त्यांच्या उद्धाराची उठाठेव केली.

तुका ह्मणे आतां । उरलो उपकारापुरता ॥

अशा प्रकारें लोकोद्धारार्थ अव्याहत परिश्रम करून तुकोबांनीं आपला देह चंदनाप्रमाणें झिजविला व ते आपल्या अद्वितीय तेजानें अखील महाराष्ट्रीयांस पूज्य व मान्य होऊन बसले.

---

## प्रयाण

जो, ये संसारीं । जन्मला जितुका देह धारी ॥
तो नाशु पावेल निर्धारी । संशयो नाहीं ॥—रामायण.

तुकोबा स्वतां विठोबाच्या सगुण भक्तींत रंगून अद्वैत ब्रह्मज्ञानाच्या परमावधीला कसे पोंचले, हें अतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून ध्यानांत येणार आहे. हा अनुभव घेत असतां तुकोबांनीं अज्ञजनांना उपदेश करण्याचें काम अखेरपर्यंत चालू ठेवलें होतें. "जनसेवा हीच ईश्वरसेवा" असें समजून त्यांनीं लोककल्याणपर कार्याकडे स्वतांचें वाहून घेतलें व जनतेंत ज्ञानयुक्त भक्तिमार्गाचा प्रसार केला व त्याचा लोकांच्या जीवनक्रमावर बराच परिणामहि झाला. हें कार्य करीत असतां त्यांना अनेकांकडून छळ सोसावा लागला. पण त्यांसहि त्यांनीं आपल्या सोशिकपणानें व आत्मिक बलानें सन्मार्गास लावून कृतार्थ केलें.

भगवद्भक्ति करायाः बहुजड जीवांसि जो तुका शिकवी ॥
त्याच्या दुसरा धरणी वरि येईल कोण हो तुकासि कवी ॥ मोरोपंत.

तुकोबा हे सत्य वक्ते असून आत्मानुभवाचे भोक्ते होते. विनयशील असून मनाचे थोर होते. ईश्वरी प्रेमानें त्यांचें अंतःकरण ओतप्रोत भरलेलें असल्यामुळें त्यांची वृत्ति सदैव प्रेमळ व आनंदी असे. ते कधींहि दुर्मुखलेले नसत आणि म्हणूनच शांतीच्या साम्राज्याचे ते मालक झाले.

तुकोबांनीं शके १५७० ( इ. स. १६४९ ) फाल्गुन वद्य २ सोमवार रोजीं म्हणजे आपल्या वयाच्या ६१ व्या वर्षी देह ठेविला. जन्मकाळाप्रमाणेंच तुकोबांच्या प्रयाण काळासंबंधीं निश्चित असें एक मत नाहीं. मास, तिथि, वार या संबंधीं मतभेद नसला तरी शका संबंधीं बराच मतभेद आढळतो. कोणी १५७० हा शक त्यांच्या प्रयाणाचा ठरवितात, तर

कोणी १५७१ हा शक बरोबर असल्याचें सांगतात. याच्याहि पलिकडे जाऊन १५७२ हाच प्रयाणाचा नक्की शक असल्याचें कांहींचें ह्मणणें आहे. मास, तिथि, वार बरोबर धरून चाललें असतां शके १५७१ व ७२ या साली फाल्गुन वद्य द्वितीयेला सोमवार येत नाहीं असें पुष्कळांचें ह्मणणें आहे. शके १५७० सालीं मास, तिथि, वार यांचा मेळ पूर्णपणें बसतो. पुण्यतिथि पाळतांना या गोष्टी अवश्य पहाव्या लागतात. तुकोबांच्या प्रयाणाला पुष्कळ वर्षें झालीं असल्यामुळें शका संबंधीं घोटाळा होणें शक्य आहे. पण मास, तिथि, वार यांचा घोटाळा होणें मुळींच शक्य नाहीं. ह्मणून त्यावरूनच शकाचा मेळ बसविला पाहिजे, अर्थात् तुकोबांचें वय ध्यानांत घेऊन ज्या शतकांत मास, तिथि, वार यांचा पूर्ण मेळ बसेल तोच शक ग्राह्य ठरविणें इष्ट आहे.

" मरणं प्रकृतिः शरीरिणां " मरण हें मनुष्याला चुकवितां येणें शक्य नाहीं. जन्माला आलेला मनुष्य केव्हांना केव्हां तरी मरणारच. ह्यातारपण प्राप्त झाल्यामुळें तुकोबांना आतां आपला अंत समय जवळ येऊन ठेपला असें समजलें असावेसें वाटतें.

बहुकाळ माझा केलासे सांभाळ । पांडुरंगे मूळ पाठविलें ॥

सज्जन जे असतात त्यांचें चित्त यथा कालीं प्राप्त होणाऱ्या मृत्युमुळें व्यथित होत नाहीं. गात्रें शिथील होऊन शक्ति क्षीण होत चालल्यामुळें इहलोकींचा कार्यभाग संपला, असें वाटून ते मरणाची वाटच पाहात असतात. मृत्युसंबंधीं त्यांची स्मृति जागृत असून ते त्या प्रसंगाच्या तयारींतच असतात. त्यांच्या मनाचें समाधान ढळत नाहीं; व ते आपल्या कर्तव्यापासून च्युतहि होत नाहींत. अचल भगवद्भक्तीमुळें तुकोबांना मृत्यूची मुळींच खंत वाटली नाहीं व त्यांच्या समाधानाच्या स्थितींत यत्किंचित व्यत्ययहि

आला नाहीं. प्रयाणाच्या आदले दिवशीं ह्मणजे फाल्गुन वद्य प्रतिपदेच्या दिवशीं त्यांनीं सर्व रात्र कीर्तन केलें व पहांटेस आरती करून विठ्ठल नामाची गर्जना करीत ते देवळांतून बाहेर पडले. व सर्वांस " आम्हीं वैकुंठास जातो " म्हणून सांगूं लागले.

आम्हीं जातो आपुल्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा ॥
तुमची आमची हेचिं भेटी । येथूनियां जन्म तुटी ॥
आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ॥
येतां निज धामीं कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ॥
राम कृष्ण मुखी बोला । तुका जातो वैकुंठाला ॥

, जिजाईसहि त्यांनीं तसेंच सांगुन पाठविलें. पण जिजाईनें हा नेहमींचाच प्रघात आहे असें समजुन ती स्वस्थ राहिली. ती त्यावेळीं पांच महिन्यांची गरोदर होती. तुकोबा भजन करीत इंद्रायणीचे तिरीं आले.

सकळ ही माझी बोळवण करा । परतोनि घरा जावें तुम्हीं ॥

" माझी बोळवण करून परत आपल्या घरीं जावें " असें तुकोबांनीं सर्वांना सांगितलें. " तुम्हीं मला वाढवून देवाच्या स्वाधीन केलेंत. आतां मी देवाबरोबर जाणार. तुमची आमची हीच अखेरची भेट असें समजा. " अशा प्रकारें सांगून व आशीरवाद देऊन तुकोबांनीं सर्वांना निरोप दिला. त्यावेळीं तुकोबांचें मन विठोबाचें ठायीं इतकें तल्लीन झालें कीं त्यांस देहाचें भान राहिलें नाहीं. व त्या स्थितींतच ते इंद्रायणीच्या डोहांत उतरले व अदृश्य झाले.

तुकोबा जेथें उतरले तेथें नदीचें पात्र फार खोल होतें. तुकोबा एकाएकीं अदृश्य झालेले पाहतांच तेथें जमलेली मंडळी घाबरली व शोकाकूळ होऊन तुकोबांचा त्यांनीं पुष्कळ शोध केला. पण त्यांचा कोठेंच पता

लागला नाहीं. हा प्रकार चमत्कारासारखा वाटून लोकांकडून त्यासंबंध अनेक आख्यायिका रचण्यांत आल्या. तुकोबा इंद्रायणीच्या तीरीं एकदां जे दिसेनासे झाले ते अखेरचेच. त्यांचा अंत कसा झाला, हें निश्चितपणें सांगतां येणें शक्य नसल्यामुळें ' ते सदेह विमानांत बसून वैकुंठास गेले " अशीच कल्पना लोकांत प्रचलित झाली. कोणी म्हणूं लागलें कीं, ते भजन करीत करीत इंद्रायणीच्या तीरीं आले व तेथेंच गुप्त झाले, त्या अर्थी तेथेंच त्यांनीं समाधि घेतली असावी. तर कोणी ह्मणूं लागलें कीं, ते गुप्त होऊन वाराणसीपर्यंत सुखरूप गेले व तेथून तें निजधामाला ह्मणजे वैकुंठाला गेले.

मुकुटमणी संतांचा तुकया केवळ ह्मणूं नये वाणी ॥
वैकुंठीं जड नेला " विठ्ठल विठ्ठल " ह्मणून ये वाणी ॥
श्रीराम तसा गेला वैकुंठा सकाय हा कांहीं ॥
महिमा न भोरु, करणें दुष्टांच्या यास काय हा कांहीं ॥—मोरोपंत.

महिपति व वामन पंडित यांचेंहि ह्मणणें मोरोपंतांप्रमाणेंच आहे. पण सदेह वैकुंठाला जाणें ही गोष्ट सृष्टींतील जड धर्माच्या नियमास अनुसरून नसल्यामुळें ती विचाराला पटणें शक्य नाहीं. त्यांनीं तीर्थास प्रयाण केलें असें कांहीं अभंगांत ह्मटलें आहे व त्यांत कांहीं ठिकाणीं ते वाराणसीपर्यंत गेल्याचा उल्लेखहि आहे.

वाराणसीपर्यंत असो सुखरूप । सांगावा निरोप संतांसी हा ॥
येथूनि यां आह्मों जाणों निजधामा । सवें असे आम्हां गरुड हा ॥
कृपा असों द्यावी मज दीनावरी । जातसों माहेरी तुका ह्मणे ॥

यावरून तुकोबा तीर्थास गेले व तेथून ते निजधामास गेले किंवा

ंद्रायणींत गुप्त होऊन निजधामास गेले, हें ठरविणें कठीण आहे. तरीपण या अर्थी तुकोबा फाल्गुन वद्य द्वितीयेस भजन करीत इंद्रायणीच्या तीरीं हे निश्चित आहे व तेथून ते नाहींसे झाले, त्या अर्थी ते इंद्रायणींतच ुप्त झाले असें गृहीत धरून चालण्यास हरकत नाहीं

तुकोबा अदृश्य झाल्या नंतर तिसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं ह्मणजे पंच-ीच्या दिवशीं तेथेंच आसपास त्यांच्या अंगावरील गोधडी व हातांतील ाळ ही सांपडली. फाल्गुन वद्य द्वितीयेला तुकोबा गुप्त झाले, तरी त्यांचें ेहावसान त्याच दिवशीं झालें, असें कशावरून समजावयाचें ? ह्मणून ोधडी व टाळ हीं ज्या दिवशीं सांपडलीं तोच तुकोबांच्या प्रयाणाचा िवस, असें मानण्यांत येऊन पंचमी हीच पुण्यतिथि पाळण्यांत आली. व ोच निर्णय अद्यापि अबाधितपणें पाळण्यांत येत आहे.

असो; याप्रमाणें तुकोबांचें चरित्र संक्षिप्त रूपानें वाचकांपुढें ठेविलें ाहे. त्यावरून तुकोबांची योग्यता व त्यांचा अधिकार किती होता, हें हज लक्षांत येणार आहे. तुकोबा भागवत धर्माचे पुरस्कर्ते असून सर्व क्तांत शिरोमणी होते. त्यांच्या अभंगांत भक्तिस नुसता उचंबळून हिला आहे. ईश्वर प्राप्तीला ‘ प्रेमपुरस्सर भक्ति ’ हेंच खरें साधन होय, शी त्यांची शिकवणूक होती. त्यांचें बोलणें रोखठोक असून त्यांची कृति रळ व निस्पृह होती. ते अंतःकरणाचे खंबीर असून लोकादराच्या मोह-ाळांत अडकण्यासारखे नव्हते. त्यांचें कवित्व, त्यांचें ज्ञान, त्यांची भक्ति, ांची समदृष्टि, त्यांचें सर्वांभूतिं प्रेम हीं सर्वच अलौकिक असल्यामुळें त्यांचें रित्र मननीय व अनुकरणीय असुन तें सर्व पंथांतील लोकांच्या आदर्श ात्र झालें आहे.

क्र. ४०३२

—o—

REFBK-0005032